साप्ताहिक

# माणूस

किंमत दोन रु. पाच फेब्रुवारी १९८३

## आजतरी इम्रान पाकिस्तानी संघापेक्षा मोठा वाटतो.



## कैदी नं. ३०८

## एक बेधडक दैनंदिनी

## मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलन

निशीकांत भालेराव

साप्ताहिक

# माणूस

□

वर्ष : बाविसावे

अंक : चौतीस ३८

□

५ फेब्रुवारी १९८३

किंमत : दोन रुपये

□

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

□

सहाय्यक

**दिलीप माजगावकर**

**सौ. निर्मला पुरंदरे**

□

वार्षिक वर्गणी

**पन्नास रुपये**

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

: पत्ता :

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

□

मुखपृष्ठ

**सुभाष अवचट**

## सप्रेम नमस्कार

□ पुणे येथे संघ शिबिरस्थानी 'माणूस'चा झेलम अंक वाचून फारच आनंद झाला. अंक वाचल्यावर तेथेच जमलेल्या इतर नागरिकांच्याही प्रतिक्रिया अजमावता असे आढळले की, अंक तर अप्रतिमच निघाला आहे व योग्य वेळी काढल्यामुळे तर दुधात साखरच. माझ्या मते व इतरांच्याही मते त्यात एकच कमी राहिली आहे. ती म्हणजे काश्मिरचा पूर्ण नकाशा त्यात हवा होता. म्हणजे जास्त सुस्पष्टता आली असती.

१९ जानेवारी १९८३ **मनोहर ओक, पुणे**

□ 'झेलम' अंक वाचन संपले काश्मिर-जम्मू लडाख इ. भागातील राजकारणाची सर्वांगीण माहिती त्यात ग्रंथित केली असल्यामुळे अंक नुसताच संग्राह्य झाला आहे असे नसून त्याबाबत राज्यकर्त्यांचे लक्ष वेधून घेऊन त्यातून काही आशादायी मार्ग काढणे आवश्यकच ठरते. काश्मिर हा हिंदुस्थानचा अविभाज्य भाग असूनही तेथील राजकारणीय चाळवांमुळे हा भूभाग सोडावा लागेल काय ही भीतीही त्यातून स्पष्ट दिसते.

या अंकाच्या निमित्ताने एक परिसंवाद घडवून आणून त्यातून एक 'कृतिसमिती' नेमून हा प्रश्न दिल्लीपर्यंत चांगल्या रीतीने हाताळला जावा असे वाटते. महाराष्ट्रात हा अंक वाचणाऱ्यांची संख्या तशी तुटपुंजीच असणार. त्यातून राज्याराज्यातून फार विशेषाचे संबंध आज तरी दिसून येत नाहीत. एक काळ 'लाल-बाल-पाल' या त्रयींनी सर्व हिंदुस्थानातील सर्व लोकांना एकत्र आणून कार्यान्वित केले, त्या वेळी त्यांचेजवळ सत्ताही नव्हती व पैशाचे पाठबळही विशेष नव्हते. त्यामुळे काश्मिर खोऱ्यातील आजचे चाळे बंद करण्यात सध्याच्या परिस्थितीत काय उपाय योजावेत हीही एक समस्या आहे. आपण आपल्या अग्रलेखात लिहिल्याप्रमाणे 'निदान महाराष्ट्र तरी काही करून दाखवील' अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. काश्मिर खोऱ्यातील, ईशान्य-भागातील 'वगैरेंचे' चाळे हिंदुस्थानीय माणूस डोळ्यांवर कातडे ओढून आज सहन करू शकतो. ब्रिटिश अमदानीत काहीही सत्ता नसताना राज्यकर्त्यांनी केलेले अनन्वित अत्याचार मोडून काढण्यासाठी सर्व जनता आपल्या अग्रणींच्या शब्दांबरोबर 'कुर्बानी' करीत असत. 'जालियनवाला बाग' हे उदाहरण बोलके आहे.

'झेलम' विशेषांकांचे स्वागत तर खरेच, आपले अभिनंदनही जरूर करणे आवश्यक आहे. पण अंक काढला, 'पुढे काय ?' हा प्रश्न आहेच.

माझ्या मताने या अंकाचे हिंदी व इंग्रजी भाषांतर करून ते त्या त्या विभागातील जनतेच्या हाती गेले पाहिजे तरच ही जाणजाग निर्माण करून त्यातून मार्ग काढू शकेल व हे चाळे बंद होतील. अन्यथा आपल्या राष्ट्रगीतात या भागाचा जसा उल्लेख नाही, प्रमाणे तो 'कदाचित' गमवावाही लागेल अशी भीती वाटते. इतिहासाची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी राज्यकर्ते जागरूक असतात असे म्हणतात.

२४ जानेवारी **श्री. आ. मांडके, पुणे**

ता.क.–आपल्या साप्ताहिकात अशी सदरे वारंवार येतात व ती नुसतीच वाचनीय नसून विचार करण्याजोगी आहेत. त्यासाठी आता 'माणूस' साप्ताहिक हिंदी भाषेमध्ये प्रकाशित करणे हाच श्रेयस्कर मार्ग होय विचार 'फार' करू नका. 'हिंदी' माणूस प्रकाशित कराच !

□ आपला झेलम विशेषांक वाचला. थोडाफार एकांगी विचार असूनही आवडला.

शांतिलाल भंडारी यांनी दिलेला काश्मिरचा पुराणकाळापासूनचा इतिहास वाचनीय आहे. मात्र त्यात नाग शब्दामुळे येथें पूर्वी नाग जमातीचे लोक रहात असावेत असा पु. ना. ओक पद्धतीचा निष्कर्ष काढला आहे तो बरोबर नाही. 'नाग' याचा अर्थ झरा. नागाप्रमाणे वळणे घेत जाणारा. कोकरनाग, बेरीनाग ही सर्व निर्झरांची नावे आहेत. काश्मिरमध्ये असे खळाळते जलप्रवाह पावलोपावली आहेत. 'नाग' जमातीशी त्याचा काही संबंध नाही.

याच लेखात सुलतान झैनुल अबिदैन याचा ओझरता उल्लेख आहे. त्याची सविस्तर हकीगत अभ्यासनीय आहे. या सुलतानाचा पिता अतिशय क्रूर, निर्दयी आणि कडवा धर्मनिष्ठ होता.त्याने हिंदूची अनेक देवळे पाडून तिथे मशिदी बांधल्या, संस्कृत पाठशाळा बंद केल्या, अनेकांचे जबरदस्तीने धर्मांतर केले. त्याच्यानंतर गादीवर आलेला झैनुल अबिदैन हा प्रजाहितदक्ष, दयाळू आणि सर्वधर्मसमभाव मानणारा होता. त्याने हिंदूंची देवळे पुन्हा बांधून दिली, संस्कृत पाठशाळा चालू केल्या, स्वत: संस्कृतचा अभ्यास केला, गोवधबंदी केली आणि सर्व प्रजेला धर्मातीत वागणूक देऊन प्रजेचे अपार प्रेम संपादन केले. लोक त्याला प्रेमादराने 'बद-शाह' (म्हणजे थोर राजा) असे म्हणत असत. श्रीनगरच्या मध्यवस्तीतील पर्यटनखात्याच्या 'बदशाह हॉटेल' ला याच्याच नावाच्या स्मृतिखातर हे नाव दिले आहे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट अशी की, या राजाने यापूर्वीच्या राजवटीत कोणा हिंदूना सक्तीने बाटवून मुसलमान केले गेले होते त्यांना पुन्हा हिंदू धर्मात जाण्याची मुभा दिली; पण काश्मिरमधील ब्राह्मण तसे शुद्धीकरण करण्यास धजावेनात. आम्हाला काशीच्या पंडिताची परवानगी हवी असे ते म्हणाले. त्यानुसार राजाने काही ब्राह्मणाचे शिष्टमंडळ काशीला पाठवले; पण तेथील महापंडितांनी अशा तऱ्हेने पुन्हा हिंदू धर्मात या लोकांना प्रवेश देण्यास स्पष्ट नकार दिला !

२४ जानेवारी — डॉ. शरद अभ्यंकर, वाई

□ रा. स्व. संघाच्या पुणे येथील महाशिबिरात आपला झेलम विशेषांक विकत घेऊन संपूर्ण वाचून काढला. कालच काश्मिर सरकारने जातीय संघटनांवरील बंदी घालणारा वटहुकुम काढला. त्याचा मुख्य कल रा. स्व. संघाविरुद्धच आहे.

आपल्या विशेषांकात काश्मिरचा संपूर्ण इतिहास व सध्याची तेथील राजकीय सामाजिक परिस्थितीची चांगली माहिती पुरविली आहे. काश्मिरचा प्रश्न हा भारताला कॅन्सरसारखा भयानक रोग झाला आहे. तो वेळीच निपटून न काढल्यास संपूर्ण भारताला त्याचा धोका आहे. मात्र त्याची जाणीव सध्याचे सरकार ठेवीत नाही व वर्तमानपत्रेही दखल घेत नाहीत.

आपल्या अभ्यासपूर्ण अंकाबद्दल अभिनंदन !

२२ जानेवारी — भि. दा. गुरव, ना. शि. मोहिते, सोलापूर

## तलाकशुदा स्त्रियांच्या मुलांचे वसतिगृह, कोल्हापूर

इस्लाम धर्माने तलाकचा कायदा ज्याकाळी दिला त्या वेळी तो जरूर पुरोगामी असेल; पण आज त्याचा गैरवापर करून मुस्लिम पुरुष आपल्याच समाजातील स्त्रियांना निराधार करत आहेत आणि अशा स्त्रियांच्या पदरात मुले असली म्हणजे त्याचे हाल कुत्रा खात नाही. अशा स्त्रियाचे पुनर्वसन करणे जरूर आहे. त्याच्या मुलाच्या शिक्षणाचा प्रश्न हा प्रश्न आहे असे कुणाला वाटतच नाही, ही अवस्था वाईट आहे.

त्याकरिता फक्त मोठमोठया योजना माडत न बसता स्वतःपासून सुरुवात करायची म्हणून आम्ही येत्या शैक्षणिक वर्षापासून तलाकपिडीत महिलांची मुले, निराधार व गरीब मुस्लिमांची मुले याच्याकरिता वसतिगृह सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. या वसतिगृहाची योजना अशी-

मी राहतो त्या विक्रमनगर वसाहतीत माझ्या मालकीची असलेली जागा मी या कामासाठी ट्रस्ट करून देतो आहे. तसेच हे वसतिगृह चालविण्याची जबाबदारी मी व माझी पत्नी श्रीमती आयेशा असे दोघेजण घेतो आहोत.

ही जबाबदारी घेत असताना या ऐतिहासिक कार्याचे महत्त्व व आवाका याची जाणीव ठेवली आहे. आम्ही स्थापन करत असलेल्या मुस्लिम समाज प्रबोधन व शिक्षण संस्थेचा निधी दोन लाखांपर्यंत उभा करावा व यातून तलाकपीडित स्त्रियांच्यासाठी आश्रम व उद्योगकेंद्र सुरू करावे अशी योजना आहे. या निधीचा सकल्प सोडत असताना मुस्लिम समाज आमच्यासमोर आहे. या विधायक कार्याला मुस्लिम समाज आम्हाला मदत करेल अशी आशा आहे. तसेच या चळवळीचे सहानुभूतिदार, आमचे जाहिरातदार, वाचक व मित्र आणि मानवतेच्या दृष्टिकोनातून कार्य करणाऱ्या विविध संस्था उदार हस्ते मदत करतील व आमच्या या कार्यात सहभागी होतील असा विश्वास आहे.

हुसेन जमादार
संपादक–मुस्लिम प्रबोधन संवाद,
प्लॉट नं. ३१, सम्राट कॉलनी,
विक्रमनगर, कोल्हापूर– ४१६००५


५।६ वर्षांपूर्वी काही उत्कृष्ट देशी-विदेशी-भारतीय चित्रपटांची ओळख करून देणारे लेख 'माणूस'मध्ये प्रसिद्ध झाले होते. ते नंतर पुस्तकरूपाने–'टच'मधून पुन्हा प्रकशित झाले.
लेखक होते अशोक प्रभाकर डांगे.
या लेखकाचा
विस्मृतीत गेलेल्या एका
विदेशी पुस्तकाची ओळख करून देणारा
प्रदीर्घ लेख– (लवकरच)

**'ऑटोबायग्रफी ऑफ बेन्व्हेनूतो सेलीनी'**

कामगार वृत्त

नियमानुसार काम आंदोलन

# 'बेस्ट' कामगारांचा राग कोणावर?

२४ जानेवारी १९८३ रोजी मुंबईत एक घटना घडली आणि त्याने सुस्त बनलेले मुंबईतील बेस्ट कामगार थोडेसे जागे झाले. ६५ नंबरची बस म्युझियम ते किंग सर्कल अशी आहे. ह्या बसचा मार्ग गर्दीतून असल्याने आणि सदैव ती भरगच्च होत असल्याने योग्य वेळी तिला मुक्कामावर पोहचवणे ही एक कंडक्टर आणि ड्रायव्हर ह्यांची मोठी कसरत असते. बस दादर टी. टी. पर्यंत येईतोपर्यंत खूप वेळ गेलेला असतो. बस योग्य वेळी पोचवण्यासाठी काही वेळा ड्रायव्हर गाडीचा वेग वाढवतो; तर कंडक्टर एक-दोन स्टॉप सोडून बस तशीच पुढे हाकतो.

२४ जानेवारी रोजी असंच घडलं. दादर टी. टी. ते किंग सर्कल यामध्ये असणाऱ्या कपोलनिवास स्टॉपवर बस उभी करण्यात आली नाही म्हणून बेस्टच्या अधिकाऱ्यांनी सुमारे २५ ते ३० कंडक्टर-ड्रायव्हरना कामावरून ५ दिवसांसाठी निलंबित केलं. बिचाऱ्या कामगारांना पाच दिवसांच्या कमीत कमी दीडशे रुपये पगाराला मुकावे लागले. ह्या एका घटनेने सुस्त झालेला बेस्टकामगार अचानक जागा झाला आणि त्याने आज मुंबईत नियमानुसार काम करण्याचं जवळजवळ आंदोलनच सुरू केलं आहे.

पण ह्या आंदोलनात बेस्टकामगार किती काळ टिकाव धरू शकेल हा एक पुन्हा अभ्यासाचाच विषय ठरेल. बेस्टकामगार मुळात लढाऊ आहे का, हाही प्रश्न वारंवार येथे चर्चिला जातो.

मुंबईच्या बेस्टमध्ये सुमारे ३२००० कामगार काम करतात. यातील जवळजवळ १३,००० कामगार हे वाहक आणि चालक आहेत. काही कामगार इंजिनिअरिंग खात्यात काम करतात तर काही विद्युतपुरवठा खात्यात! ह्या बेस्टमध्ये गेल्या पंचवीस वर्षापासून स्वा. जॉर्ज फर्नांडिस यांची 'बेस्ट वर्कर्स युनियन' ही युनियन मान्यताप्राप्त म्हणून काम करीत आहे. फर्नांडिसांच्या जोडीला शिवसेनेची कामगारसेना तर प्रा. भाऊराव पाटील यांची 'बेस्ट एम्प्लॉईज युनियन' ह्याही दोन संघटना येथे काम करीत होत्या; पण फर्नांडिसांपुढे ह्या दोन युनियनची शक्ती अगदीच मामुली होती. त्यामुळे फर्नांडिसांच्या आवाजाला एक जोर होता.

पण ह्या आवाजाला दुभंगण्याचं काम कामगारनेते डॉ. सामंत ह्यांनीच केलं. नोव्हेंबर १९८१ सालच्या दिवाळीच्या वेळी मुंबईतील गिरणीकामगार जसे डॉ. सामंतांकडे चालून आले तसेच बेस्टकामगारही आले. विक्रोळीच्या नगरसेविका अलका देसाई ह्यांच्याकडे चालक शेळके ह्यांनी पास मागितला आणि त्यांच्याशी अयोग्य वर्तन केलं' या आरोपावरून चालक शेळके आणि वाहक सामंत ह्यांना बेस्टप्रशासनाने कामावरून बडतर्फ केले. संतापलेल्या कामगारांनी प्रशासनाच्या ह्या कामगारद्रोही निर्णयाविरुद्ध घाटकोपर 'डेपो बंद'चा आदेश दिला. तो शंभर टक्के यशस्वी झाला. संघटित झालेल्या कामगारांना कोणाच्या तरी नेतृत्वाची आवश्यकता होती. त्यांना लढाऊ नेतृत्व हवं होतं. डॉ. सामंतांशिवाय हे नेतृत्व मिळणं अशक्य असल्याचं जाणूनच हे कामगार मोर्च्याने डॉ. सामंतांकडे आले. बडतर्फ शेळके आणि सामंत ह्यांना कामावर घेतल्याखेरीज मुंबईतील एकही बस रस्त्यावर येणार नाही असा इशारा बेस्टकामगारांनी दिला. बंदचं हे लोण सोळाही डेपोमध्ये पसरलं. अखेर प्रशासनाला आपला निर्णय मागे घ्यावा लागला. शेळके आणि सामंत वाजतगाजत डॉ. सामंतांसमवेत कामावर रुजू झाले. ह्या एका घटनेने डॉ. सामंतांनी बेस्टमध्ये पाय रोवला आणि मान्यताप्राप्त युनियनची झोप उडवली.

### नेतृत्वात बदल

नोव्हेंबर ८१ पासून म्हणजे डॉ. सामंतांचे बेस्टमध्ये आगमन झाल्यापासूनचा जर इतिहास पाहिला तर डॉ. सामंतांचे लढाऊ नेतृत्व इथं अगदी थिटं पडल्याचं जाणवतं. कामगार एक युनियन सोडून दुसऱ्या युनियनकडे का जातो; तर त्याच्या काही अपेक्षा असतात. त्या तात्काळ पुऱ्या व्हाव्यात अशी त्याची अपेक्षा असते. त्यासाठी प्रारंभीच्या काळात सर्वांबरोबर कुठेही जाण्याची त्याची तयारी असते.

ह्याच हेतूने बेस्टकामगार डॉ. सामंतांकडे आलेला असावा. कारण बेस्ट कामगारांची कैफियत ऐकण्यासारखी आहे. चालक आणि वाहक यांची येथील नोकरी म्हणजे एक तारेवरची कसरतच आहे. एखाद्या कंडक्टरने एका स्टॉपवर बस थांबवली नाही तर लागलीच त्याच्यावर दंड आकारला जातो. त्याला निलंबित केले जाते. एखादे दिवशी कामावर येण्यास जर दोन-चार मिमिटे विलंब झाला तर त्याला काम नाकारले जाते. गर्दीच्या वेळी जर एखाद्या प्रवाशास तिकिट देण्याचे राहून गेले आणि अशा वेळी अधिकाऱ्याने त्या प्रवाशास तिकिटाबद्दल विचारले तर प्रवासी कंडक्टरला पैसे दिल्याचे सांगून मोकळा होतो. अधिकारी त्या प्रवाशावर विश्वास ठेवून आम्हाला लागलीच कामावरून निलंबित करतात अशा कंडक्टरांच्या अनेक तक्रारी मी ऐकल्या.

कामावर असताना कंडक्टरच्या पिशवीत पाच पैसे जरी जास्त मिळाले किंवा कमी पडले तरी त्याला बडतर्फ करण्यात येते अशा अनेक तक्रारी येथे ऐकावयास मिळतात. नोव्हेंबर १९८१ मध्ये एका कंडक्टरने बसमध्ये जादा प्रवासी बसवले म्हणून त्याच्याकडून २०० रु. दंड घेण्यात आला!

कंडक्टरांप्रमाणे ड्रायव्हरांच्याही अशाच तक्रारी आहेत. अपघात ह्या कारणांमुळे

अनेक ड्रायव्हरांना बडतर्फ करण्यात आलेलं आहे. फौजदारी न्यायालयाने अशा ड्रायव्हरांची निर्दोष मुक्तता करूनही बेस्ट-प्रशासन त्याना कामावर घेत नाही. सिग्नल न पाहता एका ड्रायव्हरने बस तशीच पुढे रेटल्याने त्याला नुकताच ७५ रु. चा दंड ठोठावण्यात आला !

ह्यावर बोलताना डॉ. सामंताच्या युनियनमधील एक अभ्यासू व्यक्ती म्हणाली की, बेस्टच्या या जाचक नियमामुळे दरवर्षी सुमारे ६०० ड्रायव्हर-कंडक्टर बडतर्फ होतात. ह्यामुळे बाराही महिने बेस्टमध्ये वाहक व चालक ह्यांची भरती सुरू असते; पण दुर्दैव हे की, वृत्तपत्रात जाहिरात देऊनही बेस्टला ड्रायव्हर मिळत नाहीत. असं का व्हावं याचा प्रशासनानं अंतर्मुख होऊन विचार करावा असंही ही व्यक्ती म्हणाली.

बेस्टकामगारांना एकाच श्रेणीवर कित्येक वर्षे काम करावे लागते. किंबहुना त्याच श्रेणीवर त्यांना निवृत्त व्हावे लागते. ह्या आणि अशा अनेक समस्या बेस्टकामगाराना नित्याने भेडसावत आहेत.

## प्रशासनाला धडा

ह्यासाठीच ह्या कामगारानी नेतृत्व बदलल आणि मोठ्या अपेक्षेनं ते डॉ. सामंतांकडे आले. गिरणीकामगाराचे आणि बेस्टकामगाराचे डॉ. सामंतांकडे आगमन एकाच वेळी झाले सामंतांनी गिरणीकामगारांना अग्रहक्क दिला. बेस्टची संघटना बांधण्याचे काम त्यांनी तेथील नेत्याना करावयास सांगितले.

गेल्या एका वर्षात बेस्टकामगारांनी जर कोणतं काम केलं असेल तर आपली शक्ती कोणता नेता वरचढ हे सिद्ध करण्यातच त्यानी घालवली १५ जानेवारी ८२ रोजी बेस्टबंदची हाक देऊन डॉ. सामंतांनी आपली शक्ती दाखवली. १९ जानेवारीच्या 'भारत बंद' मध्ये डॉ. सामंतांनी भाग घेतला; पण बेस्टला त्यातून काढून त्यांनी आपली ताकद दाखवली. १९ एप्रिलला डॉ. सामंतांनी बंद पाळला; पण शिवसेनेने त्याला विरोध करून गाड्या बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. ११, १२ आणि १३ ऑक्टोबर रोजी डॉ. सामंत आणि फर्नांडिस ह्यांच्यात नेतृत्वाबद्दल तर चुरस लागली होती. ह्या वेळी धूर्त फर्नांडिसांनी डॉ. सामंताना जाळ्यात अडकवण्याचा प्रयत्न केला; पण सामंतांनी जॉर्जवर मात करून त्यांचे वस्त्रहरण केले. पुढे फर्नांडिसानी त्याचा बदला १३ डिसेंबरच्या मुंबई बंदमध्ये घेतला. डॉ. सामंतांनी दिलेल्या ह्या मुंबई बंद हा केला खुद्द बेस्टकामगारांनीच पाठिंबा दिला नाही, असंच म्हटलं गेलं. कारण रस्त्यावर बसेस धावत होत्या ह्याहीपेक्षा डॉ. सामंताचा बेस्ट सोसायटीच्या निवडणुकीमध्ये फर्नांडिस युनियनने पार धुव्वा उडविला. डॉ. सामंताच्या सर्व सात उमेदवारांचे अक्षरशः पानिपत झाले!

म्हणून म्हटलं की गेलं वर्ष कामगारांनी कोणता नेता वरचढ हे ठरवण्यात घालवलं. त्यांच्यात जणू शर्यतच लागली होती. या शर्यतीची अखेर आता फर्नांडिस करू पाहात असलेल्या करारात होत आहे.

बेस्टमध्ये आमचं बहुमत आहे असा डॉ. सामंताचा दावा आहे. १८००० सभासद आम्ही नोंदवले आहेत अशी त्यांची संघटना म्हणते. म्हणून आम्हाला वाटाघाटीसाठी बोलावण्यात यावं असा त्यानी बेस्ट प्रशासनाकडे हट्ट धरला होता; पण १३ डिसेंबर रोजी डॉ. सामतांचा फसलेला बंद पाहून व्यवस्थापकांनी डॉ. सामंतांच्या शक्तीचा धसका सोडला आणि त्यांनी फर्नांडिस याच्या मान्यताप्राप्त युनियनशीच वाटाघाटी सुरू केल्या. वाटाघाटी पूर्ण होऊन त्याचे आता लवकरच कायद्यात रूपांतर होत आहे.

फर्नांडिसानी तयार केलेल्या करारानुसार बेस्ट कामगाराला आता मासिक ६० रुपयाची पगारवाढ मिळणार आहे. डॉ. सामंतांचा या लढाईतील हा पराभवच आहे असे म्हटले जात असले तरी ही वाढ डॉ. सामंतांमुळेच मिळते आहे असे कामगारांचे म्हणणे आहे. यापूर्वी जे जे करार झाले त्याने १० ते २० रुपयापर्यंतच जास्तीत जास्त पगारवाढ झाली. डॉ. सामंताच्या नावात असणाऱ्या शक्तीमुळेच एवढी वाढ मिळत आहे असे कामगार बोलतात.

असे असले तरीसुद्धा डॉ. सामंतांचे कार्यकर्ते तसे फारसे उत्साही नाहीत. डॉ. सामंतानी मान्यतेसाठी केलेला अर्ज रजिस्ट्रारनी फेटाळला आहे. व्यवस्थापकांनी सामंताना डावलून जॉर्जशी करार केला आहे. सामंतांच्या कार्यकर्त्यांना सूडबुद्धीने वागणूक दिली जात आहे. ह्या सर्वांमुळेच निराश झालेले कार्यकर्ते काही तरी धमाल उडविण्याचा विचार करत असावेत !

असा प्रयत्न मध्यंतरी त्यांनी करून पाहिला; पण इतर कामगारांप्रमाणे बेस्ट कामगार फारसे लढवय्ये नाहीत हे त्यांनीच स्वतः नंतर बोलून दाखवले. असे असले तरी युनियत सतत जागी ठेवली पाहिजे म्हणूनच डॉ. सामंताचे हे नियमानुसार काम आंदोलन असावे. कारण सामंताच्या बेस्ट युनियनकडे तसा काही कार्यक्रमच नाही अशी टीका त्यांच्याच अनुयायांकडून वारंवार होते.

डॉ. सामंताच्या बेस्ट युनियनचे सरचिटणीस श्री. के. एस. आहिरे हे आहेत. ही व्यक्ती जात्याच शांत व शिस्तीने काम करणारी. प्रसिद्धीपासून दूर, सौम्य भूमिका घेऊन प्रश्न सोडवावेत या विचाराची. तसं पाहिलं तर डॉ. सामंतांच्या संघटनेत आहिरे ही व्यक्ती कशी काय बसू शकली याचं अनेकांना अजूनही आश्चर्य वाटतं; पण आहिरे आपल्या स्वतःच्या पद्धतीप्रमाणे युनियनचे काम करीत आहेत. कोणी कितीही टीका करीत असले तरी !

आपण आता जास्त काहीच करू शकत नाही. म्हणून शेवटी प्रशासनाला धडा शिकवण्यासाठी डॉ. सामतांनी हे नियमानुसार काम आंदोलन सुरू केलेलं असावं असा आरोप डॉ. सामंतांवर आता केला जात आहे. त्यात बरंच तथ्य आहे. कारण रजिस्ट्रारनी डॉ. सामंताची मान्यता फेटाळून लावली आहे. पूर्वीसारखे कामगार डॉ. सामंतामागे असलेले दिसत नाहीत आणि अशा वेळीच करारही शेवटी जॉर्जकडूनच होत आहे. आहिरे किंवा सामंत या वेळी तसं नवीन काहीच करू शकत नाहीत. व्यवस्थापकावर रोष म्हणून त्यानी हे नियमानुसार काम हे आंदोलन सुरू केलेलं दिसतं.

या आंदोलनानुसार आता ड्रायव्हर ४० किलोमीटरपेक्षा वेगाने गाडी चालविणार नाही, तर कंडक्टर नियमाइतकेच प्रवासी बसमध्ये घेणार आहेत; पण डॉ. सामंतांचे कामगार असे किती दिवस करू शकतील ? काही दिवस ते असे काम करतील; पण शेवटी त्यानाच हे काम जमेनासे होईल. कारण शेवटी त्यांना जनतेला सामोरे जायचे आहे; नोकरीही करायची आहे. म्हणूनच ते स्वतःच पूर्वीसारखं काम करू लागतील. बेस्ट-कामगारांचा हाही लढा पूर्वीसारखाच फसलेला असेल !

—मोहन शं. कुलकर्णी

# वर्षानंतर काय केले ? तर अभिनंदन !

फिरोझ रानडे

'लोकशाही हक्क संरक्षण समिती' तर्फे दादरला आज संध्याकाळी काही सभा होणार आहेसे कळताच श्यामने त्या सभेला जावयाचे पक्के केले. असे ठावडतोब पक्के करण्यामागे दोन कारणे होती.

जरी जाहिरातीत म्हटलं नव्हतं तरी ही सभा मुंबईतल्या गिरणीकामगारांच्या वर्षभर चाललेल्या संपासंबंधी आहे असे श्यामला कळले होते. हे पहिले कारण.

तसं बघितलं तर श्यामसारख्या मध्यम वर्गातल्या माणसाचा व गिरणीकामगारांच्या संपाचा अर्थाअर्थी काही संबंध नव्हता आणि त्यानं ओढूनताणून आणावयाचा म्हटलं असतं तरी तो काय करणार होता ?

बरं एक गिरणीकामगारांचा का संप आहे ? दुसऱ्या किती तरी कारखान्यांत संप आहेत. आपल्या दोन्ही हाताच्या तळव्यांनी जीव–ज्योतीचं रक्षण करणाऱ्या जीवन–विमा लोकांचा संप आहे. ज्याचेवर bank करावे म्हणजे विश्वास ठेवावा त्या बँक-कर्मचाऱ्यांचा संप आहे. अगदी रस्त्यावरच्या झाडू-कामगारांचा आहे, तर आकाशात उडणाऱ्या विमान-चालकांचा संप आहे. दोन वर्षांपूर्वी ३५–४० हजार रुपये महिना कमावणाऱ्या United Nations मधल्या 'कामगारानी' संप केला होता. आता बोला !

आता बोला, म्हणजे काही बोलू नका ! आणि श्यामसारखा माणूस कोणत्याही संपाबद्दल काय बोलणार होता व करणार होता बरे ? प्रत्येकजण आपला संपावर जाण्याचा जन्मसिद्ध हक्क बजावत होता.

पण नाही म्हटलं तरी मुंबईच्या गिरणीकामगारांचा संप वेगळा होता. गेले वर्षभर दोन–अडीच लाख लोक संपावर होते. महात्मा गांधींचे नाव न घेता त्यांच्या शांतता व अहिंसक मार्गाने हा संप चालला होता.

आज दोन–अडीच लाख लोकांनी हिंसक मार्गाने जावयाचे ठरवले असते तर ?... तर...ह्या कल्पनेनेसुद्धा श्यामच्या अंगावर शहारे आले ! गेल्या १६ ऑगस्टला झालेल्या १ दिवसाच्या संपात काय गोंधळ झाला होता, ते मुंबई विसरली नव्हती व श्यामही विसरला नव्हता !

तेव्हा अशा शांततेने आपल्या हक्काकरता झगडणाऱ्या कामगाराकरता काही करण्याकरता जर सभा असेल तर आपण तेथे जावयास पाहिजे असे श्यामच्या मनाने पक्के केले.

पक्के करण्याचे दुसरे कारण म्हणजे सभेला दया पवार, एम. एस. सत्यू, सय्यद मिर्झा, विजय तेंडुलकर अशी नामांकित मंडळी हजर रहाणार होती.

ह्यातील प्रत्येकाविषयी श्यामला आदराची भावना होती. सत्यूनी 'गरम हवा' सारखा फाळणीनतरच्या मुस्लिम समाजाबावत मोठा धाडसी सिनेमा काढला होता. सय्यद मिर्झाच्या 'अल्बर्ट पिंटोको घुस्सा क्यूं आता है' ह्या लांबलचक नावावर जरी श्यामचा रोष असला तरी तो एक चांगला चित्रपट आहे असे श्यामचे मत होते. विद्यार्थी म्हणून मुंबईत सहा–सात वर्षं श्यामनं घालवली होती. त्याचे बरेच ख्रिश्चन मित्र–मैत्रिणी होते. त्या समाजाची दुःखं व त्यांना सलणारे प्रश्न त्याला माहीत होते.

दया पवारांच्या काही कविता मुख्यत्वेकरून त्यांचे 'बलूत' वाचून श्याम गलबलून गेला होता. दलितांवर होणाऱ्या व झालेल्या अन्यायास आपणही काही अंशी जबाबदार आहोत ह्याची जाणीव त्याला 'बलूत' मुळे सतत टोचत असे.

आणि विजय तेंडुलकराबद्दलच्या त्याच्या आदराबद्दल काय विचारावे ? त्यांच्या नाटयकृतीबद्दल त्याला विद्यार्थी असल्यापासून कौतुक होते.

तेंडुलकरांच्या 'नानां' वरच्या नाटकाला होणाऱ्या विरोधाला त्याचा विरोध होता. त्या नाटकाचे जर्मनीला वगैरे जायचे ज्या वेळी चालले होते त्या वेळी दिल्लीच्या मराठी मित्रमंडळात झालेली चर्चा त्याला अजूनी आठवते.

का कुणास ठावुक पण महाराष्ट्राबाहेर रहाणारे मराठी लोक जरा पातळ कातडयाचे असतात. आपली संस्कृती, आपला इतिहास जपला पाहिजे, आपले मराठीपण घट्ट धरले पाहिजे अशी त्यांची सतत भावना असते.

त्यामुळे नानांच्या चारित्र्यावर नुसते शितोडेच नव्हें तर शेण–गोळयाची बादलीच्या बादली ओतणारे तेंडुलकरांचे नाटक त्यांना कसे रुचावे ? ते तसे नाटक विलायतला जाणार आहे म्हटल्यावर रागाचा भडका उडाला त्यात नवल काय ?

अशीच एकदा काही मंडळी गप्पा मारत बसली असता 'घाशीराम कोतवाला' चा विषय निघाला. एका गोऱ्या–गोमटया 'स्थ' बाईने तेंडुलकरांवर अगदी कडाडून हल्ला केला. 'अशी नाटके परदेशी गेल्यामुळे आपल्या राष्ट्र–पुरुषाची नाचक्की परदेशात नाही होणार ? नानांबद्दलचा त्याचा आदर कमी नाही का होणार ? " हा त्या बाईंचा मुद्दा !

'पण ते जर्मन्स इतिहासाची पुस्तके वाचतातच की, त्याना काय नानांचे चरित्र माहीत नसणार ? ' श्यामने विचारले.

आता त्या बाईंना त्यावर उत्तर सुचेना. मग त्यांनी महाराष्ट्रात ठेवणीच्या वेळी वापरले जाणारे हत्यार काढले व ते म्हणजे तेंडुलकरांना 'स्थ' जातीविषयी कसा दुस्वास आहे, नाना जर त्यांच्या जातीचे असते तर त्यानी हे नाटक कधीही लिहिले नसते वगैरे वगैरे.

¤

आजची सभा ५॥ वाजताची होती तरी श्याम तेथे ५–१० वाजताच पोहोचला. नेहमीप्रमाणे कार्यकर्त्यांची लबलब चालली होती. लाउडस्पीकरवाला अगदी शांतपणे मायक्रोफोन लावत होता. ते झाल्यावर -७९

हयाच शांतपणे त्याने कर्णे लावायला सुरुवात केली. कार्यकर्ते त्याला घाई करत होते; पण तो आपला शांत होता.

एका कोपऱ्यात प्रकृतीने सुदृढ व बॉब-कट केलेल्या दोन तरुणी व प्रकृतीने फार सुदृढ नसलेले दोन दाढीवाले तरुण हळू आवाजात गाण्याची तालीम करत होते. तशाच बॉब-तरुणी व दाढी-तरुण काउंटरवर पुस्तके विकत होते, इकडे तिकडे फिरून काही विचारत होते, काही सांगत होते.

श्याम हॉलमध्ये गेला तर त्याला त्याच्या ओळखीचे एक वयस्क गृहस्थ भेटले. 'नमस्कार-चमत्कार' वगैरे झाल्यावर इकडचे तिकडचे बोलणे सुरू झाले. स्टेजच्या मागच्या भिंतीवर 'लोकशाही हक्क संरक्षण समिती' ची पताका लावली होती. तिच्याकडे पहात श्याम म्हणाला, 'का हो हक्कसंरक्षणाचा येथे काय संबंध? कामगार गेले वर्षभर आपला संपावर जाण्याचा अधिकार बजावताहेतच की!'

'काय की बुवा!' असे म्हणुन त्या बुवांनी आपली वादातून सुटका करून घेतली.

बॉब-तरुणी व दाढी-तरुणाची गडबड चालू होतीच. त्यांच्याकडे पहात ते गृहस्थ म्हणाले, 'श्यामराव, ह्या सोशलवर्क करणाऱ्यांचा एक class बनत चालला आहे. कोणत्याही पक्षाच्या वा गटाच्या कार्यक्रमांना हा बॉब-तरुणी व दाढी तरुणाचा गट असतो. मध्यम वर्गीय व सुखवस्तु!'

श्यामही पुष्कळ कार्यक्रमाना जात असे. त्याच्याही नजरेतून हा बॉब-दाढी गट सुटला नव्हता. तो म्हणाला, 'कदाचित् मध्यमवर्गाच्या लोकांना उसत जास्त मिळत असेल. कामगारांना वा दलितांना जसे जाळणारे प्रश्न आहेत तसे प्रश्न मध्यम वर्गाला आहेत कुठे? एक बरे ही मुले काही तरी समाजाचं काम तरी करताहेत.'

तोवर समितीचे मान्यवर अध्यक्ष म्हणजे विजय तेंडुलकर व बाकीची मान्यवर मंडळी मंचावर विराजमान झाली; पण त्यात कोणी कामगार वा कामगारपुढारी कसा नाही ह्याचा श्यामला अचंबा वाटला.

प्रथम श्री. सॅब्यास्टियन् नावाच्या कामगारांच्या कायद्याशी संबंध असलेल्या गृहस्थाचे भाषण झाले. त्यांनी कामगारांचे पगार वाढवून मागण्याचा, संप करण्याचा व युनियन स्थापन करण्याचा असे तीन मूलभूत हक्क आहेत म्हणून सांगितले. हा संप दत्ता सामंतांनी सुरू केलेला नाही. १५-२० हजार कामगार आधीच संपावर गेले होते. ते व इतर कामगार आपणहून सामंतांकडे गेले वगैरे सांगून गेले वर्षभर हा संप शांततेने चालला आहे. त्याचे सगळे श्रेय दत्ता सामंतांनाच आहे हे पण त्यांनी सांगितले.

नंतर सिने-दिग्दर्शक कुमार सहानी बोलले. काही कारणाने श्री. सत्यू आले नव्हते. सहानी मोठा सरळ व साधा माणूस वाटला. 'ह्या संपाकरता मी काही केलं नाही. त्यामुळं काही बोलण्याचा मला अधिकारही नाही; पण ह्या संपातल्या कामगारांना माझी सहानुभूती आहे!' एवढे बोलून त्यांनी आपले भाषण संपवले. भाषण देण्याकरता काही करावे लागते हे सहानींना कोणी सांगितले असेल बुवा?

दया पवार चांगलं बोलले. त्यांची तळमळ व समतोल वृत्ती त्या छोट्या भाषणातही दिसून आली. 'सगळ्यांचा मध्यम वर्गीय approach आहे. कोणताही प्रश्न घ्या, नामांतराचा घ्या, ह्या कामगारांचा प्रश्न घ्या, दलितांचा प्रश्न घ्या, हे प्रश्न दुसऱ्याचे आहेत अशी सर्वांची भावना असते.'

'अलबर्ट पिंटो' कार सय्यद मिर्झा बोलले, 'आम्ही आतापर्यंत ह्या लढ्याकरता काही केलं नाही. कारण आम्ही डरपोक होतो; पण आता आम्ही काही तरी करावयाचे ठरवले आहे!' श्याम म्हणाला, 'वा रे पठ्ठे! अशी काही तरी करू म्हणणारी मंडळी पुढे यायला पाहिजेत!'

मग प्रथम काही तरुणानी 'हा लढा रेटायेचा हाय रं' गाणे म्हटले व त्यानंतर दोन बॉब-तरुणींनी व दोन दाढी-तरुणानी त्याच तऱ्हेची गाणी म्हटली. जसा त्या दोन्ही गटाच्या गाण्यातला आवेश एक होता, तशीच कर्कशता पण एकाच पद्धतीची होती. कर्कशता हा त्यांचा जन्मसिद्ध हक्क आहे की काय? श्यामच्या मनातला प्रश्न.

सरतेशेवटी तेंडुलकर बोलले, 'आज आपण गिरणीकामगारांच्या संपाचा वाढदिवस साजरा करण्याकरता जमलो आहोत. खरं म्हणजे वाढदिवस हा आनंदाच्या गोष्टीचा, प्रसंगाचा व घटनेचा करावयाचा असतो. आज संपाला एक वर्ष झालं आहे. त्या अर्थी वाढदिवस हा शब्द!

ह्या शब्दाच्या ईश्वराला 'वाढ-दिवसा' ऐवजी योग्य शब्द सापडू नये ना? अहो, नुसता 'दिवस' शब्द वापरला तरी चालेल! असे सुचवावे असे श्यामच्या मनात आले. 'या वर्षभर संपावर असलेल्याचे मी अभिनंदन करतो' असे सांगून ते पुढे म्हणाले, 'आज येथे काही लेखक बोलले, काही चित्रपटातले कलावंत बोलले, काही कवींनी आपल्या कविता वाचून दाखवल्या, काहींनी गाणी म्हटली. त्यांच्या पद्धती वेगवेगळ्या असल्या तरी त्यांचा 'आवाज' एक आहे व तो आहे बंडाचा!'

थोड्या माणसांच्या हाती सत्ता व संपत्ती एकवटली आहे. त्यामुळे सामान्य जनाची निष्पाप भासणारी पिळवणूक चालली आहे.

पगार वाढवून मागण्यात काय गुन्हा आहे? हा संप कामगारांवर लादला गेला आहे, तो लांबवला गेला आहे व आता तो मारला जाणार आहे.

हे सगळे मताकरता चालले आहे. हा संप शांततेने चालला आहे त्याचे श्रेय डॉक्टर सामंतांना नाही, ते कामगारांना आहे.

'म्हणजे तिढा असा आहे तर' श्याम मनाशी म्हणाला. संपाला पाठिंबा आहे; पण डॉ. सामंतांच्या नेतृत्वाला नाही. संप यशस्वी झाला तर सामंतांचे महत्त्व वाढेल ह्या विचाराने काही लोक संप हरावा अशीसुद्धा प्रार्थना करत असतील नाही?

'आज समाजात एक राग आहे, एक उद्वेग आहे.' तेंडुलकर बोलत होते; 'पण लक्षात ठेवा हा राग एक दिवस वर उफाळून आल्याशिवाय रहाणार नाही.' असा लक्षात ठेवण्याकरता त्यांनी इशारापण देऊन ठेवला.

तेंडुलकर फार दाहक बोलले ह्यावर श्यामचे व त्या वयस्क गृहस्थाचे एकमत झाले.

'साहेब राजकारणात वगैरे पडणार आहेत की काय?' श्यामने विचारले.

'नाही, राजकारणात काही पडणार नाहीत.'

'नाही, प्रथम त्यांनी 'वाढदिवसा' बद्दल कामगारांचे अभिनंदन केले व आता हा राग उफाळून आल्याशिवाय रहाणार नाही असा ठणठणीत इशारा पण दिला म्हणून वाटले.' श्याम आपले काही चुकले ह्या कल्पनेने चाचरत म्हणाला.

'आपल्या हिंदुस्थानची हीच तर खुबी आहे बघा.' वयस्क श्यामला समजून सांगण्याच्या स्वरात म्हणाले, 'अगदी असे भाषण अगदी महाराष्ट्र सरकारच्या कोण्या मंत्र्यानेही केले असते.'

खरंच वर्षानंतर भरलेल्या सभेत समितीने केले काय? तर कामगाराचे अभिनंदन! □

मुंबई वार्ता

# ‘ मैत्रिणी ’

## एक मानववंशशास्त्रीय चर्चा

‘स्त्री’च्या मूलभूत प्रवृत्ती–मानववंशशास्त्राच्या आधारे चर्चा’ हा विषय ‘मैत्रिणी’च्या नुकत्याच झालेल्या बैठकीमध्ये चर्चेला आला. तसे ‘चर्चा’ इत्यादि शब्द जरी विषयामध्ये समाविष्ट असले, तरी विषय इतका तांत्रिक होता की, त्यावर फार मैत्रिणी चर्चा करू शकल्या नसत्या आणि जरी तशी झाली असती, तरी ती बहुधा विद्वज्जड आणि अभ्यासू साक्षी–पुरावे अशीच झाली असती. त्यामुळे या कार्यक्रमात छाया दातारांनी, आपण या विषयावर केलेल्या वाचनाचा – अभ्यासाचा – निष्कर्षांचा गोषवारा दिला.

‘मैत्रिणी’च्या आजवरच्या चर्चा या बहुधा व्यावहारिक स्वरूपाच्या आणि रोजच्या जीवनातले प्रश्न घेऊन त्यांची चर्चा करणाऱ्या होत्या. या पार्श्वभूमीवर मानववंशशास्त्रीय विचार कदाचित रुक्ष आणि तांत्रिक बनण्याचा धोका होता; पण छाया दातारांनी हे विचार निवडकपणे, समर्पक मांडले आणि आजवर इथे झालेल्या विचारांना एक नवीन दिशा, नवं परिमाण मिळालं. प्रत्येक मैत्रिणीला स्वत:बद्दल, जगाबद्दल काही तरी नवीन कळल्याचं, विचारांना नवं वळण लागल्याचं समाधान त्यातून मिळालं असावं.

आपल्या भाषणात छाया दातार म्हणतात– स्त्री–पुरुष समानतेला सर्वांत मोठं आव्हान बहुधा वैद्यकीय विद्यार्थ्यांकडून दिलं जातं. त्यांच्या मते जीवशास्त्राच्या आधारावर अशा कुठल्याही समानतेचा दावा हाणून पाडता येईल. स्त्रीमध्ये दोन अशा गोष्टी आहेत की, ज्यामुळे ती समानतेच्या पातळीपर्यंत येऊच शकत नाही. यापैकी पहिली तिची शारीरिक दुर्बलता (अर्थात पुरुषाशी तुलना करता) आणि दुसरं तिचं गर्भाशय–तिची अपत्यजन्माची क्षमता किंवा निराळ्या शब्दांत अपत्यधारणाची आणि जन्माची निसर्गानं तिच्यावर केलेली सक्ती. याखेरीज पाच अशा स्वभावधारणा आहेत की, ज्यांना जीवशास्त्रीय आधार आहे आणि ज्यांचं नियमन अंत:स्रावांनी हार्मोन्सच्या पातळीनं होतं. त्या स्वभावधारणा अशा– १) आक्रमकता २) बुद्धिमत्ता ३) महत्त्वाकांक्षा ४) परावलंबित्व ५) जोपासना. (इथे दुसऱ्याची जोपासना सांभाळ करण्याची वृत्ती अपेक्षित आहे.) यापैकी सर्व स्वभावधारणा स्त्री आणि पुरुषांमध्ये कशा प्रमाणात असतात याविषयीचे समज (अथवा गैरसमज !) पुष्कळ रूढ आहेत आणि त्याचा इथं नव्यानं उल्लेख करण्याची आवश्यकता नाही.

आता या स्वभावधारणा जशा घडल्या तशा त्या का घडल्या याचं उत्तर जीवशास्त्राच्या आधारे मिळतं हे ठीक; पण समाजाच्या–सिविलायजेशनच्या उत्क्रांतीचा इतिहास पाहिला तर त्यातूनही काही घटितांचं–कारणांचं दिग्दर्शन होतंच. सर्वात आदिम समाजव्यवस्था काय असावी ? बहुधा स्त्रिया आणि त्यांनी जन्म दिलेली मुलं ही एकत्र रहात असावीत आणि टोळ्याटोळ्यांनी हिंडत असावीत. काही विद्वानांच्या मते सर्वांत पहिली कुटुंबव्यवस्था ही मातृसत्ताक पद्धतीची होती आणि हे खरं वाटायला पुष्कळच जागा आहे. कारण जोपर्यंत अपत्यजन्मातलं पुरुषाचं कार्य स्पष्टपणे ध्यानात आलेलं नसेल, तोपर्यंत स्त्रीनं जन्म दिलेली मुलं तिचीच मानणं आणि त्या सर्वांनी बनलेल्या कुटुंबानं तिच्याच सत्तेखाली राहणं हे सयुक्तिकच वाटतं.

या काळामध्ये उदरभरणाचे मार्ग मर्यादित असावेत. कारण तेव्हा शिकारीचा शोध लागलेला नव्हता. तेव्हा उपलब्ध अन्न गोळा करणं, फळं, कंदमुळं जमवणं, साठवणं हा प्रमुख उद्योग असावा. टोळीनं हिंडणाऱ्या बायकांनीच समाज वसवला असावा असं मानायला पुष्कळच जागा आहे. कारण शारीरिक जबाबदाऱ्यांमुळे दुर्बलतेमुळे त्या बऱ्याच कमी भटक्या असल्या पाहिजेत. एका जागी स्थिर होऊन समाज वसवण्याबरोबर शेतीचा शोध येतो आणि त्याचंही जनकत्व स्त्रियांकडे असण्याची शक्यता आहे. समाज वसवण्यासाठी एकमेकांना धरून रहाण्याची वृत्ती, परस्पर सहकार्य याची नितांत आवश्यकता असते आणि समाज वसवण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या स्त्रीला याचं श्रेय द्यावं लागेल.

स्त्रिया आणि सहकार्य ? असं म्हणून बऱ्याच मनात भलं मोठं प्रश्नचिन्ह उभं रहाण्याची शक्यता आहे; पण स्त्रिया आणि परावलंबित्व हे समीकरण सुरकुती न पडता मान्य होत असेल, तर सहकार्य आणि परावलंबित्व एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हे विसरून चालणार नाही.

दुसरं असं की, अन्न गोळा करण्याच्या कामात शक्तीचा असा खूप कुठे वापर नाही. म्हणजे निसर्गानं बहाल केलेल्या स्वरूपात आणि सामर्थ्यात यथास्थित जगण्याची स्त्रीची क्षमता इथे जाणवते.

### अशाही शक्यता !

यापुढच्या सामाजिक उत्क्रांतीच्या गुंतागुतीच्या प्रक्रियेचा अनेक पातळ्यांवर विचार करायला हवा. एंगल्सच्या सिद्धान्तानुसार, जोपर्यंत माणूस रोज कमवून तेवढं सर्व खात होता, तोपर्यंत कोणी कोणापेक्षा कमी-अधिक नव्हतं; पण माणसाचं कौशल्य वाढलं, रोजच्या गरजेपेक्षा तो अधिक कमवू लागला म्हणजे संपत्तीचा संचय झाला आणि त्याबरोबर तो साठवणाऱ्यांकडे सत्ता आली आणि यातूनच वर्गनिर्मिती झाली. भारताच्या संदर्भात बोलायचं, तर यातून जातीची निर्मिती झाली. सर्वसामान्यपणे वर्गभेद, जातिभेद आणि लिंगभेद आणि त्यामध्ये असमानता मानण्याला एकाच सुमारास प्रारंभ झाला.

एका मतप्रणालीनुसार, समाज अन्न गोळा करून खाण्याच्या अवस्थेतून पुढे सरकला. माणूस पशुपालन–पशुसंवर्धन करू लागला आणि इथे पुरुषी वर्चस्व वाढीला लागलं. एक तर पशु पकडणं इत्यादी कामासाठी शारीरिक ताकदीची अधिक आवश्यकता होती आणि ती पुरुषाकडे अधिक प्रमाणात होती. दुसरं म्हणजे पशुपालन आणि संवर्धन करताना पुरुषाला अपत्यजन्मामध्ये नराचा असलेला सहभाग कळून आला. यातून कुटुंबावर, अपत्यावर मालकीहक्काची भावना आली. पळवापळवी, बलात्कार इत्यादी गोष्टींना इथून सुरुवात झाली असली पाहिजे.

एल्विन रीड यांच्या मते वधूची किंमत

ब्राइड प्राइस देऊन तिला घरी घेऊन जाण्याची प्रथा इथे सुरू झाली. याअगोदरची परिस्थिती अशी होती की, मातृसत्ताक कुटुंबपद्धतीत स्त्री टोळीची–कुटुंबाची नायक आणि शेताची मालक असे. सपिंड–निषिद्धता हा अगदी सुरुवातीला अस्तित्वात आलेल्या नैतिक नियमांपैकी एक असला पाहिजे. म्हणजे या स्त्रीचे संबंध येणार ते आपल्या टोळीबाहेरच्या पुरुषांशी. साहजिकच अशा संबंधांची संख्या केवळ एकावर मर्यादित असेल असं मानण्याच काही कारण नाही. एका स्त्रीचे कितीही संबंध–नवरे असू शकतील. ही माणसं येऊन, संबंध ठेवून आणि त्या बदल्यात काही मोबदला देऊन जात असावीत. दुसरं म्हणजे या परिस्थितीत अपत्याच्या पित्याचं जनकत्व ठरवणंही कठीणच जात असणार. म्हणूनही जननक्षमतेचं श्रेय बहुतांशी स्त्रीला दिलं गेलं असावं. स्त्रीचं उदात्तीकरण, देवताकरण जिथे जिथे केलेलं आढळतं, त्या सर्वांमधून तिच्या या क्षमतेचा गौरव केलेला आढळतो. शाकंबरी, लज्जागौरी इत्यादी देवतांचं पूजन, योनिपूजा इत्यादी परंपरा ही ठळक उदाहरणं आहेत किंवा रजस्वला स्त्री अस्पर्श मानण्याची (आणि त्याला विकृत स्वरूप देण्याची) प्रथा तुलनात्मकरीत्या अलीकडची असावी. कारण अशा स्त्रीचा गौरवही केलेला आढळतो. नॉर्थ अमेरिका, कॅनडा इत्यादी भागात अशा स्त्रीचं रक्त शिंपून पिकावरची कीड जाते अशी समजूत आढळते.

- पुरुषाला स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव झाल्यावर काय झालं? आतापर्यंत येऊन मोबदला देऊन स्त्रीशी संबंध ठेवून जाणाऱ्या पुरुषानं वधूकिंमत देऊन त्या स्त्रीला ठेवूनच घेतलं असलं पाहिजे. ही स्त्री आणि तिची मुलं मला हवीत (कारण मनुष्यबळ म्हणजे संपत्ती) आणि त्यासाठी ही वधूकिंमत मी चुकती करतो आहे, अशी यामागची विचारसरणी आहे. अगदी नियोगपद्धतीतसुद्धा दुसऱ्या पुरुषाशी संबंध ठेवून त्या स्त्रीला होणारी मुलं ही तिच्या नवऱ्याची मालमत्ता मानली जाई.

हा झाला सामाजिक उत्क्रांतीचा निवडक आढावा. विशिष्ट प्रकारच्या सामाजिक घटनांमधूनही पुरुषी वर्चस्व वाढीला लागलं किंवा स्त्री आणि पुरुष यांच्या स्वभावधारणांची ठराविक प्रकारे वाढ झाली असं समजायला भरपूर पुरावा उपलब्ध आहे. स्वभावधारणांची मीमांसा जशी जीवशास्त्रीय-दृष्टिकोनातून करता येते, तशी तिच्या उपपत्तीमध्ये सामाजिक परिस्थिती–कंडिशनिंग संस्कार यांचाही मोठा वाटा आहे. जोपासना ही जी स्वभावधारणा स्त्रियांना 'आतून' येते असं मानलं जातं, तिच्याबाबत चिंपाझीवर केलेले प्रयोग लक्षणीय आहेत. कळपापासून लहानपणीच अलग करून एकांतवासात ठेवलेल्या चिंपांझी मादीला आपल्या पिलाची जोपासना करता आली नाही. कारण तसे संस्कारच तिच्यावर झाले नव्हते. म्हणजे 'नेचर अँड नर्चर' या दोन्हीचाही स्वभावधारणा घडवण्यात हातभार आहे.

या जीवशास्त्रीय विवेचनाच्या संदर्भात एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी ती अशी : जीवशास्त्राचा अभ्यासक फक्त जीवशास्त्रीय तथ्यं देऊ शकतो; पण या तथ्यापासून निष्कर्ष काढण्याचे किंवा त्यात बरे–वाईट ठरवण्याचे, मूल्यमापन करण्याचे अधिकार मात्र त्याचे नाहीत. अमुक स्वभावधारणा कमी दर्जाच्या आणि अमुक अधिक दर्जाच्या हे तो म्हणू शकत नाही. एक तर जीवसृष्टीच्या सातत्याच्या दृष्टीनं प्रत्येकाचं एक महत्त्वाचं स्थान आहे आणि त्यांच्या कमीअधिक प्रमाणांनाही काही साधायचं आहे.

गर्भाशय ही स्त्रीच्या पायातली बेडी मानली जाते; पण या गर्भाशयात गर्भधारणा करून ती बेडी बनवणारा (जर ती बेडीच मानायची असेल तर) पुरुषच. म्हणजे इथेही दोघांचा सहभागच निसर्गाला अपेक्षित आहे. तर मग असमानतेचा प्रश्नच कुठे येतो?

मानववंशशास्त्रीय चर्चा मुख्यतः अॅकॅडेमिक आस्थेची आहे हे तर खरंच; पण त्या चर्चेनं जी तात्त्विक बैठक मिळते ती नाकारता येणार नाही. स्त्रीमुक्तीवर विश्वास ठेवणाऱ्याच्या किंवा माणूस म्हणून स्त्री-पुरुष समान आहेत असं मानणाराच्या विचारसरणीत कुठे तरी असं गृहीत धरलेलं असतं की, स्त्रीनं मुक्त असणं हे कृत्रिम आणि आधुनिकतेचं खूळ नव्हे किंवा स्त्री–पुरुषांमध्ये माणूस म्हणून समानता असणं ही समाजव्यवस्था उलटून लावण्याची निसर्गविरोधी बेजबाबदारीही नव्हे, तर ही मुळी नैसर्गिक अवस्थाच आहे. स्त्री–पुरुष समानता आणि त्यांचं सहकार्य हीच मुळी नैसर्गिक गोष्ट आहे. या गृहीतकृत्याला मानववंशशास्त्राचा अभ्यास पाठबळ देतो की नाही हे समजून घेणं त्यांना तात्त्विकदृष्ट्या आणि नैतिकदृष्ट्या बळकटी आणणारं ठरतं.

—ललिता बर्वे


**दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारे**
**गोष्टीरूप आंबेडकर चरित्र**

सर्व मराठी मुलांच्या हाती हा 'कथा-संग्रह' देणे योग्य ठरेल ! दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारा हा स्फूर्तिदायक कथा-संग्रह संस्कारक्षम मुलांना अत्यंत उद्‌बोधक वाटेल. इतिहासाचे सर्जनशील साहित्यात कथारूपाने जे रूपांतर होते ते सिद्धहस्त लेखक कसे सोन्यासारखे करून दाखवितो त्याचा पुरावा बागुलाच्या या गोष्टीरूप चरित्रातून मिळतो.

**—रा. ग. जाधव**
(केसरी, रविवार, ६–१२–८१)

# आंबेडकर भारत

**लेखक : बाबुराव बागुल**

**राजहंस प्रकाशन, पुणे.** मूल्य : २० रुपये.

# माडगूळकरी साहित्य, त्यातला तो चमकदार कोपरा !

प्रा. डॉ. श्रीरंग संगोराम

'नाद आणि दृश्य यांच्या जाणिवा ह्या माझ्या लिखाणाचा मला भावलेला विशेष आहे.' ५७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष श्री. व्यंकटेश माडगूळकर यांचा स्वतःच्या साहित्याबद्दलचा ह्या निर्वाळा त्यांचे साहित्य आवडीने वाचणाऱ्या असंख्य मराठी वाचकांना मनोमन पटेल आणि त्याचबरोबर त्यांच्या 'कर्णचक्षूं' पुढं सहज आठवावी अशी किती तरी उदाहरणं तरळून जातील. 'डाव्या हातानं कोटाची कॉलर आणि उजव्या हातानं धोतराचा सोगा धरून मागून कुणी तरी सारखं ढकलत असल्यासारखा तो रस्त्यानं चालायचा. (रघू कारकून)', 'सकाळी खाला 'वरावरा' हिंडून शेण घेऊन आली आणि आमची खोली तिनं 'चकपक' करून दिली.' (तांबोळ्याची खाला), 'कोंडिबानं खोंडागत आपली गर्दन फिरवली आणि बायकोला डाफरलं' – (कोंडिबा गायकवाड), 'बंडा न्हाव्यानं दम देताच 'करणी' करणारा धोंड्या लेंगटा तांबारलेल्या डोळ्यांनी बंडाकडे टक्काटक्का बघू लागला.' 'देवी-डॉक्टर पोराटकी होता. मूळचा जरा उत्तानखाट स्वभावाचा', पाटील, कुलकर्णी इत्यादी मंडळी साहेबाच्या या सरबत्तीनं अच्यारी की बिच्यारी झाली.' (देवा सखा महार), अशी एक ना अनेक उदाहरणं देता येतील; पण खरं सागायचं तर माडगूळकरांचं अवघं लेखनच सपूर्णात एक उदाहरण आहे. 'भुताचा पदर' मध्ये 'नाना बामणाकडे पाच वर्षांची कुलकर्णीपणाची पाळी आली आणि त्या बहाद्दरानं एकदम पलट खाल्ली. बोकांडी बसलेल्या गरिबीला झिंजाडून टाकली.' असं जेव्हा ते लिहितात तेव्हा नेमक्या शब्दांचा नेमका उपयोग करण्याची त्यांची खास लकब डोळ्यांत भरते. 'माझं आजोळ हे एक अति डामरट गाव आहे.' या वाक्यातील 'डामरट' शब्द कसा सर्वगुणसंपन्न बनून आलेला आहे ते आपल्याला लगेच जाणवतं आणि हे निसर्गवर्णनही असंच रूप–स्पर्श–गंध–स्वादमय आहे. 'जिराइतातील बाजरी हळूहळू वाढली. पोटरीतून लांब दांड्याची घोलाटी कणसं बाहेर पडली. ...लवकरच फुलोऱ्यानी डवरलेली कणसं बाजरीच्या चमकदार दाण्यांनी टचटचली, चिवलाचे थवे भरात येऊन ते दुधाने भरलेले दाणे खाऊ लागले.' (बनगरवाडी) 'वाऱ्याच्या थंडगार झुळका येऊ लागत. येताना कधी गुराख्यानं सोवत्याला घातलेली उंच साद बरोबर आणत. लिंबाच्या डहाळ्या कुजबुजू लागत' (गोष्टी घराकडील). तर अशी ही वाचकाच्या सर्व ज्ञानेंद्रियांना उत्तेजित करणारी माडगूळकरांची शब्दकळा हे त्यांच्या साहित्याचं सर्वांत लक्षणीय असं वैशिष्ट्य आहे, हे त्यांची एखादी कथा वाचून कुणाच्याही सहज ध्यानात येईल.

साहित्यसमीक्षेमध्ये 'शैली' बद्दल खूप गंभीर, गुंतागुंतीचे व खोल बोलले जाते; परंतु या शैलीचे स्वयमेव उदाहरण झालेल्या माडगूळकरांनी तिला आपल्या सहजसाध्य बोलक्या भाषेमध्ये 'नाद आणि दृश्य यांच्या जाणिवा' या एका सुटसुटीत सूत्रात गोवून टाकले. खरे तर साहित्यसंमेलनाध्यक्षांनी अधिकारवाणीने पुन्हा एकदा साहित्याच्या साहित्यपणाकडे सर्वांचे लक्ष वेधून घेतले. आज आशयाच्या आसक्तीमुळे आपली समीक्षा मुख्यार्थप्रतिपादक बनू पाहात आहे. आशयाला साहित्यपण मिळाले नाही तर नकली घोषणा आणि प्रचारकी प्रवचनच वाचकांच्या पदरी पडायचे. व्यंकटेश माडगूळकरांचे साहित्य या दृष्टीने निर्मळ राहिलेलं आहे. त्यांनी आपल्या कथासाहित्यातून जगण्याचा अस्सल गंध असलेली पात्रं निर्माण केली आहेत. गावच्या सरावन्यानं (श्रावणानं) आपल्या रानातून कणसं नेली म्हणून त्याची पाठ उघडी करून त्याला हुरडा झोडपल्यागत झोडपणारा, आपल्या मोठ्या भावाला झोपल्या अवस्थेत डोक्यात धोंडा घालून मारणारा आणि हातकड्यानिशी जाताना रडण्याबद्दल बायकोवर डाफरणारा धोंडिबा गायकवाड म्हणजे राक्षसीपणाचा अस्सल नमुनाच! नवऱ्यानं दगा दिल्यावर स्वावलंबनानं जीवन कंठणारी आणि 'यंकट' वर खऱ्या मावशीहून अधिक प्रेम करणारी तांबोळ्याची खाला, आपल्या पुतण्याला नवा कोट देऊन त्याचा आनंद उपभोगण्यासाठी आटपाडी ते कुंडल असे ६०–६५ मैलांचे अंतर पायी तुडवून येणारा 'अंतःकरण' चा 'बिटाकाका', बायकोवरील संशयावरून अफू खाऊन मरणाला घाबरलेला आणि त्या दिव्यातून सुटका झाल्यावर कणाकणानं मरण्यासाठी जगणारा रघू कारकून अशी किती तरी 'जिवंत' पात्रं या माडगूळकर–विश्वात आपल्याला भेटतात. बाबाखान दरवेशीबरोबर झालेला हा लेखकाचा संवाद पाहा–

'अरे गृहस्था, एवढ्याशा कारणावरून बायकोला ढोरासारखा तुडवतोस आणि काल ते जनावर (अस्वल) पोटच्या पोराला जीवं मारत होतं, तर त्याला चार बोटांनी शिवलासुद्धा नाहीस?'

'हुजूर, बायको काय एक मेली तरी दुसरी मिळल; पण जर का रागाच्या तावात हाणलं असतं आणि वर्मी टोला लागून जनावर पटकन मेलं असतं तर कुणाला विचारायचं होतं? शिकलंसवरलेलं जनावर मिळणं कठीण आणि ते हाय म्हणून जगतोय्!'

माडगूळकर साहित्यिक चित्रकार आणि चित्रकार साहित्यिक आहेत आणि म्हणूनच आपल्या कथा आणि पात्रे यांच्या निर्मितीमध्ये त्यांना एक नेमकी लय गवसलेली आहे आणि ती त्यांनी अगदी लीलया सांभाळली आहे. त्यांची कथा अगदी सहज स्वाभाविकपणे सुरू होते आणि एक विशिष्ट आकृतिबंध प्राप्त झाला म्हणजे आपोआप थांबते. त्यात कुठेही असंतुलितपणा (imbalance) दिसत नाही. कारण त्यांच्या हातून जे 'घडत' असते ते कलात्मक पातळीवर घडत असते. त्यात मनोरंजनाचाही विडा उचललेला नसतो

आणि ' शहाणे करून सोडावे सकळ जन ' असा आविर्भावही चुकून नसतो.

## देवा सटवा महार

आपल्या जीवनयात्रेत भेटलेल्या उपेक्षितांची दु:खं माडगूळकरांनी नाद, दृश्य आणि लय यांच्या जाणिवा जागत्या ठेवून मांडल्यामुळेच ती आपल्यापर्यंत खोलवर पोचतात. लेखक मैलाचे दगड रंगवायच्या कामाला गेला आहे आणि मैलाच्या दगडाचा कुली–रामा मैलकुली त्याला भेटतो. या भेटीचीच एक कथा बनून जाते आणि रामाचं दुखरं आयुष्य आपल्याला अस्वस्थ करून टाकतं. देवा सटवा महार ( १९४८ ) ही त्यानी ऐन एकविसाव्या वर्षी लिहिलेली कथा किती ताकदवान आहे ! दलितांच्या दुःखाची दारुण कहाणीच आहे ती. देवा महार अंग मोडून काम करणारा, सवर्णांच्या फुकटच्या फर्मानांना 'झुकापुरी ' न देणारा आणि गावचा व्याप सांभाळून सरकारी कामातही कधी कुचराई होऊ न देणारा. दासवृत्तीला अखंड जागावे असा त्याचा बाणा. आज गावात देवी काढायला डॉक्टर आला आहे आणि देवा महारावर गावभर वर्दी देऊन लहान मुलांना चावडीवर हजर करण्याची कामगिरी आहे. इमानेइतबारे दिवसभर उपाशीपोटी, फुकटच्या हुकमाची इतर कामं करीत तो सर्वत्र वर्दी दे–देऊन येतो. माणसं जमत नाहीत. पोरसवदा डॉक्टरसाहेब वाईट-साईट शिव्यांची लाखोली त्याच्यावर वाहतो आहे. पुढं वर्णन असं आहे–

' काठीच्या टोकावर टेकलेल्या दोन्ही हाताच्या पंजावर हनुवटी ठेवून देवा टक लावून साहेबाकडे पाहात होता. बघता बघता त्याचे डोळे वटारले, तांबडेलाल झाले. नाकपुड्या फुरफुरू लागल्या. दाता वर दात घट्ट बसले आणि दंडांना कापरे भरले. डागदर ओरडला– ' ऐकतोस काय भैंचोद–'

' देवा सटक्याने खाली वाकला आणि पायातले धुळीने भरलेले तुटके पायताण उपसून घेऊन ओरडला, ' अरं ए बाबलीच्या, चावडीचं जोतं उतरून खाली ये. शिव्या देनारं तुजं थोबाड फोडतो ह्या तुटक्या जोड्यानं !' पुढे देवाची रवानगी तुरुंगात होते. लेखक म्हणतात– ' राणी मोलमजुरी करून पोरेबाळे जगवते आहे. तराळकी दुसऱ्या महाराकडे गेली आहे, तडवले गाव व्यवस्थित नादते आहे. ' पुढे ते असेही लिहितात की, या सज्जन महाराचं काय झालं याची बिलकुल माहिती नामदार आंबेडकराना नाही आणि कधी होईल याचा संभव नाही. साहित्याची मर्यादा इथेच संपत असते आणि माडगूळकरही इथेच थांबतात. ' या थाबण्या 'त त्यांचं यश साठवलेलं आहे आणि या यशाला साहित्यसमेलनाचं जाहीर शिक्कामोर्तब मिळत आहे ही खरोखर अस्सल साहित्याचं बळ वाढवणारी स्वागताई घटना आहे.

परंतु वाचकाला प्रेमात पाडणाऱ्या त्यांच्या आणखी एका वैशिष्ट्याकडे लक्ष वेधल्यावाचून राहवत नाही. व्यंकटेश माडगूळकरांच्या साहित्यात नाद, दृश्य आणि लय याच्या जागत्या जाणिवेबरोबरच एक प्रकारचा प्रसन्न खेळकरपणा आपल्याला आपसुक आकर्षून घेतो. त्याच्या या प्रसन्न खेळकरपणाला मिस्किलपणाची एक मनोहर झालर आहे आणि कधी. कधी यामध्ये स्वाभाविकतेलाही लाजविणारा प्रसंगनिष्ठ आणि स्वभावनिष्ठ असा आणि क्वचित कारुण्याची कड असलेला विनोद जेव्हा आपली हजेरी लावतो तेव्हा पंचरसयुक्त कलामृताचा आस्वादच चाखायला मिळतो. प्रसन्न, खेळकर आणि मिस्किल वर्णनशैलीचा एक नमुना ' विलायती कोबडी ' या कथेत पाहण्यासारखा आहे. जातिवंत कोंबड्यांची पैदास करण्याकरिता सरकारने एक जोडी पाटलाच्या ताब्यात दिली आहे. 'तशीच कोंबडी ! स्वरूपानं देखणी, पण सुखावल्यामुळं अंगानं सुटलेल्या अंमलदाराच्या बायकोसारखी, नवऱ्याच्या अंगचटीला न येता पोक्तपणे तीही दाणे टिपीत होती. मान बाहेर काढीत होती, आत घेत होती. डौलात चालत होती. ' आता पुढील संवाद पाहा– राणूचा महादा खाकरून डाव्या बाजूला थुंकला आणि हलकेच म्हणाला,

' इलायती बेणं आणलं काय पाटील ?'

डोळा वर करून पाटील म्हणाला, ' काय म्हणालास ?'

' बेणं इलायती आणलं काय ?'

' हा हां !'

एवढा होकार देऊन पाटील पुन्हा पाखरांकडे अदबीनं बघू लागला. बोकडं चारण्यासाठी रानात निघालेला मुसलमानाचा पोरगा बराच वेळ मनात घोळत असलेली गोष्ट बोलला.

' महादा, चार शेर मटण पडल का या कोंबड्याचं ?'

' बाइली, कुण्या देशाची जात बरं ? व्हय सोपाना ?'

' इलायती न्हवं म्हणतो मी. जपानी जात असावी. '

' ते काय हाय रं मुसलमाना ?'

' मुलुख हाय. तिकडची असावी ही जात !'

हे असंच खेळकर, मिस्किलपणाचं वातावरण शेवटपर्यंत या कथेत आहे आणि या कथेतील प्रसंगनिष्ठ विनोदानं धमाल उडवून दिली आहे. दप्तर तपासण्यासाठी आलेल्या मामलेदारानं पाटलाला खूप खूप फैलावर घेतलं. ' मकेच्या लाह्या उडाव्या तसा साहेब बोलला. धामाधूम झाला. पाटलाची हवेलडी उडाली. कुलकर्णी मात्र वरून घाबरल्यासारखा दाखवत होता आणि मनाशी म्हणत होता, ' तुझ्यासारखे पाच मामलेदार गेले राया आजपर्यंत ! बोल ! बोललास म्हणून भोकं पडत नाहीत माझ्या अंगाला !' इथे पाटील आणि कुलकर्णी यांच्या स्वभावातील फरक कसा मिस्किलपणे सूचित केला आहे ते पाहावे. पुढे मामलेदाराचा पट्टेवाला पाटलाला सल्ला देतो– ' जेवण करा झक्कास. मुर्गी घस्काटा एखादी. ' पाटील घरी हुकूम सोडतो. जेवण उत्तम होतं. पाटील बायकोला शाबासकी देतो. त्यावर त्याच्यात ही भाषा होते–

' बरा सोकावलास म्हणावं सायबाला ! कोबड्या मागतोय् ! आमच्या कोंबड्या न्हाईत चागल्या, तुज्याच खा म्हणावं !'

' असं ग कसं म्हणावं ?'

' तर काय करता ? रोज तुमचा साहेब ईल आणि कोबडी मागल. माझ्या खुराड्यात कोबडी न्हाइल का अशानं ? आज केलेली कोबडी आपली नव्हती !'

आणि यातून जो घोटाळा घडतो तो किती बहारीचा असणार हे सांगायला नकोच.

अशा प्रकारच्या प्रसंगनिष्ठ विनोदाचं उदाहरण आपल्याला ' आजीला सापडलेला चोर 'मध्येही सापडतं. ' मारुतराया ' ही तर माडगूळकरांच्या कथाकथनात हमखास टाळी घेणारी आणि मनमुराद

हशा पिकवणारी गोष्ट! मारुतरायामधील हे हास्य उथळ नाही. त्यात मनुष्यस्वभावाची पारख आहे, जनावराच्या असहाय स्थितीचं चित्रण आहे आणि त्याच वानराचं मंदिर बांधणाऱ्या माणसांवर उपरोधिक कटाक्षसुद्धा आहे. माडगूळकराच्या काही काही 'विनोदकां'मध्ये हा उपरोध कमालीचा टोकदार बनून येतो आणि आपल्याला हसवत हसवत चिमटेही काढत असतो. 'पांढऱ्यावर काळे' या त्यांच्या 'केसरी'तून प्रकाशित झालेल्या लेखमालेमध्ये अशा प्रकारच्या विनोदाचे मासले मिळतात. त्यात 'विनोदाचे इंद्रिय' नसलेल्या माणसाचा जो किस्सा सांगितला आहे तो अगदी तडाखेबंद आहे! गच्चीवरील गप्पामध्ये विनोदी किस्से सांगितले जात आहेत. एकाने इलेक्ट्रिक मासा पाळला; पण तो खंगू लागला. तेव्हा माहितगाराच्या सल्ल्यावरून त्या माणसानं मादी आणून सोडली. तरीही मासा वाळतोच आहे. शेवटी माश्यानंच सांगितलं—'मालक, तुम्ही आणलेली मादी 'डीसी' निघाली. मी 'एसी' आहे!' यावर तुफान हशा पिकला. तरी एक सद्गृहस्थ गंभीरच बसलेला. त्यानं लेखकाला विनोद समजावून सांगायची विनंती केली; पण त्याला टाळून पुढं लेखकानंच आणखी एक विनोद सांगितला. तुफान डोकं दुखणाऱ्या माणसाला तपासताना डॉक्टरांनी विचारलं की, 'तुम्ही पायाला फडकं कसलं गुंडाळलं आहे?' त्यावर तो म्हणतो, 'ते डोक्यावरून घसरून खाली आलं आहे.' यावर हशा पिकतो तेव्हा तो सद्गृहस्थ आणखीनच अस्वस्थ होतो आणि लेखकाला 'छळू' लागतो. इतका की रात्री फोनवरूनदेखील विचारतो. याचं कारण असं असतं की, तो फर्स्टक्लास ऑफिसर असतो. त्याला अनेक लोकांशी बोलताना विनोदाचा उपयोग करायचा असतो—वगैरे. यात कडी पुढेच आहे. लेखक हे सर्व लिहून एका विनोदी मासिकाच्या संपादकाला देतात. तो मनमुराद हसून गोष्ट स्वीकारतो आणि उठताना हळूच विचारतो—'खरंच त्या पट्टीचं नेमकं काय झालं होतं?' या 'पांढऱ्यावरील काळ्या'मध्ये विनोदाचा साधन म्हणून उपयोग करणाऱ्या हिशेबी माणसांवर आणि विनोद कशाशी खातात हे न कळणाऱ्या संपादकावर लेखकानं अचूक शरसंधान केलेलं आहे. त्याचप्रमाणे 'रस्ता एक चिंतन' या लेखात कॉर्पोरेशनच्या रस्ता सतत उकरण्याच्या पद्धतीवर झणझणीत उपहासास्त्र लेखकानं सोडलेलं आहे. लेखकाला रस्ता उकरण्याची तीन कारणं सांगण्यात येतात—(१) ग्रामीण मजुराला मूलोद्योगाकडे वळविणे, (२) बेकारीची समस्या सोडविणे, (३) पुराणवस्तु-संशोधनास सहाय्यभूत होणे; पण प्रत्यक्ष कामावर असलेल्या माणसाकडून खरे कारण कळते ते हे की, मागे उकरले असताना ३१ डझन टिकाव, ३ खोरी आणि ७ घमेली चुकून आत राहिली म्हणून आम्ही पुनः उकरीत आहोत! विनोदी लेखकावर टिपण देताना त्याचे आकार, दर्शन, सवयी इत्यादी सांगून उत्पादन या मुद्द्यावर त्यांनी लिहिले आहे— 'ऑगस्ट ते ऑक्टोबर, तेही अवघड जागी!'

परंतु माडगूळकरांचा विनोद जेव्हा त्यांच्या जातिवंत कथेचा भाग बनून येतो तेव्हा त्याचा नोकझोक काही आगळाच असतो. 'वळे घातले हस्या' अशा प्रकारचा विनोद त्यांचा कधी नसतोच. तथापी कथेमध्ये या विनोदाचं स्वरूप फारच 'स्वभावसुंदर' असं होऊन आपल्यासमोर येतं. आपल्याकडे विनोदी लेखक व लेखन हा एक वेगळा प्रांतच बनून गेला आहे. अशा लेखकानं काही गंभीर लिहिणे वा बोलणे हाच मुळी विनोद असा बाणा आपण स्वीकारला आहे. पु. लं. नी 'वाऱ्यावरची वरात'मध्ये याचं चपखल विडंबन केलं आहे. माडगूळकरांनी विनोदाचा वसा घेतलेला नाही आणि नेमक्या याच कारणामुळं त्यांच्या कथासाहित्यामध्ये बावनकशी विनोदाचे दर्शन आपल्याला घडते. यामध्ये ग्रामीण पात्रांचा अडाणीपणा, ठोंबेपणा, बावळटपणा इत्यादींचं चित्रण जरूर असतं; पण त्यात उपहास नावालादेखील नसतो. असतं ते फक्त जिवंत अनुभवाचं कथन. अशा एक-दोन कथाचं उदाहरण सांगून हा विषय आटोपता घ्यायचा आहे.

## शाळातपासणी

'माझा बाप' या कथेमध्ये नरसू तेल्याचा मुलगा राणू यानं देवीची लस टोचून घेतलेली नाही. गोष्टीची सुरुवातच मोठी खुमासदार आहे—'देशपांडेमास्तर आरोग्यशास्त्र शिकवीत होते. पावसाळ्यात रात्री बेडूक ओरडावा तसा त्यांचा आवाज वाटत होता. मी पुस्तक पुढे घेऊन झोप घेत होतो.' देशपांडेमास्तर राणूच्या दंडावर टोचल्याचे वण नाहीत हे पाहून त्याला चिठ्ठी देतात. बाप चिठ्ठी फाडून टाकतो नि म्हणतो—'गाढव आहे तुझा मास्तर!......सांग त्याला मला धाडसुद्धा झाली नाही म्हणून!' तो उलट मास्तरला चिठ्ठी देतो. इकडं आईची भावना अशी की, शाळा म्हटली की शिक्षा ही आलीच. त्यातलाच हा टोचण्याचा प्रकार असला पाहिजे. ती नवऱ्याला सांगते—'पण चार यत्ता शिकू द्या त्याला. शाळा शिकायची, शहाणं व्हायचं तर टोचून घेतलं पाहिजे, मार सोसला पाहिजे!' शेवटी नवऱ्याला नकळत ती डॉक्टरकडून राणूला टोचवून आणते. साथ संपल्यावर नरसू दिमाखात मुलाला सांगतो—'सांग तुझ्या मास्तरला मी अजून जिवंत आहे म्हणून आणि म्हणावं माझा बापही आहे. गाढव साले! देवाशपथ सांगतो, पोरा, तुझा तो मास्तरच एके दिवशी साथीत पटकन् मरेल!' या कथेतील विनोदाला बाप, आई आणि मुलगा तिघांचेही अडाणीपण कारणीभूत झालेले आहे; पण आपल्याला 'उपहासा'चा वास चुकूनही येत नाही. यात वास्तवाचं चित्र आहे आणि त्यामागे लेखकाची सहानुभूती उभी आहे. ही कथा वाचत असताना आपल्याला हसावेच लागते; पण ते हसणे कुठे तरी आपल्या मनात एक खिन्नताही जागी करीत असते. अशी ही व्यंकटेश माडगूळकरांच्या विनोदाची आगळी जातकुळी आहे.

'शाळातपासणी' ही तर त्याची गाजलेली कथा. ए. ओ. (अटेंडिंग ऑफिसर) खेड्यातली शाळा तपासायला येतो. 'अजून गावात शिरला नाही तोवरच कुत्र्यानी त्याला नंदीवाल्याला येरगटावा तसा येरगाटला. तो आजूबाजूच्या पोरांना म्हणाला, कुत्र्यांना आवरा; पण बाळ करदोटधात बोटे घालून हसतच उभी राहिली. धीट भिकारी जातो तसा ए. ओ. कुत्र्याना वारीत वारीत वाडीत पोचला. शाळेत शिरताच त्याला मुताचा भपकन वास आला. कारण शाळेत मुलं तर नव्हतीच. टेबलाला शेरडं बांधली होती. ए. ओ. ला बघताच शेळीनं बदाबदा ओंजळभर लेंड्या टाकल्या. तेवढ्यात कुत्रं गुरगुरू लागलं तेव्हा ए. ओ. नं शाळेला बाहेर कडी लावून घेतली आणि मास्तरची वाट बघत बाहेर येऊन बसला.'—अशा विनोदी 'बेअरिंग'नं ही कथा माडगूळकरानी शेवटपर्यंत अशी काही रंगवली आहे की, मराठी विनोदी कथेमध्ये तिचा अव्वल क्रमांक लागावा! मास्तर

तर शाळेच्या बाहेरच आराम झोपलेला आहे. जागे झाल्याबरोबर ए. ओ.ला समोर बघून तो लटपटतो आणि त्याला शाळा दाखवायला नेतो. 'आँ, कडी कुणी भडव्यानं घातली?' यावर साहेब म्हणतो– 'मी.' अशा संवादातून आणि मास्तरचा मुरदाडपणा, मुलांचा चुकारपणा, ए. ओ चा चडफडाट, गावकऱ्यांची टाळाटाळी यातून या कथेमध्ये जिवंत नाट्य उभे राहिले आहे. शेवटी रात्री वाटाड्या पोराबरोबर आडवाटेतून लवकर मुक्कामाला पोचण्याची धडपड करणारा ए. ओ. वाटेतच थकून झोपी जातो आणि उजाडल्याबरोबर त्याला आढळतं की, आपण शाळेच्या मागच्या बाजूलाच बसलो आहोत. आता याही कथेमध्ये 'टवाळी' करण्याचा लेखकाचा उद्देश कुठेही दिसून येत नाही. यात कुणावर टीका नाही की कसला गंभीर पवित्रा नाही. हा उपहासही नाही आणि विडंबनही नाही. बावनकशी प्रसंगनिष्ठ विनोद इथे आपल्याला दिसतो.

## अतिशयोक्ती नसलेला विनोद

'गणा भपट्या' हे स्वभावनिष्ठ विनोदाचं एक अद्भुत उदाहरण म्हणून कोणीही त्याला डोक्यावर घ्यावे. माडगूळकरी साहित्यात या कथेला फारच वरचा मान दिला गेला पाहिजे. अंगानं आडमाप वाढलेला; पण बुद्धीनं खुजा राहिलेला असा हा पाटलाचा पोरगा गणा आहे. 'त्याचे हे सारखे हसणे व त्याचे ते एक वेगळीच चमक असलेले डोळे बघून नव्या माणसालासुद्धा वाटायचे की, ह्याला डोक्याची बाजू कमी आहे आणि हे तसे काही खोटे नव्हते.' गणाचे इतर चार भाऊ शेती–वाडीची कामं करीत; पण गणाचं एका कामातही मन नव्हतं. त्याला एकदम श्रीमंत व्हायचं होतं. हे चेटूक आल्याशिवाय होणार नाही, ही त्याची मनोमन खात्री. गावात एक हुषार गारुडी आला आणि गणानं त्या गारुड्याचे पाय धरले. गारुड्यानं त्याला पंढरपुराहून इंद्रजाल पुस्तक आणून वाचायचा सल्ला दिला आणि सुटका करून घेतली. गणानं हे पुस्तक पैदा केलं आणि त्यात दिलेला एकेक उपाय तो करून बघू लागला. एका उपायात नाग–नागिणीना मारून त्यांना दोन ठिकाणी पुरून रुपया व अधेली ठेवावी म्हणजे मग रुपयाकडे रुपया आणि अधेलीकडे अधेली येत राहील असं लिहिलं होतं. मात्र एक अट होती. अधेलीची रुपयाशी गाठ पडू नये. झालं! गणाचं विचारचक्र सुरू झालं.– 'अरं तिच्या बायली, अशी भानगड हाय का? रुपयाकडे रुपया अन् अधेलीकडे अधेली! पर दोनींची गाठ पडू द्याची न्हाई म्हंजे? हे जमावं कसं? रुपया कमरेला नि अधेली खिशात ठेवली तर?' आणि उन्हाला बसून गणा पुष्कळ विचार करतो. शेवटी त्याला उपाय सुचतो– 'फटशिरी लग्न करून टाकावं आणि अधेली आपल्या बायकोपाशी ठेवावी; रुपया आपल्याकडे!' तेव्हा असा हा गणा भपट्या आहे. तो पुस्तकातला दुसरा उपाय करून थकतो. काहीच जमत नाही; पण तो हिम्मत सोडत नाही. या सर्व घटनाचं लेखकानं असं काही खुमासदार वर्णन केलं आहे की, ते मुळातून वाचणंच परिणामकारक होईल. आजारातून उठल्यावर गणा 'इंद्रजाल'मध्ये कुकुडकुंभा पक्ष्याबद्दलचा उपाय वाचतो आणि दादाला विचारतो– 'दादा, कुकुडकुंभा पक्षी कसा दिसतो बरं?' आणि या बिंदूवर कथा संपते. गणाच्या भोळ्याभावड्या स्वभावातून निर्माण झालेल्या विनोदी घटनांचं चित्रण हाच या कथेचा विषय आहे. आपल्याला ही कथा अगदी निर्मळपणानं हसवते. इथे गणाच्या कुचेष्टेचा वासदेखील नाही. गडकऱ्यांच्या 'गोकुळ विसरभोळे'सारखी हास्यास्पद अतिशयोक्तीही नाही. अतिशयोक्ती ही विनोदाला आवश्यक असते असे शास्त्र आहे; परंतु माडगूळकराचा प्रसन्न, खेळकर, निरागस आणि निर्भेळ विनोद या नियमाला अपवाद आहे.

विनोदी लेखक होण्यासाठी माडगूळकरानी अशा प्रकारच्या कथा लिहिलेल्या नाहीत. 'बनगरवाडी' वाचल्यानंतर विनोद हा त्यांच्या लेखनाचा स्थायी भाव नाही, हे वेगळे सांगावे लागणार नाही; परंतु त्यांच्या साहित्याचा एक लहानसा कोपरा त्यांच्या सहजोत्पन्न विनोदाने झगमगलेला आहे, हे मान्य करावे लागेल. त्याचा हा विनोद माणूस शोधण्याच्या प्रवासातील एक मुक्काम आहे. तेथे ते तात्पुरते रमलेले आहेत. तथापी त्यांच्या एकूण कथालेखनात मधून मधून आडपडद्याने, 'मिस्किलपणा' या नावानं परिचित असलेली विनोदाची किनार जाणवते आणि आपल्याला मंदस्मित करायला लावते. त्यांच्या वगाच्यामधून विनोदाचं एक आगळं दर्शन आपल्याला घडतं.

नाद, दृश्य, लय यांच्या जाणिवांनी घडत गेलेल आणि पाठीशी भरपूर अनुभवसंपन्नता असलेलं आपलं सदाबहार, विपुल आणि विविधांगी साहित्य पाहूनही माडगूळकर 'धन्योऽहम्' असं मानायला तयार नाहीत. 'कोवळे दिवस'मध्ये ते म्हणतात– 'लेखकाच्या बाबतीत यश ही गोष्ट तात्पुरती असते. ते लांबलेले अपयश असते.' त्याच्या वाचकाना मात्र असं वाटत नाही. ते स्वतः 'दहा वर्षांनी मी जुना होईन' असं म्हणतात; पण गेली ४० वर्षे ते ताजेच राहिले आहेत. समेलनाध्यक्षपदी निवड ही याचीच पावती आहे. एव्हाना त्याचे अध्यक्षीय भाषण होऊनही गेले असेल! त्यांना आम्हा वाचकांचा मानाचा मुजरा! □


"एका वेगळ्या विषयावर भर देणारी ही कादंबरी. स्त्री-बुवाबाजीच्या प्रकारांमागचे मर्म उलगडून सांगणारी. कुठलंही भाष्य न करता एक सत्यघटना जशीच्या तशी मांडल्याने झपाटून टाकण्याचे चांगलेच सामर्थ्य या कादंबरीला लाभलंय. त्याच त्या प्रेमाच्या त्रिकोणकथांपेक्षा एक महत्त्वाचा सामाजिक विचार लालित्यपूर्णतेने या नवोदित लेखकाने घडवलाय, त्यामुळे बुवाबाजीसारख्या गोष्टींबाबत वाचक अधिक जागरूक बनतील."

**पुस्तक पंढरी / ऑगस्ट १९८२ अंक**
**बॉंबे बुक क्लब–ऑगस्ट निवड**

# सबला

लेखक : माधव शिरवळकर.
राजहंस प्रकाशन, पुणे ३०
मूल्य : रुपये बारा

# मराठी विनोद

साहित्य परिषद व्याख्यानमाला । पुष्प सातवे : शुक्रवार २३ ऑक्टोबर १९८२

## डॉ. गं. ना. जोगळेकर

**'मराठी विनोद' या मालेतील डॉ. गं. ना. जोगळेकर यांनी गुंफलेले सातवे पुष्प वैशिष्ट्यपूर्ण आहे– वेगळे आहे. 'गंगाधरां'बद्दल गंगाधरानेच बोलावे हा एक योगायोग; पण मराठी विनोदी लेखकांमध्ये आपल्या वेगळेपणाने लक्ष वेधून घेणाऱ्या गाडगीळांच्या लिखाणाची मीमांसा वेगळ्या भूमिकेतून केली गेली – हा एक योगायोगच मानायचा का? की –**

¤

मराठी विनोद आणि गंगाधर गाडगीळ हा विषय मला जेव्हा व्याख्यानासाठी सुचविण्यात आला, तेव्हा मी लगेच त्याला होकार दिला. कारण गंगाधर गाडगीळ हे आमच्या आवडत्या लेखकांपैकी. त्यांच्या विनोदाचा वेगळेपणाने विचार करून आपल्यासारख्या जाणकार मराठी श्रोत्यांच्यापुढे मांडण्याची संधी मिळाल्याबरोबर त्याचा लाभ उठविण्याचा संधिसाधूपणा मी दाखविला. अर्थात आपला अधिकार मर्यादित आहे, याची जाणीव मला आहे; परंतु या विषयाबाबतचा जिव्हाळा आणि रसिकांवरची भिस्त याच्या बळावरच मी आज बोलण्याचे धाडस करीत आहे.

आतापर्यंतच्या ६ व्याख्यानांमध्ये आपण मराठीमधील ६ मोठ्या विनोदकारांचा परिचय करून घेतला. आपल्या वाट्याला आलेल्या विनोदकाराची प्रशंसा, गुणगौरव वक्त्यानी केला. त्याचा मोठेपणा पटवून दिला. त्याने विनोद करताना घेतलेल्या भूमिकेचे समर्थन करून, ते आवश्यक कसे हे पटवून दिले. हे सर्व ऐकताना माझ्या मनात आले, एका दृष्टीने हे सर्व बरोबर आहे; पण मग मराठी समीक्षेचे काय? असे नुसतेच गोडवे गायचे का? असे असेल तर मराठी समीक्षेला काही चांगले दिवस नाहीत असे म्हणावे लागेल. तेव्हा माझ्या विषयापुरती मी समीक्षकाची भूमिका घेण्याचे निश्चित केले आहे. केवळ स्तुती करण्याचा माझा हेतू नसेल हे मी प्रथमच स्पष्ट करतो.

'विनोद' या अर्थाने आपण अनेकदा 'हास्य' हा शब्द वापरतो; पण 'हास्य' वेगळे आणि 'विनोद' वेगळा. अगदी व्याकरणातच शिरायचे तर हास्य हे नामही आहे आणि विशेषणही आहे; जसे 'सत्य' हा शब्द नामही आहे आणि विशेषणही आहे; पण विनोदाला जोडून जेव्हा आपण हास्य शब्द वापरतो, तेव्हा ते विशेषणच असते. 'हास्यविनोद' म्हणजे हसण्यास योग्य असा विनोद. तेव्हा हा शब्द फार जाणीवपूर्वक वापरायला हवा. सगळेच विनोद हसण्यास योग्य असत नाहीत. काही विनोद अर्वाच्य असतात, काही विनोद क्रूर असतात, काही वैयक्तिक ओरखडे काढणारे असतात, काही निर्मळ असतात तर काही अभद्र असतात. आपण जेव्हा हास्यविनोद म्हणतो, तेव्हा अशा चांगल्या अर्थाने हसविणाऱ्या विनोदाचाच आपण विचार करत असतो, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. 'विनोद' हा शब्दसुद्धा संस्कृतमध्ये कसा आहे तो पहा. 'वि' हा उपसर्ग आहे आणि 'नुद्' हा धातू आहे. याचा अर्थ विशेषत्वाने दूर जाणे. कशापासून याचा उल्लेख यात नाही; पण त्यामागचा हेतू असा आहे की, दैन्य, दुःख, श्रम, यातना, विवंचना या सर्व क्लेशकारक गोष्टींपासून दूर नेणारा तो विनोद. हसायला योग्य ते हास्य आणि या सर्व कटकटींपासून दूर नेणारा तो विनोद.

### टाक लेका वन्समोअर !

सर्वसाधारणपणे विनोदकार चार प्रकारचे असतात. मला हे जाणवण्याचे कारण ललितकलादर्शचे गाजलेले स्त्रीनट नानासाहेब चापेकर. त्यांनी 'स्मृतिघन' हे आत्मचरित्र लिहिले आहे. त्यात त्यानी केशव–नारायण यांनी १९२१ मध्ये मुंबईला 'टिळक स्मारक फंडा'च्या मदतीसाठी 'संयुक्त मानापमाना'चा जो प्रयोग केला, त्याची आठवण लिहिली आहे. ती घटना तेव्हा फार गाजली होती. स्वतः नानासाहेबानी त्या प्रयोगात आक्कासाहेबाची भूमिका केली होती. या आठवणीत त्यांनी केशवराव भोसले आणि नारायणराव (बालगंधर्व) याचे गाणे कसे वेगळे होते, इतकेच नाही तर त्याला रसिकांकडून मिळणारी दादही कशी वेगळी होती, याचे फार मार्मिक वर्णन केले आहे – केशवराव भोसले यांचे गाणे सणसणीत, तान अशी बुलंद की 'वन्स मोअर' मिळालाच पाहिजे! – जणू ते म्हणत 'टाक लेका वन्स मोअर, तू काय तुझा बापदेखील देईल!' याउलट बालगंधर्वांचं गाणं – लडिवाळ – 'द्यायचा ना गडे वन्समोअर' अशी आवर्तनं चालू असत. वन्स मोअर दोघेही मिळवायचेच; पण फरक हा असा. मला वाटतं असाच भेद विनोदकारातही आहे. काही विनोकारांचे विनोद असे स्फोटक, आकस्मिक आणि सणसणीत असतात की, 'टाक लेका हसू' असेच ते म्हणतात. अत्र्यांचा विनोद या प्रकारातला, काही प्रमाणात बादेकरांचा विनोदही असा केशवराव भोसल्यांच्या वर्गातला की, याच्या विनोदाला खदखदून हसण्याची दाद मिळणारच; तर काही विनोदकारांचा विनोद बालगंधर्वांच्या गटातला – गुदगुल्या, आर्जव, लडिवाळपणा करणारा. त्याच्या नाना प्रकारच्या विभ्रमावर आपण मोहित होणारच. चिं. वि. जोशी, पु. ल. देशपांडे या गटातले. तिसरा विनोदकार अलिप्त – मल्लिकार्जुन मन्सुरसारखा. आपल्या शास्त्रीय पद्धतीने आपले गाणे गात जाणारा.

तुम्ही त्याला दाद द्या नाही तर देऊ नका, त्याची त्याला फिकीर नसते. त्यांना योग्य वाटते, ते ते करतात. श्रीपाद कृष्ण किंवा आजचे गंगाधर गाडगीळ मला या गटातले वाटतात. चौथ्या प्रकारचे विनोदकार असे की, 'इथे तुम्ही हसा' अशी फक्त पाटीच ते लावत नाहीत! ज्याप्रमाणे अनेक गायक 'हा का गातोय?' किंवा 'हा केव्हा थाबणार' असे वाटायला लावतात. काही विनोदकार असेच त्रासदायक होतात. अर्थात हे अगदी ढोबळ वर्गीकरण झाले. अनेकदा हे संमिश्र स्वरूपात आढळते. काही गुण, काही दोष एकत्रही आढळतात. त्यामुळे या वर्गीकरणात नेमकेपणा येणे शक्य नाही.

, आतापर्यंतच्या वक्त्यांनी, गेल्या ५–६ दिवसांत 'शब्दप्रधान' किंवा 'कोटिबाज' विनोद गौण आहे असे सांगितले; पण मला हे फारसे मान्य नाही. कारण आपणा सर्वांना भाषेशी केव्हा ना केव्हा थोडेफार खेळावेसे वाटते. बारिकसारिक गोष्टीतसुद्धा आपल्याला क्षणिक गंमत वाटून जाते. साधी आडनावं घेतली तरी त्यातल्या वेगळेपणाने आपण हसतो. ही आडनावं पहा– बोंबले, डोईफोडे, आगलावे– आता यात हसण्यासारखे काय आहे? पण आपण हसतो. कारण तेवढ्यापुरता आपला त्या नावाशी खेळ नाही तर चाळा चाललेला असतो. त्याचं नाव आणि वर्तन यात काही संबंध आहे का, ते आपण पाहतो. जेव्हा चार समवयस्क सहज गंमत म्हणून एकत्र जमतात तेव्हा शब्दांवरती कोटया केल्याशिवाय त्यांच्या गप्पा होतच नाहीत. आपण सर्वजण शब्दाचा हा खेळ खेळतच असतो. तो सौम्य असेल, मोकळा असेल, प्रसंगी चावटही असेल; पण शब्दावर कोटया करण्याचा खेळ आपण नेहमीच करत असतो. प्रत्येक नामांकित मराठी विनोदकारानेही हा शब्दांचा खेळ केलेला आहे. अगदी चिं. वि. जोश्यांनीसुद्धा! चिमणरावाचे सगळे कुटुंबच हा शब्दांचा खेळ खेळताना दिसते. चिमण, काऊ, मोरू, राघू, मैना आणि साळू– ही नावे पहा. चिं. वि. जोशी, जे स्वभावनिष्ठ विनोदासाठी प्रसिद्ध आहेत, त्याच्या चिमणचा सगळा परिवारच या शब्दनिष्ठ विनोदावर उभा आहे. अगदी गुंड्याभाऊलासुद्धा 'चिमी एकदाची सासरी गेली, तिने असा 'भुरका' मारला' असे म्हणावेसे वाटते. त्यावर चिमण, अरे 'झुरका' असेल असे म्हणतो. म्हणजे मुरका, भुरका, झुरका या अगदी क्षुल्लक कोटया आहेत; पण त्या केल्याशिवाय चिं. विं.ना राहवले नाही. याचा अर्थ असा की, कुठलाही विनोदकार शब्दांशी खेळ करतोच करतो. कारण शब्द, भाषा ही एकीकडून त्याची स्वतःची आणि दुसरीकडून सगळ्यांच्या मालकीची गोष्ट आहे. तेव्हा तिच्याशी क्रीडा करत करत तो वेगळ्या जगात जात असतो. अर्थात 'कोटिनिपुणता' चागली; पण 'कोटीबाजी' वाईट. 'बाज' शब्दात जो अतिरेक आहे, तो कोटीच्या संदर्भात वाईट ठरू शकतो; पण मुळात कोटी किंवा शब्दनिष्ठपणा वाईट आहे, हे मला मान्य नाही. शब्दनिष्ठपणात जो सूक्ष्मपणा किंवा अनपेक्षितपणा येऊ शकतो, तो दुसऱ्या प्रकारच्या विनोदात येत नाही. जयवंत दळवीचा 'ठणठणपाळ' घ्या. त्यात शब्दनिष्ठपणा तर आहेच; पण एक प्रकारचा अत्यंत सूक्ष्मपणाही आहे. ते वाचताना, आपल्याला तो कसा जाणवला नव्हता, असे वाटत राहते.

शब्दनिष्ठ विनोद आणखी एका कारणासाठी महत्त्वाचा आहे. ते म्हणजे कोटीचे दुसऱ्या भाषेत खऱ्या अर्थाने भाषांतर होऊ शकत नाही, ती तिच्या मूळ भाषेतच शोभून दिसते. अत्र्यांच्या 'वंदे भारतम्'मध्ये हिंदू धर्ममार्तंड आणि मुसलमान कादरखान याच्यात भांडण चालले आहे असा प्रसंग आहे. दोघेही म्हणत असतात याच जागी आपले मंदीर आणि मशीद होती. आता 'याला पुरावा काय?' ह्याच प्रश्नाची पुनरावृत्ती दोन–तीन वेळा झाल्यावर सोमेश्वराचा मुलगा कल्याण याची भूमिका करणारा नट सहज म्हणून गेला– याला (कादरखानला) 'पुरावा' आणि याला (सोरश्वरला) 'जाळावा.' 'पुरावा' या शब्दावरची ही कोटी मराठीतच होऊ शकेल. तिचे भाषांतर करायचे म्हटले तर कसे शक्य आहे? आणखी एक उदाहरण पाहू. रांगणेकराचे 'कुलवधू' हे तेव्हा फार गाजलेले नाटक. अनेक ठिकाणी लोकांच्या आग्रहावरून ते स्वतः दिग्दर्शनासाठी जात असत. तेव्हा त्यांनी सांगितलेली सत्य घटना आहे ही. या नाटकाची नायिका भानुमती आपला गतकाळ किती खडतर होता याचे वर्णन करताना म्हणते, 'अशा 'कष्टात' दिवस गेले.' असं ते वाक्य आहे. ती नटी तालीम करताना पुन्हा पुन्हा म्हणत होती, 'अशा कष्टात 'दिवस' गेले.' आता 'कष्टात'च्या ऐवजी 'दिवस'वर आघात दिला गेल्याने कसा अर्थाचा अनर्थ झाला पहा! शेवटी रांगणेकर तिला म्हणाले, 'बाई, तुमच्या आयुष्यातली घटना नका सांगू, त्या भानुमतीला काय म्हणायचं आहे ते सांगा!' अशा प्रकारचा अनपेक्षित, स्फोटक शब्दनिष्ठ विनोद दुसऱ्या भाषेत नेताच येणार नाही. तेव्हा या शब्दप्रधान विनोदाला गौण लेखणाऱ्यांना मला प्रश्न विचारायचा आहे की, जो विनोद श्रीपाद कृष्णापासून आजपर्यंत आपले अस्तित्व टिकवून आहे, तो खरोखरच कमी महत्त्वाचा मानण्याचे काय कारण? अर्थात 'विनोद' या विषयावरच्या व्याख्यानमालेत याचा विचार होणे आवश्यक वाटले, म्हणून मी या प्रश्नांना स्पर्श केला. त्याच्या जास्त तपशिलात मी शिरत नाही. कारण माझ्या विषयाचे भान मला राखले पाहिजे.

### भूमिका चुकीची!

गंगाधर गाडगीळ यांचे वेगळेपण असे आहे की, ते काही जणांचे प्रतिनिधी आहेत. अशांचे प्रतिनिधी की, ज्यांचे विनोदी लेखन तुम्ही पूर्णपणे विसरून गेलात तरीही ज्यांच्या साहित्यिक मोठेपणाला यत्किंचितही कमीपणा येणार नाही. चिं. वि. जोशींना आपण विनोदकार म्हणून विसरलो तर त्यांचे पाली भाषेतील काही संपा

## गाडगीळांचा विनोद - मजेदार 'गोल्डन' मिक्श्चर!

दित, संशोधित लेखन आहे हे आपल्यापैकी कितीजणाना माहीत आहे? दत्तू बांदेकरांचा विनोद आपण विसरलो तर त्यांचे इतर काही लिखाण उरेल का? या लेखकांनी फक्त विनोदी लिखाणच केले आहे; पण गाडगीळ हे असे लेखक आहेत की, ज्यानी कथा लिहिल्या आहेत, कादंबऱ्या लिहिल्या आहेत, प्रवासवर्णनं, समीक्षणं लिहिली आहेत. इतकंच नाही तर या सर्व वाङमयप्रकारात त्यानी स्वतःचं असं एक स्थानही निर्माण केलं आहे. नवकथाकार म्हणून आपण त्यांना ओळखतो. नवसाहित्याचे श्रेष्ठ किंवा एकमात्र भाष्यकार म्हणूनही आपण त्याना ओळखतो. असे असूनसुद्धा, या विविध दालनांत स्वतःचे कर्तृत्व गाजवलेले असतानासुद्धा त्यानी विनोदाची उपेक्षा केलेली नाही. असे आणखीही पुष्कळ लेखक आहेत. पुरुषोत्तम भास्कर भावे–त्याचा 'वाकुल्या' हा संग्रह वाचला तर त्यांना विनोदी लेखक म्हणावेसे वाटेल. वसंत कानेटकरांची 'प्रेमा तुझा रंग कसा' सारखी नाटके आणि 'लेकुरे उदंड झाली', 'सूर्याची पिले' हे फार्स पाहताना, एरवी गंभीर नाटके व त्याआधी कथा, कादंबऱ्या लिहिणारा हाच लेखक आहे यावर आपला विश्वास बसणार नाही. श्री. ज. जोशी याच प्रकारातले लेखक आहेत. यशस्वी कथाकार, कादंबरीकार म्हणून त्यांचे स्थान आहेच; पण त्याच्या अनेक कथा चांगल्या प्रकारे हसविण्याचे कामही निश्चितच करतात. असे अनेक लेखक आहेत की, ज्यांचे विनोदावाचून अडलेले नाही, तरीसुद्धा त्यांनी चांगल्या प्रकारे विनोदी साहित्यनिर्मिती केली आहे. अशा लेखकांचे गंगाधर गाडगीळ प्रतिनिधी आहेत.

गाडगीळांचे प्रमुख विनोदी लेखन म्हणजे त्याच्या बंडूकथा आहेत. बहुतांशी बंडूवरच बेतलेल्या बंडूच्या नाटिका आहेत. (बंडू नसलेल्या इतर नाटिकाही आहेत.) १९५२ मध्ये लिहिलेला 'वेड्याचा चौकोन' हा फार्स आहे–तो फार्स रंगभूमीवर गाजला नाही. वास्तविक त्यात आत्माराम भेंडे, आशा भेंडे, दामू केंकरे या तेव्हाच्या गाजलेल्या नटांनी काम केले होते. मार्क ट्वेनपासून कल्पना घेऊन निर्माण केलेला 'धाडसी चंदू' आहे. अलीकडे त्यांनी स्फुट साप्ताहिकांमधील सदरे–फिरक्या असेही लिहिलेले आढळते. 'आर्थिक नवलकथा' हेही विनोदी ढंगातले पुस्तक त्यानी आपल्याला दिले आहे. त्यांच्या प्रवासवर्णनांचासुद्धा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. ती केवळ विनोदी नाहीत; पण 'गोपुरांच्या प्रदेशात' किंवा 'साता समुद्रापलीकडे'-मध्ये विनोदाला खास स्थान आहेच.

पण गाडगीळ जेव्हा विनोदी साहित्याचा विचार करू लागतात तेव्हा आपल्या हातानेच आपल्या पायावर धोंडा पाडून घेत आहेत असे वाटते. आपण स्वतः घेतलेल्या भूमिकेचा, मांडलेल्या मतांच्या विरुद्ध ते जातात असे वाटते. दोन–तीन वेळा त्यांनी या विषयावर लिहिले आहे; पण त्यातही सुसंगती आढळत नाही. 'वेड्यांचा चौकोन'च्या प्रस्तावनेत ते, 'हा फार्स आहे आणि फार्स म्हणून पाहिलात तरच त्यातील गंमत कळून येईल,' असे लिहितात. धाडसी चंदूबद्दल लिहिताना ते म्हणतात, मार्क ट्वेन, जगप्रसिद्ध असलेला हा विनोदी लेखक, ज्याच्या विनोदाची भाषांतरे जगातील सर्व भाषामध्ये झाली, ५० वर्षांहून अधिक काळ याने लेखन केलं आणि हे अश्रूंनी, चिंतेने, कटकटीनी भरलेले जीवन हसत–खेळत मजेत कसं घालवावं याचा संदेश या मार्क ट्वेनने आपल्याला दिला, असे त्याच्या भूमिकेचे समर्थन गाडगीळ करतात. आपल्याला वाटते गाडगीळांना विनोदाचे माहात्म्य, सामर्थ्य पटलेले आहे; पण हेच गाडगीळ जेव्हा 'साहित्याचे मानदंड' यात चिं. वि. जोशांवर किंवा 'झेंडूची फुले' या अत्र्यांच्या विडंबन–गीताबद्दल लिहितात, तेव्हा ते त्याचा मोठेपणा मान्य करूनसुद्धा, विनोदाला कुठे तरी दुय्यम स्थान देत आहेत असे वाटते. त्याहीपेक्षा 'पाण्यावरची अक्षरे' या टीकात्मक लेखांच्या संग्रहात 'विनोदी साहित्याचे कलात्मक अंग' हा विस्तृत लेख लिहून त्यांनी विनोदाला कमी लेखणारी आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

खरं म्हणजे १९५२ पासून किंवा त्याआधीसुद्धा 'मानसचित्रे' पासून गाडगीळ स्वतः विनोदी लेखन करत आहेत. स्वतःच्या भाषेतील व परकीय भाषांमधील उत्कृष्ट विनोदी वाङमय त्यांनी वाचले आहे, त्याना स्वत.ला विनोदाची चांगली जाण आहे, असे असतानासुद्धा विनोदाला ते गौण का लेखतात, हे समजत नाही. त्यांना असं म्हणायचं आहे की, विनोदामधून जीवनाचे समग्र चित्र उभे राहात नाही, जसं ते महाकाव्यातून उभं राहातं, कादंबरीतून उभं राहातं. विनोद हा केवळ हलका–फुलका त्या वेळेपुरती गंमत करणारा, वाचायचं आणि विसरून जायचं, अशा प्रकारचा दुय्यम स्थान असलेला वाङमयप्रकार आहे, अशी समजूत गाडगीळ करून देतात. खरं म्हणजे विनोदातून काय काय साध्य होते हे जगभरचे विनोदी लेखक काळजीपूर्वक वाचले, त्याच्यामधली विविधता, खोली, जीवनस्पर्शित्व अनुभवलं तर गाडगीळ कुठे तरी चुकत आहेत असे आपल्याला वाटते. कोणत्या तरी विशिष्ट 'मूड'मध्ये असताना–प्रत्येक कलावंताचा तसा तो असतोही–त्यांना हे जाणवले असावे. वास्तविक त्यांनी असे म्हणायला हवे की, ट्रॅजेडी, कॉमेडी, फार्स या सर्वांचे काम वेगवेगळे आहे. अशा अनेक प्रकारानी मिळून जे साहित्य बनतं, त्याच्यातून तुम्हाला जीवनाचे दर्शन घडतं की नाही ते तुम्ही पहा. जर ट्रॅजेडीचे काम जीवनाचे समग्र दर्शन घडविण्याचे असेल आणि ती जर तसे करण्यास समर्थ असेल तर शेक्सपिअरच्या नामांकित शोकांतिकामध्ये विदूषकाचे काय काम? तुम्ही म्हणाल, रिलीफसाठी. म्हणजे 'रिलीफ' देणे हे सुद्धा महत्त्वाचे काम आहे आणि हे महत्त्वाचे काम जर विनोदच करत असेल, तर त्याला दुय्यम लेखणे कितपत सयुक्तिक आहे याचा विचार होणे आवश्यक आहे. गाडगीळांचे विनोदी लेखन मला मान्य आहे; पण त्याची विनोदाबद्दलची भूमिका मान्य नाही.

## बंडूचा चक्रमपणा–खास त्याचाच !

गाडगीळ वृत्तपत्रात स्तंभलेखनाच्या स्वरूपाचे विनोदी लिखाण यशस्वीपणे करतात. ते करताना अनेक तंत्रे सांभाळावी लागतात. त्यांचे 'फिरक्यां'मधील लिखाण या दृष्टीने पाहण्यासारखे आहे. पाहुणचाराचा वऱ्हाडी नमुना ते आपल्या फिरक्यामधून पेश करतात. ते काही वर्षे प्राचार्य होते, तेव्हा तिथले काही अनुभव, प्राचार्यपदाची सुखदुःखे त्यांनी नेमकेपणाने मांडली आहेत. या काळात त्यांनी पाहिलेले महाविद्यालयीन विश्व–प्राध्यापक, प्राध्यापिका, विद्यार्थी या सर्वांचे बारकावे त्यानी टिपले आहेत. त्याचं निरीक्षण फार मार्मिक आहे. ते म्हणतात, 'सगळ्या प्राध्यापिका, ज्यांना बाळंतपणाच्या रजे-

वर जायचे आहे, त्या १ डिसेंबरलाच रजेवर जातात. मार्चच्या सुमाराला जरा आल्यासारखं करतात की परत जूनपर्यंत सुट्टीच ! कसे काय त्या हे सर्व गणित जमवतात कोण जाणे ?' असा मार्मिक टोला ते देतात. या फिरक्यांचा हेतू मर्यादित असतो. थोडेसे हसवायचे, खुलवायचे, टोले हाणायचे हे फिरक्यांचे तंत्र त्यांना चांगले अवगत झालेले आहे. आपल्याला क्रिकेट कधीच जमले नाही. कारण आमचे कॅप्टन दाजी भाटवडेकर आणि ते खेळायचंही नाटकच करायचे, असे ते म्हणतात, तर देशभर बोकाळलेल्या सेमिनारची जबाबदारी ते प्रभाकर पाध्यांवर टाकतात !

आजची नियतकालिके, विशेषतः दिवाळी अंक आणि त्यांची मुखपृष्ठे यात भडकपणा, बाजारीपणा आला आहे, याचा त्यांना संताप आला आहे आणि हा संताप कशा तऱ्हेने व्यक्त केला की तो सुसह्य होतो हे त्यांना माहीत आहे. याची प्रचिती त्यांच्या 'बाबांचे कलिंगड आणि मुलीचा स्वेटर' या पुस्तकातून येईल; पण केवळ गाडगीळ ही विनोदी सदरं चालवितात म्हणून आपण त्यांना विनोदी लेखक म्हणत नाही. नियमितपणाने सदरे लिहिणारे असे खूप लेखक आहेत. गाडगीळ विनोदकार ठरतात, त्यांच्या 'बंडू कथां'मुळे. बंडू हा त्यांचा मानसपुत्र आहे. आपल्याकडे ही मानसपुत्रांची परंपराच आहे. बहुतेक श्रीपाद कृष्णांच्या बंडूनानाची त्यांनी दोन पात्रे केली असावीत. एक बंडू आणि दुसरा नाना ! कदाचित ते स्वतंत्रही असतील आणि बंडूची बायको स्नेहलता ही तीन प्रमुख पात्रे आपल्याला या कथांमधून भेटतात. २०–२२ वर्षांपूर्वी लेखक एकांकिकांच्या प्रारंभी स्वतःच आपल्या पात्रांची ओळख करून देत असे. असा परिचय करून देताना गाडगीळ लिहितात, 'स्नेहलता–सुरुवातीला लतेसारखी नाजुक असली तरी आता, अगदीच तेलाचा बुधला नाही; पण लोणच्याची बरणी तर खरीच.' तर असे हे त्रिकूट आणि बंडूचा परिवार–त्याचा मेहुणा, राजा नावाचा मित्र, शेजारी–पाजारी असे त्याचे विश्व या कथांमधून उभे राहते.

पूर्वीची पात्रे–पांडूतात्या, बंडूनाना, चिमण यांच्यात आणि बंडू यात काही वेगळेपण, काही उणीवा आहेत. चिमणइतका हा आपल्याला आकर्षित करत नाही, भुलवत नाही. बंडूच्या ४–५ कथा वाचल्यानंतर या बंडूचे नाविन्य वाटेनासे होते. आपण जशी कल्पना करू तसाच, तपशिलाच्या काही फरकाने बंडू वागत राहतो. चिमणच्या जीवनातील तऱ्हतऱ्हेच्या घटनांप्रमाणे बंडूचा अनुभव समृद्ध नाही, त्यात विविधता नाही, तर तो सीमित आहे, एकेरी आहे. त्याचे ऑफिस, घर हेच त्याचे विश्व आहे. त्याचं जग लहान आहे. गाडगीळांना हे जग हल्ली जास्त जास्त एकाकी होत चालले आहे, असेच दाखवायचे आहे की काय कोण जाणे ? या बंडूचे पूर्वीच्या इतर व्यक्तिरेखांपेक्षा असलेले वेगळेपण दाखविण्यासाठी आपल्याला अनेक 'ट' कारान्त विशेषणे वापरावी लागतील. तो आचरट आहे, बावळट आहे, भेदरट आहे, घांदरट आहे, शेळपट आणि नेभळटही आहे. यातले अनेक गुण (म्हणजे दोष !) चिमणमध्येही आहेत. किंबहुना, अशी विनोदी व्यक्तिरेखा उभी करताना ही काही वैगुण्ये मानसपुत्राला बहाल करायचीच असा एक संकेतच आहे; पण याच्या जोडीला बंडूत थोडा चक्रमपणा आहे आणि तो मात्र खास त्याचाच आहे. स्नेहलता, बंडू ही विनोदी वाटण्यापेक्षा कित्येकदा व्यंगचित्रात्मक जास्त वाटतात. ही दोघं एकमेकांशी भांडतात, एकमेकांवर प्रेम करतात. इतकं की, हिंदी चित्रपटांची आठवण व्हावी. अजूनसुद्धा मराठी प्रेम फारसे धीट स्वरूपात नसते. लाजरे–बुजरे, संकोची, भिडस्त असे असते. असे प्रेम या दोघांचे नाही तर खुल्लमखुल्ला, अगदी स्टेशनवरसुद्धा व्यक्त होणारे असे त्यांचे प्रेम आहे. थोडे सूक्ष्मपणे पाहिले तर त्यात बंडूप्रमाणे स्नेहलतेचासुद्धा पुढाकार आहे असे दिसेल. अशी ही दोघे, कबुतराप्रमाणे एकमेकांना सतत बिलगून गुटर्रगुम करूत आहेत. त्यांचे अनुभवविश्व लहान आहे, आर्थिक कुवत कमी आहे, तरीही मुंबईच्या अफाट विश्वात त्यांना स्वतःचं अस्तित्व जपत जगायचं आहे; पण हे चक्रमपणाच्या, तऱ्हेवाईकपणाच्या माध्यमातून दाखविल्यामुळे या कथा वाचताना कुठे तरी चार्ली चॅप्लिन, लॉरेल हार्डीची आठवण होईल. (निदान जेरी लुईची तरी !)

### फॅंटसीच्या वळणावरचा विनोद

गाडगीळांच्या बंडूकथा वाचल्यानंतर त्यांच्या नाटिका मात्र परिणामकारक वाटत नाहीत. याचे कारण त्यांनी 'नाटक' किंवा एकांकिका या फॉर्मबद्दल आवश्यक तेवढा विचार केला नसावा किंवा त्यांचा तो पिंडच नसावा. पु. ल. देशपांडे, विजय तेंडुलकर यांच्याप्रमाणे गाडगीळ प्रभावी नाटककार होऊ शकले नाहीत हे मात्र खरे.

बंडूकथा चिमणराव-कथांच्या तुलनेने तितक्या प्रभावी न वाटण्याचे आणखी एक कारण म्हणजे त्या आत्मनिवेदनात्मक नसून




"लोकांची गरीबी दूर करण्याचा केवळ
एकच हुकमी मार्ग आहे आणि तो म्हणजे,
उद्देशाची स्पष्ट कल्पना आणि शिस्त राखून
खडतर परिश्रम करणें."

—इंदिरा गांधी

# सत्यमेव जयते—श्रम एव जयते



तृतीय पुरुषी निवेदन करणाऱ्या आहेत. इथे बंडू काय आहे हे गाडगीळ सांगत आहेत, हा दुरावा जाणवतो. गाडगीळ स्वत: बंडू झाले नाहीत त्यामुळे कदाचित बंडूची व वाचकांची जवळीक साधली गेली नसावी; पण 'फिरक्या' आणि 'बंडूकथा' व्यतिरिक्त त्यांनी ज्या विनोदी कथा लिहिल्या आहेत, त्या विलक्षण सामर्थ्याच्या आहेत. 'किडलेली माणसं' मध्ये या सामर्थ्याची प्रचीती येईल. या कथाचा आशय गंभीर, नवीन, विचारप्रधान आहे. त्यांच्यातला विनोदकार या कथांमधून दिसतो, इतकेच नव्हे तर आपल्याला आकृष्ट करतो. आज ३० वर्षे होऊन गेली तरी या कथा पुन्हा पुन्हा वाचाव्याशा वाटतात. 'किडलेली माणसे' या कथेत त्यांनी मध्यमवर्गीय संस्कृतीचे जे भाष्य करून ठेवले आहे, ते मराठी वाङ्मयात कायम स्वरूपात राहणारे आहे. त्यातल्या एकेका वाक्यातून तिरकसपणाने विनोदकार गाडगीळ जो परिणाम साधतात, तो लक्षणीय आहे. अर्थात इथे ते विनोद साधन म्हणून वापरतात, साध्य म्हणून नव्हे.

'वारा भरलेले शीड' या त्यांच्या कथेमधील गोविंदराव हा केवळ त्या कथेतील न राहता कायम लक्षात राहणारा (परोपकारी, प्रेमळ, केव्हाही-अगदी अपरात्रीसुद्धा मदतीला धावून जाणारा) असा आहे. एकदा तो चौपाटीवर सभेला जातो. वक्ता जिथे देशस्थिती कशी गंभीर आहे, कठीण आहे वगैरे रंगवून सागत असतो, ते ऐकणे असह्य झाल्याने हे चितळे मधेच उठून उभे राहतात आणि सांगतात॰ शेवटी ते सारे असह्य होऊन चितळे उठले आणि लोकांच्या शू-शूला अगर अध्यक्षांच्या खाली बसा-ला न जुमानता ठणठणीतपणाने बोलू लागले, 'काय हो, आपल्या देशाची स्थिती एवढी जर वाईट आहे तर तुम्ही आधी का नाही आम्हाला सांगितलंत ? म्हणजे आम्ही काही तरी केलं असतं. धडपडलो असतो. पंडित नेहरूंना का नाही तुम्ही सांगितलंत ? तुम्हाला नाही सांगता येत तर मी सांगितलं असतं. आमचा हक्कच आहे तसा. आणि तुम्हाला हे सगळं माहीत होतं.' वगैरे वगैरे हे जे गोविंदराव चितळ्यांचं निर्मळ दर्शन आहे त्याला खरोखर तोड नाही! असा माणसातला माणूस त्यांनी शोधला व आपल्याला दाखवला यात गाडगीळांचे वेगळेपण आपल्याला जाणवते.

गाडगीळांच्या निवडक कथामध्ये जो एक कल्पक, अद्भुत, लोकविलक्षण, बालिश अशा सर्वांचे मिश्रण असलेला, काहीसा फँटसीच्या वळणावर जाणारा विनोद आहे, तो त्यांच्या 'खरं सांगायचं म्हणजे' या कथेमध्ये बहारदारपणे आलेला दिसतो. सुरुवातीपासूनच या कथेत लॉर्ड माउंटबॅटनपासून स्टॅलिनपर्यंत सगळ्यांची भेट घडते. यात थिल्लरपणा आहे, पण कल्पकताही आहे. एक प्रकारचे मजेदार 'गोल्डन मिक्श्चर' त्यांना साधले आहे अशा त्यांच्या अनेक कथा आहेत. त्या आहेत म्हणून ते विनोदकार आहेत आणि म्हणूनच मी सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे या सर्व मालिकेमधील गाडगीळ हे वेगळे विनोदकार आहेत. त्यांचे साहित्यातील स्थान केवळ विनोदावर अवलंबून नाही. ते अनेक वाङ्मयप्रकारात गाजलेले आहेत आणि शिवाय विनोदी लेखक आहेत हेच त्याचे वेगळेपण आणि मोठेपण आहे!

### पेरूवाडीतील खुटमुटयांची चाळ ....

पेरूवाडीतील खुटमुटयांची चाळ म्हणजे महाराष्ट्रातील मध्यमवर्गीय संस्कृतीचा सुपीक मळा! त्या प्रतापशाली नोकरीबहाद्दर राष्ट्राचा शिवनेरी, सनातन संसारधर्माचे परम पवित्र क्षेत्रस्थान, ५० रुपयांपासून दीडशे रुपयांपर्यंत वाढत जाणाऱ्या सामाजिक मानमान्यतेच्या तेथे अनेक श्रेणी होत्या. तेथील प्रत्येक श्रेणी म्हणजेच एक स्वतंत्र जात होती आणि जाती-जातीत रोटीबेटी व्यवहाराला बिलकूल मज्जाव होता. साहेबाची मर्जी आणि पगारवाढ हे तेथील पुरुषाच्या जीविताचे केन्द्रबिंदू होते आणि नवऱ्याचा पगार व स्वत:चे सौंदर्य ही प्रत्येक बाईच्या योग्यतेची मापटी होती. नोकरी मिळवायची, लग्न करायचे आणि मुलाची शिक्षणे करून पेन्शन घ्यायचे असे या संसारधर्माचे चार आश्रम होते आणि विमा उतरणे हे एक आवश्यक धर्मकृत्य होते. साखर आणि रॉकेल हे त्या संस्कृतीचे जळते प्रश्न होते. साहित्यिक मेळावे आणि गणपतिउत्सव हे त्या वर्गाचे सामाजिक सोहाळे होते. प्रीतिविवाह या त्यांच्या अद्भुत कथा होत्या. दारिद्रय आणि संकुचितपणा हा त्यांचा पिढयान् पिढया चालत आलेला वारसा होता.' □


गांधींच्या सहवासातून शिररला दिसला ख्रिस्ताशी साधर्म्य सांगणारा एक महात्मा...आणि त्या महात्म्यात दडलेला माणूस. त्या महात्म्यालाही या माणूसपणाची जाणीव होती. अनेकदा तसं तो जाहीरपणे बोलूनही दाखवायचा....

**राजहंसचे आगामी प्रकाशन**

**महात्मा आणि माणूस**

**लेखक : विल्यम शिरर । स्वैर रूपांतर : निखिल वागळे**

**लवकरच प्रसिद्ध होत आहे!**

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०

# मराठवाडा विद्यापीठ नामांतर सत्याग्रह : एक रोजखर्डा

## निशिकांत भालेराव

**कै. नं. ३७८**
**येरवडा कारागृह**
**बॅरॅक नं. ६**
**सर्कल ३**

### ७ सप्टेंबर ८२

अबे वो लवडो ! उधर बिस्तर लगाव. तुम्हारे बापका जेल नही !' असे भर मध्यरात्री म्हणजे चक्क ३–३० वाजता खणखणीत स्वागत येरवडा कारागृहात झालं. भलं मोठं कुलूप उघडून बॅरॅक नं. ६ मध्ये आम्ही ७० नामांतरवादी गेलो. थाळी, पॉट, स्वत:च्या झोळ्या व सरकारी बिस्तर आम्ही बाराकीत ठेवू लागलो नि अशा शिव्या एक कैदी देऊ लागला. सर्वच जण भांबावले. विखरून झोपलेल्या मंडळींनी पांघरुणातून डोस्की बाहेर काढली. सर्वांच्याच झोपा मोडल्या होत्या. कैदी आम्हाला पाचशे फुटी बराकीत त्यांच्या कोपऱ्यातील जागेजवळ येऊ देण्यास मज्जाव करत होते. थोडे टेन्शन आले. प्रविण वाघच्या अंगात आलं. त्याने एकदम शत्रुघ्न सिन्हाच्या रुबाबात बोलणाऱ्या त्या कैद्याला हटकले. 'किसको गाल्या दे रे ! हम क्या पाकिटमार लगे क्या ! हम सत्याग्रही है ।' मग इतरांचीही थोडी भीती गेली. प्रविणने बिस्तर टाकलं तशी फटाफट सगळ्यांनी त्या बराकीत जागा बळकावल्या व सगळेच पसरले. त्या कैद्याला बराच झटका मिळाला. ( पुढे त्याचेशी जान-पेहचान झाली तेव्हा कळले की, मुबईत एका फ्लॅटवर तिघांनी धाड घातली. २ लाख पळवले! हा गठला चार वर्षासाठी. येताना बाहेर पैसे व्यवस्थित ठेवून आला होता.)

## मुक्काम
## ७ ते २० सप्टेंबर
## ८२

### ८ सप्टेंबर

दोन दिवस हगायलासुद्धा मिळाले नाही. लिहणे दूरच. सहा तारखेला सत्याग्रह केला. मुबईत सर्व संघटनांचे महाराष्ट्रभर पसरलेले विविध कार्यकर्ते भेटले. प्रत्येकाला येतानाच पोलिसांशी दोन हात करून यावे लागले होते. आझाद मैदानापासून दुपारी मोर्चा सुरू झाला. मोर्चापूर्वी पुण्या-मुंबईच्या पोरापोरीचे हातात हात घालून फिरणे, मराठवाड्यातल्या पोरांना कोड्यात टाकत असल्याचं आढळलं. चलता है ! पण ही पोरं जरा अतीच करतात! आणि मग मोकळं वातावरण पाहून मोर्चात काही वाह्यात पोरांनी आमच्या मागच्या पोरीशी झटणे चालू केले. मजाच मजा ! पोरं एवढ्यावरच थांबली नाहीत, तर त्यांनी ' बाबासाहेब भोसले, बुल्ल्यावर बसले. ' ' नागपाडा–आग्रीपाडा, भोसलेचे झाटे काढा ' अशा घोषणा सुरू केल्या. मग काय, काहींनी येऊन मध्यस्थी केली. पँथरच्या पोरांना केव्हा अक्कल येणार कोण जाणे ! रामदास आठवलेला मात्र पोरं टरकायची आणि मोर्चाच्या वेळी रामदास हातात काठी घेऊन ढोरं हाकलल्यासारखा काठी हालवायचा. त्यामुळं एक मात्र झालं, एवढ्या गदारोळात शांततेनं सगळे बसमध्ये जाऊन बसले.

आम्हाला वाटले ३०–४० हजार पब्लिक आहे. लगेच सोडणार! कोणी तरी सांगितले, मुंबईच्याबाहेर आडवळणाला नेऊन सोडताहेत. खूपच सस्पेन्स निर्माण झाले. घाटकोपरमध्ये आमच्या बॅचची बस शिरली तेव्हा एकजण ओरडला, ' घाटकोपर पोलीसठाण्यात नेणार. ' त्याने असे ओरडायला, बस ठाण्याच्या आवारात शिरायला व मुसळधार पाऊस पडायला एकच गाठ पडली ! इतका वेळ गाडीत एकाकी पडलेल्या ३–४पोलिसांना एकदम बळ आले. ' उतरना नही ' वगैरे दमबाजी. नादेडचं एक पोरगं म्हणालं, ' साहेबाची गाड हवालदारांना दिसली की साले ताठ होतात !' मुसळधार पावसात बोचके, गाठोडे, शबनम, झोळ्या डोस्क्यावर घेऊन पळत पळत आम्ही घाटकोपर पोलीसकस्टडीच्या फाटकातून आत आश्रयाला आलो. थ्री स्टोरीड कस्टडी होती. आमच्या मागोमाग दोन बसेस भरून आल्या. दुसऱ्या मजल्यावर तीन कोठड्यांत आम्हा १३० जणांना कोंबण्यात आलं. चिखल आणि जादा लोडामुळे आधीच घाणेरड्या असलेल्या कस्टडीनं किळसवाणं स्वरूप प्राप्त केलं. प्रत्येकानं स्वार्थापोटी जमेल तशी निवाऱ्याची जागा घेतली. १० बाय १० च्या आमच्या कोठडीत चक्क ५५ जण होते. एकमेकांचे पाय दुसऱ्याच्या अंगावर जायचे इतकी अडचण. एक पोरगं म्हणालं, ' रात्री आता एकमेकांच्या गांडी हुगा !'

सगळ्यांना भुका लागलेल्या. खेड्यातून आलेल्या पोरांनी भाकरी सोडल्या होत्या; पण बहुसंख्य पोरांकडे काहीच नव्हते. भत्ता मिळायची चिन्हे नव्हती. सुभाष लोमटेच्या मागे पोरं लागली. सुभाष पो. स्टे. च्या कोणी तरी जोशी नामक फौजदाराशी बोलायला गेला. आला तेव्हा तो म्हणाला, 'जोशीनी आपल्याला भत्ता देण्याचा आदेश

हे सारं मला मुद्दाम लिहावंसं कधी वाटलं नाही. मी रोजच काही तरी खर्डत गेलो. लिहिता लिहिता एक वहीच तयार झाली. १५ दिवसांनी सुटल्यावर, बाहेर आल्यावर स्नेही मंडळींनी कारागृहाचे अनुभव लिहिले. संडे ऑब्झर्वरने एक भिकार लेख छापला. मराठी साप्ताहिकानेही.

यांच्यापेक्षा आपण लिहिलेलं निश्चित चांगलं असं मला वाटलं. लोक काय वाटेल ते छापून आणतात. आपण रोज नोंद केली, जेवढें आठवले तेवढे लिहले. भाषेचे कंगोरे न घेता. हे कोणी छापेल का ? असं वाटतंय.

३ नकार —निशिकांत

---

नाही म्हटलंय. ते स्वतः प्रयत्न करताहेत. तासाभरात काही तरी होईल !' रात्री १२ वाजता पाव आणि पातळ वरण एकदाचे आले. एकदम इतकी झुवड उडाली की, पोलीस, नेतेमंडळी याचेही कोणी ऐकेना. पोटापुढे सबकुछ झूटच. पँथरची नेतेमंडळी हुषार. स्वतः अगोदर घ्यायला पुढे. युक्राद—सेवादल याची 'दाळ' या बेशिस्तीपुढे शिजली नाही. रात्री झोप मात्र इतकी फक्कड लागली की, ढेकूण, पिसवा व खाली फरशी होती हे जाणवलेही नाही.

संडासची मात्र पंचाईत झाली. सकाळी प्रत्येकाची घाई व नाइलाज. इतका गलिच्छ संडास व बाथरूम आपण जन्मात पाहिलं नाही. गू-खाडी बरी असं पोरं म्हणायची. दोन संडासात १३० पोरांचे लोड. ओतप्रोत भरून कमोडच्या वर गुवाचा ढीग साचू लागला. लघवीचे ओघळ तर कोठडीपर्यंत आले होते. वरच्या मजल्यावरील मुत्रीचे टपकणेही आत येत होते. मला हगायला जायचा धीर झालाच नाही. असे बरेच जण होते; पण त्यांनी बहुधा बेंबीला थुका लावून शी दाबून ठेवली की काय कळले नाही; पण मला तर खूपच जोरात लागली. नाकाला टॉवेल गुंडाळून गेलो. बसलो. संपूर्ण संडासात झुरळेच झुरळे ! खालून साचलेल्या गुवाचा इतका प्रचंड गॅस निर्माण झाला होता की, डोळ्याला पाणी आले. मळमळू लागले. तसाच उठलो. याचा परिणाम एक झाला. माझी काठावर आलेली 'शी' आत गेली !

सात तारखेची सकाळ होती. १० वाजले. सोडण्याची काहीच चिन्हे नव्हती. पोरं अस्वस्थ होऊ लागली. मजले चढू-उतरू लागली. आमच्यात काही लहान पोरं होती. त्यांना बाहेर काढण्यात आलं. त्याना सोडलं. ही पोरं बाहेरून विचारू लागली,'आम्ही कुठे जायचे ?' त्याना मुबईही ठाऊक नाही. मग वडाळयाच्या सिद्धार्थ हॉस्टेलला कशी जाणार ? त्यांचे काय झाले ते ठाउक नाही; पण ते बाहेर पडताना खुषीत गेले.

आम्ही २-३ जण खालच्या मजल्यावर मूळ प्रवेशद्वाराशेजारी होतो. या मजल्यावरच्या कोपऱ्यातील बराकीत ३-४ बायकांना पकडून ठेवले होते. त्यातील एका बाईसोबत ३-४ वर्षांची गोड पोरगी होती. या पोरीला महिला हवालदाराचा लळा होता. कारण तिच्या हातचेच ती खायची. या कोठडीची इनचार्ज महिला हवालदार एकदम भारी चीज. अगदी टंच भरलेली. गार्डन सिल्कची बहारदार साडी मॅचिंग वगैरे अशी होती. ती गेटच्या आत आली आणि पोरं चेकाळली. ती रुबाबात तिच्या कोठडीत जाऊ लागली अन् एका पोराच्या अंगात आले. त्याचा हेतु काय न कळे; पण तिला त्याचा धक्का लागला. ती उखडली ! काय होते ते कळायच्या आत त्या मोहक महिला हवालदाराने पोराला ओढत एकच थाडकन थोबाडात मारली. २५-३० पोरांच्या समक्ष! कोणाची हिम्मत झाली नाही तिला बोलायची. नंतर काही जणांचा 'पुरुषार्थ' जागा झाला. बाईने सत्याग्रहीना मारले हा अपमान वगैरे; पण या पुरुषार्थाला पाठिंबा मिळाला नाही. पुढे ती बाई आली की पोरं तिच्या नजरा चुकवून पहायचे. तिचाही रुबाब वाढला. गेटवरचा हवालदार मात्र पोरांच्या बाजूचा निघाला. तो म्हणाला, 'तिला म्हणा साहेबाच्या पुढं कपडे काढती तेव्हा रुबाब कुठं जातो ?' त्याने मग कस्टडीतील महिला कैदी व महिला हवालदार यांचेशी फौजदार, कॉन्स्टेबल मंडळी कशी हात फिरवतात याची वर्णनं केली. आम्हाला ते काही खरं वाटलं नाही. कारण मग पोरांचा प्रश्न 'इतकं चालतं तर पेपरात छापून कसं येत नाही ?'

दुपारी नावांची यादी तयार झाली. दरम्यान एक मॅजिस्ट्रेट येऊन गेले. सुभाषनी त्यांना संडास नेऊन दाखवले. तेथील गॅसचा त्यांनी धसका घेतला असावा. कारण त्या वेळी ते म्हणाले, 'तुम्हाला एका तासात दुसरीकडे हलवतो.' त्यांना किती दिवस शिक्षा दिली, कोणते कलम घातले, काहीच माहीत नाही. न्यायसंस्था व शासन मिळूनच चळवळी दडपू शकतात हे पटले. मॅजिस्ट्रेटने आम्हाला पाहिले नाही, काही विचारले नाही व शिक्षा दिली. वा ! एकूण न्यायसंस्था थोर !

बसेसमध्ये दुपारी २ वाजता आम्हाला बंद करण्यात आलं. बरोबर ४ हवालदार एक फौजदार. तीन बसेस भरल्या. आमची वरात निघाली. मोकळी हवा बरी वाटली. मुंबईचे नजारे दिसायला लागले. तासभराने गाडी फिरून 'आर्थर जेल' समोर उभी राहली. आम्हाला वाटले इथं ठेवणार !

अर्ध्या तासाने फौजदार वापस आले व म्हणाले, 'हा जेल भरलाय. आता ठाण्याला जावे लागणार !' पुन्हा दीड तासाने ठाणे जेलच्या आवारात पोहचलो. तेथे गेटवर पोरांची भली मोठी राग लागलेली. शिवाय जेलच्या आवारात ८-१० बसेस उभ्या ठाकलेल्या दिसल्या. दुसरी पोरं पाहून प्रत्येकाला चेव आला. घोषणा सुरू झाल्या. हळूहळू प्रत्येकजण मुतण्याच्या नावाखाली खाली उतरले. त्यांना आवरायला कोणीच नव्हते. सुमारे ६०० पोरं त्या वेळी जेलच्या पुढे होती. पोरांनी कुठेही मुतायला सुरुवात केली.

माझ्या समोर एका वाह्यात पोराने हातात लिंग घेतले व तो जेलच्या दगडी भिंतीवर मुतायला लागला व म्हणू लागला, 'इसमे इतनी ताकद है के मराठवाडा विद्यापीठ तो क्या हम 'इससे' ये जेल को गिरा सकते हैं!' तेथे दुसऱ्या कस्टडीत आमचे कसे हाल झाले ते प्रत्येकजण सागायला लागला. खूपच मोकळीक मिळाली होती व पोलीस-रखवालदाराचा पत्ता नव्हता. काही जण चहा प्यायला पळाले. मी मात्र जेलच्या बाहेर असलेल्या एका 'झकास' संडासात जाऊन कार्यभाग उरकून आलो. खूप बरे वाटले. प्रकाश म्हणाला 'बरे वाटणारच. शेवटी 'त्याग' केला की समाधान मिळते बघ!'

ठाणा जेलमध्येही आम्हाला 'जागा' मिळाली नाही. कल्याणच्या जेलमध्येही जागा नव्हती. आमच्याबरोबरच्या एका फौजदाराने पुण्याच्या येरवडा जेलला फोन लावून चौकशी केली व दीडशे लोकांसाठी जागा राखून ठेवा असेही सांगितले. मग आमची वरात येरवडयाच्या दिशेने सायंकाळी ५ वाजता निघाली.

कल्याणला दोन्ही बसेस बदलाव्या लागतील असे ड्रायव्हरनी सांगितले. त्यामुळे आम्ही ९० जण बसस्टॅंडवर उतरलो. एक बस थेट पुण्याला गेली. कल्याण बसस्थानकावर उतरताच पोरं सैरभर झाली. दीड दिवसाचा उपवास आणि समोर केळांच्या गाडया, झुणका–भाकर–केंद्र. पोलिसांनी बघ्याची भूमिका घेतली. दोन तास हॉल्ट झाला. काही पोरांनी तंबाखू, बिडया, मंजन, पेस्ट, साबणवडया, पोस्टकार्डे घेऊन ठेवली. आम्ही प्रथम बुकस्टॉलवर जाऊन पेपर्स घेतले, दहा. अगदी कल्याण समाचारपासून टाइम्स. सर्वांचे रिपोर्टस वाचले. सर्वांनी पेपरवाल्यांना शिव्या दिल्या. कारण सत्याग्रहीचा आकडा तीन हजार सर्वत्र होता. मग एवढेच सत्याग्रही असतील तर जेल भरले कसे? आम्हाला जागा का नाही? पण पोरं शिव्याही द्यायची व पेपरही आधाशासारखी वाचायची.

बसेस बदलल्या. खाण्यापिण्याने सर्वांनाच तरतरी आली. पोलिसही दोस्त झाले. मग कल्याणहून आठ वाजता निघालो. निघण्यापूर्वी सर्व सत्याग्रहीची मोजणी झाली. आमच्या बसमध्ये दोन कमी भरले. मग शोधाशोध. पोलिसवाले घाबरले. ताणाताणी. मुताऱ्या, संडास, जवळपासचे हॉटेल्स सर्व धुंडाळून झाले. कोणी तरी आयडिया काढली घोषणा द्या. कुठं 'बसले' असतील तर येतील. मग घोषणा झाल्या. 'मराठवाडा विद्यापीठाला डॉ. आबेडकरांचे नाव मिळालेच पाहिजे'; पण पोरं काही आली नाहीत. पाच पोलीस व दोन फौजदार आम्हाला शिव्या द्यायला लागले, 'आता तुमच्यामुळे आमच्या नोकऱ्या जाणार! तुम्हाला मोकळीक दिली व असे झाले.' हे सर्व होत असताना ही पोरं नेमकी कोण होती तेही कोणाच्या लक्षात येईना. ती कोणाच्याच ओळखीची नव्हती. एकजण म्हणाला, किनवटचे होते तर दुसरा नांदेडचे. आता त्यांचा चेहरा तरी कोणाला आठवतोय? मग शोधायचे कसे? तेवढयात एक पोरगं म्हणालं, 'त्याने तांबडा सदरा घातलाय. तो मला गाडी वळताना दिसला.' मग येष्टया थाबल्या कल्याणच्या भर चौकात. तीन–चार शोधू लागले. अर्धा तास गेला. मग रेल्वेस्टेशन शोधून झाले. पोरं काही गवसेनात! तेथील पोलीसस्टेशनवर आमच्याबरोबरचे फौजदार गेले. फोनाफोनी. टोटल पूर्ण होण्यासाठो 'दोन जणांची' भरती होणे आवश्यक होते. पोलीसठाण्यावर कोणीही पकडलेले कैदी नव्हते. तेथील सर्कलइन्स्पेक्टर औरंगाबादचे. ते आम्हाला पाहून म्हणाले, 'तुम्ही इथेही आमचा पिच्छा सोडत नाही ना,' आम्ही सर्व बसमध्ये बसून. लोक कुतूहलाने बघायचे. तेवढयात दोन पोरं बस जवळून जात होती. त्यांनी बस कुठं चालली म्हणून नेमके हवालदाराला विचारले. दोन्ही पोरं गरीब. हातात पिशव्या अशा अवतारात होती. हवालदाराने प्रथम त्यांना हाकलले! त्याने हाकलायला व मी प्रवीणला म्हणायला एकच गाठ पडली की, 'या पोराना आता उचलून आपल्यात भरती करणार!' झालेही तसेच. पोरं हटकल्यानंतर जर्राऽऽशी पुढे गेली नाहीत तोच फौजदारसाहेबांनी त्याना अडवले व तावडतोब पुकारा केला की, 'सत्याग्रही सापडले. ड्रायव्हर, गाडी चालू करो.' पोरं भाबावलेली. आमच्यात आली आणि मग त्यांच्या व इतर सर्वांच्या लक्षात खरा प्रकार आला. पोरांनी त्या नवल्यांची व पोलीसवाल्याची भरपूर चेष्टा केली. त्या दोन पोराची नावे यादीत घालण्यात आली. एकाचे नाव सिद्धार्थ सोनवणे तर दुसऱ्याचे गौतम होते. म्हणजे पोरं एकूण 'मॅचिंग' मिळाली, अशी पोलीसवाल्यांची कॉमेंट. या पोराची गंमत म्हणजे ते मूळचे नगर जिल्ह्यातील पारनेरचे. मुंबईत नोकरी शोधण्यासाठी आलेले दोघांनाही 'नामांतरा'विषयी काहीही ठाऊक नव्हते.

शेवटी कल्याणला ४ तासांचा मुक्काम करून आमच्या एष्टया रात्री १० वाजता येरवडा जेलच्या शोधात निघाल्या. पोरं पेंगू लागली. खोपोलीच्या झगमगाटाने भर मध्यरात्रीही घाटात पोरांना तोंडात बोटे घालायला लावली. पुन्हा निजानीज. लोणावळयाच्या आधी मुतण्याचा विधी झाला. प्रवासात बरोबरच्या दोन पोलिसांशी गप्पा झाल्या. नुकतेच पोलीस-आदोलन झाले होते. त्यामुळं पोलिसांचा सर्वच चळवळीविषयी थोडाफार सहानुभूतीचा दृष्टिकोन जाणवला. पोलीस-आदोलनातील भानगडी ऐकल्या. एक नवा पोलीस सागत होता, 'सी. आर. पी.च्या माणसांनी चक्क आमच्या बायकावर बलात्कार केले. आम्ही मनात आणले असते तर सशस्त्र उठावही केला असता.' नामांतर मोर्चा प्रकरणी या वेळी पोलिसांची सहानुभूती असल्याचे उगाच जाणवले. काही फौजदारांनी तर 'तुम्ही वाटेल ते करा. आमचा तुम्हाला आतून पाठिंबा राहील' असे बोलून दाखवले. पोलीस–आंदोलनाला सर्वांनीच पाठिंबा दिला. आता पोलीस सर्वांना पाठिंबा देणार आणि यातूनच मग पोरानी घोषणा काढली, 'अरे अंदरकी ये बात है, पोलीस हमारे साथ हैं.' ही घोषणा फारच पॉप्युलर ठरली.

पुण्यात दाखल झालो. ड्रायव्हरला रस्ता माहीत नव्हता. रात्रीचे तीन वाजलेले. स्टॅंडवरून एका मार्गदर्शकाला बरोबर घेतलं. त्यानं भलतीकडेच नेलं. शेवटी तासाभरानं जेल सापडला. सर्व पोरांनी 'हुश्श' केलं. तब्बल ३५ तासांनतर 'बस बंदी' तून सुटका झाली!

(झोपण्यापूर्वीची टीप: हे झालं सत्याग्रहाच्या नंतरच्या दिवसाविषयी. जेलात दाखल झालो त्या वेळचे एक लिहायचे राहून गेले. जेलच्या प्रवेशद्वारातून आम्हाला आत घेतलं. तेथल्या पॅसेजमध्ये खाली बसवण्यात

आलं. दंडुके उगारून सांगण्यात आलं, खिशातली रोकड रक्कम बाहेर काढा. आत पैसा सापडला तर ठोकून काढू! पोरानी पैसे मोजायला सुरुवात केली; पण मोजणी पूर्ण व्हायच्या आत नावे पुकारण्यात येऊ लागली व 'पैसे कितीहेत ?' असं दरडावून विचारण्यात येऊ लागलं. घाईगर्दीत कुणी काहीही सांगितलं. ज्यानी जास्त असून कमी सागितले ते बुडाले. आमची पाळी आली, पैसे जमा केले. तेव्हा लेखावहीत सहीच्या ऐवजी 'अंगठा' घेतला. मला सही येते असे म्हणण्याचे धाडस झालं नाही. दुसऱ्या प्रवेशद्वारातून खऱ्या जेलात प्रवेश करण्यापूर्वी कपडयांची व शारीरिक तपासणी झाली. प्रत्येकाच्या शबनम–झोळीतून कपडे उस्कटून काढण्यात आले व अंगावरून हात फिरवण्यात आला. तेथील रखवालदाराने काही नवख्या पोराच्या गोटयाना हात लावून त्या दाबल्या. ही पोरं आत आल्यावर विचारायला लागली, 'तुमच्या गोटया पिरगळल्या का ?')

## ९ सप्टेंबर

सकाळ झाली व जेल बघण्याची उत्सुकता वाढली. बाहेरचे दार 'बराकीचे' टोल पडल्यानंतर उघडण्यात आले. कोंडवाडयातून गुरं बाहेर पडतात तसे आम्ही बाहेर आलो. दुसऱ्या बराकीतली पोरं ओरडत आली. अनेकजण ओळखीचे निघाले. धुळे, सागली, सातारा, बीड, उदगीर, नांदेड, औरंगाबाद, लातूर इथली मंडळी भेटली. प्रत्येकजण पोलीसकस्टडीत कसा त्रास झाला ते सांगायला लागले.

आम्ही ज्या सर्कल नं. ३ मध्ये होतो तेथे सहा बराकी होत्या. एक मोठे मैदान. मैदान सपल्यावर एक मनोरा. तेथून पहारा होता. जेलच्या एका टोकाला हा भाग होता. एका बराकीत नियमाप्रमाणे ७५ कैदी ठेवले जातात. आम्हाला मात्र दीडशे–सव्वाशे संख्येने कोबण्यात आले होते. प्रत्येक बराकीत रात्रीच्या वापरासाठी एक संडास होता. त्याच्या दरवाजातच पाण्याची दोन पिपे. एक धुण्याच्या वापरासाठी, दुसरे पिण्याच्या. त्याची जागा बदलायची नाही असा हुकूम. सराव होईपर्यंत पोरं 'धुण्याचे' पाणी प्यायचे व पिण्याच्या पाण्याने धुवायचे. बराकीतले कैदी वॉर्डन वगैरे खूप आरडा–ओरडा करायचे. सत्याग्रहीपेक्षा 'कैदी' स्वच्छतेचे भोक्ते होते हे मात्र खरे. प्रत्येक बराकीच्या बाहेर आठ संडासांची रांग व आंघोळ करण्यासाठी, कपडे धुण्यासाठी 'पाट' असे. या पाटात दोन वेळा पाणी येई. त्या दरम्यान आंघोळ उरकणे व कपडे धुणे असा प्रोग्रॅम करणे आवश्यक. पोरांना शिस्त व स्वच्छतेचे प्रेम नव्हतेच. पाटातच कपडे बुचकळायचे व आंघोळ करायचे. त्याच्यामुळे इतरांना 'आंघोळ' करता यायची नाही. पुढे मात्र सामुदायिक आंघोळी सुरू झाल्या. संडास भारी होते. त्यांना दरवाजेच नव्हते! जेलच्या संडासचे वैशिष्टय म्हणजे त्यांना अर्धे दार असे. म्हणजे तुम्ही हगायला बसला तरी डोके बाहेरच्या जमादाराला दिसले पाहिजे. प्रारंभीच आम्ही या संडासला अर्धे दरवाजे तरी बसवा अशी मागणी आमच्या सर्कलच्या जेलरकडे केली. जेलमध्ये प्रचंड नोकरशाही आहे कोणताही निर्णय वरून येत असतो. आम्ही वरच्या 'सुपरिटेन्ड' साहेबांना अनेक मागण्या घेऊन भेटलो. रात्री जवळपास ४० संडासांना पत्रे आणि लाकडाचे अर्धे दरवाजे बसवण्यात आले. त्यांना लाल रंगही देण्यात आला होता. सकाळी पोरं हगायला गेली. लाल रंग कमोडमध्ये लावताना पडलेला होता. पोरांना वाटले रक्तच पडले. बोंबलत बाहेर आली मग खरे कळल्यावर हसायला लागली. संडासाचे दरवाजे टिकत नाहीत असे तेथील जाणकार कैद्यांचे मत होते. हळूहळू रोज हे लाकडी दरवाजे तोडून बराकीत उशाखाली आणून ठेवले जातात. कारण जळणाऱ्या वस्तूला जेलात खूप महत्त्व. या लाकडांवर रात्री 'सिनियर कैदी मंडळ' स्वैपाक करतात आणि संडासाचे दरवाजे ह्या कामासाठी चांगलेच उपयोगी पडतात. आमच्यासाठी दरवाजे लावणे चालू झाले तेव्हा बहुसंख्य कैदी खूष दिसले.

## ११ सप्टेंबर

सुपरिटेन्डसाहेबांशी भांडून आलो. आमच्या अनेक मागण्या होत्या. रात्री ८ वाजता 'बंदी' करण्यात यावी. खायला 'ए' ग्रेडचे द्यावे. सकाळी 'गंजी 'च्या ऐवजी चहा द्यावा. खेळायला साधने द्यावीत. जेवणात भात असावा. बहुतेक मागण्या फेटाळण्यात आल्या. जेवणाच्याबाबत जेल आय. जी. पीना आम्ही भेटलो. हा गृहस्थ सिंधी होता. तो म्हणाला, 'मी मिनिस्टरशी बोललो. ते 'ग्रेड' द्यायला तयार नाहीत. आम्ही 'मॅन्युअल'-मध्ये जेवढ्या सोयी आहेत तेवढ्या देणार.' त्याच्या वक्तव्याचा आम्ही निषेध करून 'बोलण्यावर' बहिष्कार टाकला व जेलमधील गांधी यार्डसमोर (जेथे आंबेडकर–गांधी यांचा 'पुणे–करार' झाला) उपोषणाला बसण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय जेलच्या शिस्तीत बसणारा नव्हता. अनेकाचा त्याला विरोध. आपल्या प्रत्येकाला 'सेपरेट'-मध्ये टाकतील अशी भीती कुणी तरी व्यक्तविली, तर कुणी आपल्याला मारहाण करतील अशी. मग त्याचे पडसाद 'जेलमध्ये लाठीमार' इथपर्यंत काहीचे विशफूल थिंकिंग गेले. मुळात काहीच झाले नाही. उलट आय. जी. पीने पाण्याची सोय केली व शुभेच्छा दिल्या जेलच्या आत तुम्ही काहीही केले तरी ते बाहेर ऐकू जात नाही अशी कुत्सित हेटाळणीच जणू त्यानी केली.

## १२ सप्टेंबर

सकाळी उठलं की गंजी पिण्यावरून पोरांची मारामारी व्हायची. पहिल्या दोन दिवशी ही गंजी पोरांनी नाकारली होती; परंतु नंतर तीच प्यारी बनली. जेलमधील 'खाणं' हे एक स्वतंत्र प्रकरण आहे ते असं.

संपूर्ण जेलचे म्हणून एक स्वयंपाकगृह असते. त्याला 'भिशी' म्हणतात. येरवडयात मात्र दोन भिश्या आहेत. आमच्या सर्कलची भिशी स्वतंत्र होती; परंतु जेलमधील ९० % मंडळीना रसद पुरवणारी जी भिशी होती तीच महत्त्वाची. तिची रचना गोलाकार. फार स्वच्छता नाही. सकाळी ३ वाजता इथे स्वयंपाक प्रकरणाला सुरुवात होते. सकाळी ९ वाजता पहिले जेवण तयार तर दुपारी १ वाजता संध्याकाळचे जेवण डब्यात घालून बराकीत रवाना केले जाते. डोळयाच्या पापण्या उघडझाप होईपर्यंत १० पोळया तव्यावर भाजून होत असतात. दाळ म्हणजे वर पाणी. तेल हे बहुधा चोरण्यासाठीच. भाजी मात्र ठरलेली. सोमवार ते शुक्रवार रोज सकाळी शेपू. संध्याकाळी करडी, चुका,

एकदा वांगे, एकदा जाड्या शेंगा. दाळीचे वार ठरलेले. आठवड्यातून ८ जेवणात मसुरची दाळ म्हणजे वरणे. फक्त रविवारी चना दाळ, दोन वेळा तुरीचं वरण. आठवड्यातून ५ जेवणात फक्त भाताची वाटी. पूर्वी फक्त रविवारीच एकदम ४०० ग्रॅम भात द्यायचे. अनेक सूचनानंतर हा ४०० ग्रॅम वाटून आठवड्यात ५ वेळा दिला जातो. जेवणाचा दर्जा एकदम सामान्य. पोळ्या म्हणजे कणिकच. त्याला लागलेले पीठ झटकण्यात पोरं १० मिनिटं घालवायची. पोळ्या पूर्ण भाजायच्या नाहीत असे 'जेल मॅन्युअल' सांगते. त्यामुळे बोलायची सोय नाही. एकूण प्रत्येक जेवण ४२५ ग्रॅम धान्याचे. त्याचा खर्च २ रुपये ३० पैसे येतो म्हणे. रविवारी सकाळच्या जेवणात गुळाचा खडा ५० ग्रॅम व १०० ग्रॅम डालडा तूप ही मेजवानी. जेलरला लहर आली तर या गूळ-तुपाचा मिळून शिरा करण्याची परवानगी मिळत असे. आम्ही सगळा गूळ व तूप कैद्यांना दिला. त्याचा फायदा आम्हाला रात्री झाला. कैद्यांनी चक्क शंकरपाळे केले-कुरकुरीत !

या भिशीत काम करण्याची शिक्षा अनेकाना मिळत असली तरी ती देणगी मानली जाते. कारण भरपूर माल मारता येतो. अर्थात जेलर, जमादार व मग कैदी असा माल खाल्ला जातो. रात्री बराकीत कैदी जो स्वयंपाक करतात त्यातील काही वाटा रात्री ड्यूटीवर असणाऱ्या जमादारांना चारावाच लागतो. स्वयंपाकगृहातील धान्य मारण्याचे जे रॅकेट जेलमध्ये असते त्याची वरची पायरी जेलर तर खालची वॉर्डन. सिनियर कैदी मात्र आरामात बसून सगळे चांगले पदार्थ लाटतात. मेडिकल झाले की डॉक्टर दूध व पाव रेकमेन्ड करतात. हा पाव वरून अतिशय लुसलुशीत दिसतो; परंतु अतिशय कच्चा असतो. त्याच्या आतील कच्ची कणिक काढून दोन पोळ्या होतात, असे अनुभवी बोलही ऐकायला मिळाले. डॉक्टरांनी 'रेकमेन्ड' करण्यासाठी बरीच वाकडी वाट चालावी लागते. दुधाचेही तसेच.

मिळणारे जेवण पाहून प्रारंभी आमच्यापैकी बरेच वैतागले. आम्ही कुरकुर करायचो. तसे कैदी म्हणायचे खाऊन घ्या. तुम्ही आल्यामुळे थोडे तरी चांगले आमच्या वाट्याला येतंय. जेलच्या मुख्य भिशीजवळ एका संगमरवरी दगडावर विनोबाचे स्वयंपाकाविषयीचे एक वचन कोरलेले पाहिले की हसूच आले.

## १३ सप्टेंबर

साधारण टवाळक्या करण्यापलीकडे व झोपण्याशिवाय दुसरा उद्योग जेलमध्ये नव्हता. पुस्तके कोणीच आणली नव्हती. कार्यकर्ते कमी व जनता जास्त असा प्रकार असल्याने चर्चा-बौद्धिके ऐकायला कोणी उत्सुक नसायचे. सकाळी ८-३० वाजता आम्ही एक जाहीर चर्चासत्र ठेवले. दलितांचा प्रश्न असला की सर्व यायचे. शेतमजूर, मुस्लिम किंवा स्त्रियांचा प्रश्न असा विषय असला की पब्लिक थोडा वेळच बसायची आणि चर्चेच्या दृष्टीने आनंदच.

## १४ सप्टेंबर

कैद्यांशी ओळख झाली व गप्पा सुरू झाल्या. काही जण मोकळेपणाने सांगायचे की माझ्या भाभीवरच बलात्कार केला म्हणून ४ वर्षे शिक्षा भोगतोय. कोणी शांतपणे सांगायचे मी ३०२ मध्ये आलोय, जन्मठेप (पीलीपट्टी) आहे. असे किती तरी प्रकार. काही जण मात्र बोलायला टाळायचे. घडलेल्या गुन्ह्याशी दूरान्वयेही संबंध नसताना शिक्षा झालेले खूप आढळले. ते कमी बोलायचे. पण त्यांच्या नजरेत त्वेष दिसायचा. आयुष्याची १५ वर्षे जेलमध्ये रखडल्यावर बाहेर पडायचे. मग करणार काय ? गुन्हा न करता आत आलो, आता गुन्हा करून (बदला घेऊनच) आत येऊ अशी भावना असायची. तर काहीचे म्हणणे रागाच्या भरात हातून कृत्य घडले ती 'वेळ' सावरता आली नाही, त्याचीच ही शिक्षा ! असे किती तरी कैदी. खूप प्रेमळ वाटणारे, आतून पिचलेले.

## १५ सप्टेंबर

कैद्यांशी बोलणे हा विरंगुळाच झाला. कैदीही बोलत, गाणे म्हणत, खेळत. पोरंही काका, मामा करायचे. कैद्याना सगळी पोरं म्हारं आहेत हे ठाऊक झालं होतं; पण कधी त्याच्या वागण्यात जातीयता दिसली नाही. जेलात सर्व 'कैदीजातीचे' अशी एका कैद्यानेच जेल-समतेची व्याख्या ऐकवली.

आमच्या बराकीचा वॉर्डन-××× होता. जातीनं चांभार. कर्नाटकातला. आला तेव्हा त्याला कन्नडीशिवाय काहीच बोलता यायचे नाही. आता हिंदी-मराठी फार मजेशीर बोलतो. हा आता थकलाय; पण दोन वर्षांत सुटण्याची आशा त्याला जगवतेय. एका जमीनदाराने ह्याची जमीन बळकावली म्हणून याने खून केला असे समजले. जेलमध्ये सर्व कैदी त्याला 'xx' म्हणतात. बिड्या, खरेदीचे कूपन्स, सिगरेट याचा हा गडी साठेबाज. त्याच्या अवाढव्य ढेरीखाली हा कूपन्स लपवायचा. विड्या महागाने विकायचा. त्याने जेलमध्ये राहून बरीच मिळकत कमावली. गावाकडे जमीन विकत घेतली. मुलीचे लग्न उरकले असे त्याचे सहकारी म्हणायचे. हा देवाचा भक्त. तो ज्या जागी झोपायचा तेथील खिडकीत त्यानं 'देव्हारा'च तयार केलेला. नमस्कार केल्याशिवाय हा जेवायचा नाही. आम्ही त्याच्या देवाची चेष्टा करायचो. तो तेवढ्याच प्रेमाने रात्री हळूच वाटपात मारलेल्या चपात्या पोराना वाटायचा. रात्री तो पहारा करायचा अर्धवट झोपेत; परंतु बाहेरून जमादारानं पाय जरी वाजवला तरी हा ओरडायचा 'एकोणपन्नास टोटल है साब!' (अशी टोटल रात्री पहाऱ्यावरच्या वॉर्डनला द्यावी लागते.) मग पोरं मुद्दाम आवाज काढायची, या 'टोटल' देण्याला हसायची. यानं दोन खून केले असावेत हे शेवटपर्यंत मला खरं वाटलं नाही.

xxx नावाचा एक कैदी. काळाकुट्ट चेहरा व पांढऱ्या पुढं आलेल्या दातानं उठून दिसणारा हा गृहस्थ-मद्रासी. जेलमध्येच तो कारकुनीची शिक्षा भोगत असलेला. देवीचा भक्त. अतिशय स्वच्छ कपडे (जेलचा ड्रेस) वापरायचा. खूप अबोल. त्याच्या एका मित्राने कोणाचा तरी खून केला. खुनापूर्वी त्याचा मित्र xxx कडे आला होता. पोलिसांना तेवढेच पुरले. निरपराध xxx ला जन्मठेप झाली ! प्रारंभी काही वर्षे त्याने प्रामाणिकपणे कैद काटली. कार्यालयीन काम त्याने मागितले. तेथे त्याला ऑफिसमधील लोक कैदी व बाहेरच्या गुन्हेगारात कसा संपर्क साधून देतात, हशीश, चरस, गांजाच्या गोळ्या आत

पाठवतात, हे लक्षात आले. कार्यालयात असण्याचा फायदा मग x x x ने घेतला. आता कोणत्याही कैद्याला 'गोळी' लागली तर तो x x x कडे येतो. त्याचा धंदा जोरात चालतो. हा गृहस्थ देवीचे फुटाणे सर्वांना देतो. देवीची पूजा म्हणतो. त्याने २–३ वेळा तरी गोडधोड करून खाऊ घातले.

डॉमनिक हा जन्मठेपेचा कैदी. एकदम पॉश. त्याच्या ॲपीअरन्सवरून हिंदी चित्रपटातील सोनेरी टोळीत तो शोभेलसा वाटायचा. हा मूळ गोव्याचा. मुंबईत आला. शिकला. परदेशात नोकरी मिळाली होती जायच्या आदल्या दिवशी मित्रांनी पार्टी ठेवली होती. दारूपान झाले आणि बेहोशीत डॉमनिकने खून केला! परदेशाला जाणारा डॉमनिक येरवडा कारागृहाच्या बराक नं. ६ मध्ये दाखल झाला. जीवनाची अमूल्य १२ वर्षे इथे गेली! आता बाहेर काय? असा त्याचा प्रश्न आहे.

बादशाहा नावाचा एक म्हातारा 'दादा' होता. सगळे जेल (जेलरसुद्धा) त्याला घाबरायचे. दोन वेळा सुटून हा पुन्हा आत आला. जवळपास ८ जेल तो फिरून आलाय! तीन जेलर्संवर त्याने हल्ला केलाय. त्याला घरवाल्यांशी फार प्रेम नाही. प्रथम सुटला तेव्हा मुंबईत गेला. गॅंगमधील एकाला उडवले. पुन्हा आत. हा गडी केव्हा भडकेल, नेम नाही. त्याचा सर्व इंतजाम जेलमध्ये होत असतो. तो आमच्यात बराच मिसळला होता. त्याची राजकीय जाणही बरीच. झटकन आला की तो येरझारा घालायचा. आम्ही असताना त्याने एका कैद्याला चांगलेच हाणले व वस्तरा घेऊन तो मागे लागला होता. त्याची तक्रार वर गेली. आम्हाला वाटले त्याला साहेब झापणार; पण तो हसत लगेच परतला. असे किती तरी कैद्यांविषयी लिहिता येईल; पण आता हळूहळू लिहिण्याचाही कंटाळा येऊ लागलाय.

## १६ सप्टेंबर

आज एका कैद्याच्या विद्वत्तेने थक्क केले. याला सर्वजण 'कॅप्टन' म्हणतात. पाच वर्षांपूर्वी या कॅप्टनला शिक्षा झाली तेव्हा तो लष्करात मराठा इन्फंट्रीमध्ये कॅप्टन होता. त्या वेळी त्याच्या इन्फंट्रीत वरिष्ठ अधिकाऱ्याविरुद्ध थोडा असंतोष होता. संपूर्ण लष्करात बेबनाव निर्माण होण्याचीही शक्यता होती. त्या दरम्यान मराठा इन्फंट्रीमधील काही मेजर–कॅप्टन्सनी मिळून वरिष्ठांच्या विरुद्ध बंड केले आणि तेही सशस्त्र! या बंडात या कॅप्टनसाहेबाचे नाव गुतवले गेले व लष्करी न्यायालयाने इतराना सोडून देऊन कॅप्टनसाहेबांना जन्मठेपेची शिक्षा दिली. या कॅप्टनशी जेव्हा ओळख झाली तेव्हा जेलरसमवेत आमची चर्चा सुरू होती. जेलरच्या बाजूला अदबीने उभा राहिलेला हा कैदी आमच्या एका मुद्द्यावर फडर्या इंग्रजीत बोलायला लागला, तेव्हा प्रथम आश्चर्य वाटले. पुढे ओळख झाली; पण गडी फारसा बोलत नसे. सतत कामात. पुढे बोलायला लागला तेव्हा जाणवले की, त्याचे वाचन भरपूर आहे, राजकीय स्थितीचे कारागृहात असूनही त्याला चांगले ज्ञान आहे. राजकीय विश्लेषण तर झकासच तो करायचा. राजबंद्यांना मिळणाऱ्या वागणुकीवरून त्याच्याजवळ एकदा आम्ही बोललो. तो म्हणाला, 'तुमचे ठीकय; पण अंडरट्रायलसचे काय? त्यांना चक्क सडवले जाते!' असे म्हणून त्याने येरवडा व इतर कारागृहांतील अंडर ट्रायल्सच्या काही केसेस घेऊन तयार केलेल्या एका रिपोर्टची माहिती दिली. हा रिपोर्ट त्याने प्रत्यक्षरीत्या श्रीमती गांधींना दिला होता. अगदी अलीकडेच राज्यसभेत अंडर ट्रायल्सविषयी जे कायदे, सुधारणा नव्याने करण्यात आल्या त्या या रिपोर्टवरूनच असे जेव्हा त्या कॅप्टनने सांगितले तेव्हा मी उडालोच! अतिशय अभ्यासू वृत्तीचा हा कैदी वर्षभरात सुटणार आहे. तुरुंगात हा गडी अधिक गडद झाला. सुटल्यावर काय करणार या प्रश्नाचे उत्तर मात्र त्याने दिले नाही. आमच्यातील पोरांबरोबर तो फुटबॉल खेळला तेव्हा इतर कैदी आश्चर्याने पाहायला आले. ते म्हणाले, 'कॅप्टन को हम पहली बार खुष देख रहे हैं।

## १७ सप्टेंबर

आज गांधीयार्ड बघण्याची परवानगी घेतली. येरवडा कारागृहात गांधी–आंबेडकरांचा पुणे-करार झाला होता. त्याची स्मृती या यार्डात आहे. छान फुले व झाडे आहेत व वातावरण प्रसन्न. पुना-ॲक्टला पन्नास वर्षे याच दिवशी पूर्ण झालेली. म्हणून आम्ही लाइनीने गेलो. पोरं आत जायची. खोलीत गांधींचा फोटो होता, तो पाहून म्हणायची, 'गांधी बुढ्ढे की माँ की... अबे वो बुढ्ढे तेरी तो' असे म्हणत पोरांनी फुलझाडेही तोडली. आंबेडकराना देव मानणारी ही मंडळी गांधींचा इतका द्वेष करतात हे किती मोठे दुर्दैव!

जेलमध्ये अनिल खुतर्डीकरने एक गाणे ऐकवले. त्यात आंबेडकरांचे देवपण मोठ्ठं नेमकेपणानं व्यक्त केलेलं होतं. गाणं असं–

बाई भिमा माझा
देवाहूनी भारी देव
मग कशाले मी घेऊ व
दुज्यांचं नाव
बाई पिढ्या पिढ्या
वढत आल्या ढोरं
सुप्या टोपले घेऊनी
पयायची पोरं
आम्हा भिमानं देल्ल व
जीवन नव...
उन्हातान्हात
करीत होतो कष्ट
तरी खाव लागे
या मोठ्या लोकांचं उष्ट
आम्हा साभिमान काय
ते नव्हतं ठाव
मग कशाले मी घेऊ दुज्याचं नाव...

गांधीचे नाव न घेण्याचे हेही एक कारण असेल. बाकी काही असेना दलित पोरं गाणे म्हणण्यात पटाईत! गाण्याच्या अगोदर त्यांचा एक शेर होई व तो झाल्यावर उपस्थितांनी 'बोलो भीम भगवान की जय' म्हणणे आवश्यक असे. शेरांची शब्दजुळणी विचित्र असे. उदा.–

घार हिंडते आकाशी
तो तिचे लक्ष पिलावरी
बाबासाहेब सोडून गेले
तरी त्यांचे लक्ष दलितावरी
(बोलो भीम भगवान की जय)

गाण्यांनी कधी बरे वाटले तर कधी उबग आला. प्रवीण म्हणाला जातिव्यवस्थेचे लक्षण आहे.

बामना-घरी लिव्हणं
कुणब्या-घरी दाणं
तर म्हारा-घरी गाणं

## १८ सप्टेंबर

आल्यापासून आमच्या बराकीतील व इतर दोन–तीन पोराविषयी मला संशय होता. ही पोरं वयानं १५-१६ वर्षांची असावीत. शिवाय दाढी–मिशा न फुटलेली. त्यांची बरीच चलती होती. म्हणजे ३–४ कैदी त्याना भरपूर खायला-प्यायला द्यायचे. सतत या पोराच्या हातात हात घालून फिरायचे. बराकीत माझ्या शेजारी झोपणारा एक पोरगा रात्री उठून कोपऱ्यात जाऊन झोपायचा. तीन-चार कैद्यांनी या पोरांना बिडी–सिगारेट–गांजाचेही व्यसन लावले. दुपारी ही पोरं ३–४ कैद्यांबरोबर पाघरुणात झोपायला लागली.

आणि आज शेवटी म्हैसमाळजवळचा एक पोरगा, आम्ही ज्या कैद्याशी बोलत होतो त्या वेळेस तिथे आला. तो हातात जोडा घेऊन व त्याने एकदम एका कैद्याला 'भडव्या, तू रात्री पांघरुणात शिरून आमच्या गांडी मारतोस काय?' असा आक्रमक सवाल भर बैठकीत करताच सगळेच अवाक् बनले. तो कैदी गागरूनच गेला. सर्वांसमक्ष आपले भांडे उघडे पडेल असे त्याला वाटले नसावे. सुभाष (लोमटे) वगैरे मध्ये पडले नसते तर त्या कैद्याने मारच खाल्ला असता. त्याने एकदम माघारच घेतली. गम्मत म्हणजे त्याच रात्री त्या कैद्याने एकूण स्थिती ओळखून दुसऱ्या बराकीत स्थलातर केले. या गोष्टीचा संबंधित कैद्यात गाजावाजा झाला आणि बरेच कैदी नरम झाले. पुढे त्या म्हैसमाळच्या पोरांनी, २–३ मुलांना रात्री हा कैदी कसा 'रगडायचा,' पोराचे स्तन कसा चोखायचा, (गम्मत गम्मत म्हणून) पोरांचे लिंग हातात घेऊन कसा कुरवळायचा याचे किस्से सांगितले आणि मग सगळेच सावध झाले.

'लैंगिक जाणीव उफाळून आली की, आम्ही अस्वस्थ झालोच म्हणून समजा. ही भावना दडपून टाकण्यासाठी आम्हाला काय काय करावे लागते याची बाहेरच्यांना कल्पना येणार नाही. हस्तमैथुन (मुठ्या) मारायच्या असतील तरीही एकांत हवाच ना! तो कुठे मिळतो? मग त्यातून विकृती वाढते. हे प्रकार फार सामान्य आहेत.' असे कैदी मोठ्या प्रामाणिकपणे सागत होता. त्याने तर आम्हाला बायका कशा मिळतात याचा प्रकार सांगितला. तो म्हणाला, मागे एकदा मी अस्वस्थ झालो होतो. आजारी पडल्याचे नाटक केले. डॉक्टरांनी ससून हॉस्पिटलला धाडले. तेथे न जाता बरोबरच्या हवालदारानी ठरलेल्या लॉजमध्ये नेले. तेथे बायका होत्याच. काम झाले की पुन्हा जेलमध्ये वापस. यासाठी अर्थात बराच पैसा लागला. म्हणजे जेलच्या डॉक्टरपासून ते रखवालदारापर्यंत. बाईचे पैसे वेगळे. या कैद्याने तर असेही सांगितले की, 'आमच्यासाठी खास वेगळ्या रांडा असतात. अशा रांडा हॉस्पिटलमध्ये नर्सचे वेष घेऊन येतात व आमची इच्छापूर्ती करतात.'

या सर्व भानगडीवर व विकृतीवर काही उपाय आहे का? असा प्रश्न एका सुज्ञ कैद्याला विचारला तर तो म्हणाला, महिन्यातून एकदा आपापल्या बायकांना भेटण्याची (म्हणजे लैंगिक भूक भागवण्याची) व्यवस्था सरकारने केली पाहिजे. अन्यथा लैंगिक विकृतीचे पर्यवसन खुनातही होऊ शकते.

या कैद्यांजवळ पैसे कसे येतात हेसुद्धा मजेशीर प्रकरण. जेलमध्ये सगळे व्यवहार पाच पैशांच्या कुपन्सवर चालत असतात; पण तरीही काही कैद्यांजवळ नोटा असतात. एका कैद्याने सांगितले की, त्याला भेटायला पोरं यायची, सुनवाई यायच्या, तेव्हा सगळे एकदम पाय धरायचे व क्षणात चपलेतील पायाखाली दहा–दहाच्या नोटा कोंबायच्या. नोटा ढुगणात लपवूनही काही कैदी बाहेरून आणतात असेही एक म्हणाला.

आज दुपारी सर्कल नं. ५ मधील सत्याग्रहीना भेटायला गेलो. तेथे पोहचल्यावर काही पोरं एकमेकांच्या खांद्यांवर चढून एका दगडी भिंतीवर चढत होती. चौकशी केल्यावर कळले की, ती बरॅक 'फाशी गेट' म्हणून ओळखली जाते व तेथे जक्कल, सुतार, मुनव्वर शहा व रामन राघव यांना ठेवलेले होते. पोरांना हे कळताच त्यांना पाहण्याची उत्सुकता शिगेला पोहचली व म्हणून पोरं त्यांच्या खोलीच्या झरोक्यातून पाहण्याचा प्रयत्न करीत होती; पण त्यांना ते जमले नाही. म्हणून पोरानी 'जक्कल तेरे माँ की, सुतार तू गाडू है' अशा शिव्या त्याच्या खिडकीजवळ जाऊन द्यायला सुरुवात केली या शिव्या ऐकून जक्कल–सुतार भडकले. ते त्याच्या हाता–पायातील कड्याचा आवाज करू लागले. पोरानी त्यांना अधिकच चिडवायला सुरुवात केली. या पोरांना तेथील नेत्यानी मुष्किलीने आवरले. सर्व सामसूम झाल्यावर मी त्या बराकीच्या झरोक्याखाली जाऊन प्रथम झाल्या प्रकाराची माफी जक्कलकडून मागितली. उंच भिंतीच्या झरोक्यातून न बघता मी संभाषण करण्याचा प्रयत्न केला. जक्कल प्रारंभी काहीच बोलला नाही. शेवटी महत्प्रयासाने बोलला व म्हणाला, 'मी सध्या कुराणाचे भाषातर करतोय. मरणाची वाट बघतोय. मी निर्दोष आहे का नाही मलाच कळत नाही. मात्र आता आम्हाला इथं राहणं असह्य होत चाललय!'

या तिघाच्या कोठडीशेजारी रामन राघवची कोठडी होती. त्याच्याशी बोलायचा प्रयत्न करताच तो हातापायातील बेड्या सळसळ वाजवत चित्कारला. न बोलता झालेले या मंडळीसमवेतचे बोलणे हा जेलमधील सुखद अनुभव; पण या मंडळीचे चेहेरे बघता आले असते तर बरे झाले असते, ही रुखरुख लागून राहिली.

## १९ सप्टेंबर

उद्या सुटणार म्हणून पोरं खुषीत होती. कुपन्स संपविण्याची स्पर्धा होती. कुपन्स वाटप करणारे दोन कैदी एक कॅन्टीन इन चार्ज अप्पा व दुसरा जोगळेकर (पुण्याच्या बँक अफरातफर प्रकरणातील) असे होते. अप्पा हा शिवसैनिक. एका राजकीय मारामारीत तो गठला. त्याला जन्मठेप आहे. या गृहस्थाने चक्क १०–१२ मांजरीची पिल्ले पाळलीत. ती पिल्ले सारखी त्याच्या अंगाखांद्यावर असतात. जोगळेकर तर मजेत वाटायचा. आपण काही केले याचा पश्चात्ताप अनेकाना वाटायचा नाही. जोगळेकर त्याच प्रकारातील.

'प्रत्येक कैद्याला, वॉर्डनला रोज एक ते दीड रुपया मिळतो. (संडास साफ करणाऱ्याला दोन रुपये व एकूण कैदेत सूट दिली

जाते. त्यामुळे अनेक कैदी भंग्याचे काम करण्याची इच्छा व्यक्त करत असतात. ) या मजुरीत जनतापक्षाच्या काळात वाढ झाली. तत्पूर्वी या मंडळींनी संघटना स्थापन केली व दिवस निश्चित करून संपावर जायचे ठरवले. ही बातमी सुपरिन्टेन्डसाहेबांच्या कानावर गेली व रात्रीतल्या रात्री संपूर्ण लष्कर त्यांनी आणले. सकाळी लष्करी मंडळी पाहून सर्व कैदी टरकले. या लष्कराने हातात दंडुके घेऊन कैद्यांचे हे बंड चिरडलेच !

**२० सप्टेंबर**

आज सुटण्याचा दिवस. काल काहीजण सुटले होते; पण आमची ऑर्डर अजून आली नव्हती. अजून चेहरापट्टी ( Marking ) झाले नव्हते. पोरांनी सगळे सामान बांधून ठेवले होते. दुपारी १ वाजताच 'लाइन' लागली होती. एरव्ही नियमांच्या बाबत काटेकोर असणाऱ्या जेलअधिकाऱ्यांनी सतरंजी, पॉट, थाळ्या मोठे सामान जमा करण्याची अभिनव पद्धत शोधून काढली. एका बराकीत लाइनने येऊन दरवाजातून आत थाळी, पॉट व अंथरूण फेकायची व्यवस्था केली. एका क्षणात नऊशे सत्याग्रहींनी दणादण फेकलेल्या त्या थाळ्यांनी ती बराक भरून गेली.

पंधरा-पंधरा जणांच्या गटाने सर्व हिशेब करून सोडण्यात येऊ लागले. हिशेबात जवळपास घोळच होते. काहीच पत्ता नव्हता. तब्बल साडेतीन तास भर पावसात उभे राहिल्यानंतर आमची मागील दाराने सुटका झाली. बाहेर एकदम नेहमीची वर्दळ, लहान पोरांचे खेळणे चालू होते. पोलिसांच्या गाडीत कोंबल्यावर जेलच्या भिंतीकडे पाहिलं. आतमध्ये असताना ही भिंत मोठी वाटली होती. ज्या ३–४ कैद्यांनी भिंत ओलांडून पळून जाण्याचा प्रयत्न केला त्याचेही आश्चर्य वाटलं होतं. आता बाहेर आल्यावर ही भिंत किती लहान दिसत होती, वाटत होती.

□

## पुस्तके

# समर्थ दर्शन

### चिकित्सक लेखांचे रेखीव संपादन

६ फेब्रुवारी ( माघ वद्य नवमी ) १९८३ रोजी समर्थ रामदासांच्या निर्वाणास तीनशेएक वर्षे पूर्ण होतात. तीनशे वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या या समर्थ मराठी संताचे गुणसंकीर्तन त्रिशताब्दीनिमित्त गेले वर्षभर महाराष्ट्रात चालू आहे. उत्सव, यात्रा, कीर्तन, प्रवचने, व्याख्याने, परिसंवाद इत्यादी सर्व भावुक प्रकार उत्साहाने चालू होते व आता वर्ष मागे पडल्यानंतर समस्त भाविकजन पुन्हा आपापल्या प्रपंची रत झाल्याचे आढळून येते. शताब्दीउत्सवांचे हे पीक महाराष्ट्रात अलीकडे उदंड वाढले आहे; पण समर्थांच्याच शब्दांत सांगायचे तर 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे' हे कोणीच फारसे मनावर घेत नाही आणि मिरवेपणाखेरीज कोणाच्या हाती विशेष काही लागत नाही.

ज्याची तेजस्वी व कार्यप्रवण करणारी शिकवणूक चौवर्णिकांनी संपत्तीत वा विपत्तीत आचरणात आणण्यासारखी आहे असा सामाजिक जाणीव असणारा रामदास हा शिवकाळातील नव्हे मध्ययुगातील, एकमेव क्रियाशील संत होता. त्याचा 'दासबोध' ग्रंथ मुख्यतः ब्राह्मण आणि क्षत्रिय या दोन वर्गांना उद्देशून लिहिला असला तरी वैश्य-शूद्रादिकांनी पठण, चिंतन, अनुकरण करावे असे त्या ग्रंथांतरी विपुल आहे. ब्राह्मणी श्रेष्ठत्वाचा या ग्रंथातील जयजयकार आज कालबाह्य म्हणून सोडून दिला तरी या ग्रंथातील सर्वसामान्य प्रापंचिकास केलेला अनेकविध प्रेरणादायी उपदेश अब्राह्मणांनीही पूर्वग्रहदूषित दृष्टी न ठेवता घेण्यासारखा आहे. रामदासी वाङ्मयाचे आंधळे भक्त आणि सत्यशोधकी विचारवंत या दोघांच्या अभिनिवेशी विचारसंघर्षामुळे दासांच्या अस्सल कर्तृत्वाची नि क्षात्रधर्मी शिकवणुकीची विलक्षण गळचेपी झाली आणि बहुजन समाजाची नवी सुशिक्षित पिढी दासांच्या विचारधनाला पारखी होऊन बसली. दासबोध आज पाखडून घेतला तरीसुद्धा ओंजळ ओंजळ विचार मौक्तिके कुणाही निर्विकार प्रापंचिकाचे हाती लागतील.

आणि असा पाखडून पारखून घेण्याचा एक अभ्यसनीय, संग्राह्य चिकित्सक ग्रंथ 'प्राचार्य दांडेकर वाङ्मय प्रकाशन मंडळाचे' वतीने पुण्याच्या कॉंटिनेंटल प्रकाशनाने नुकताच प्रसिद्ध केला आहे. ग्रंथाचे नाव आहे 'समर्थदर्शन' म्हणजेच समर्थांच्या चरित्राचे, जीवनविषयक दृष्टीचे, कर्तृत्वाचे आणि वाङ्मयमूर्तीचे चिकित्सकपणे दर्शन घडविणारा अभ्यासकांचा लेखसंग्रह. सुमारे साडेतीनशे डेमी पृष्ठांच्या या ग्रंथाची मांडणी संपादकत्रयीने पाच भागात केली असून ती सामान्यतः शास्त्रशुद्ध व रेखीव आहे. पार्श्वभूमी ( पृष्ठे १०, २ लेख ), धर्म–तत्त्वज्ञान ( पृष्ठे ८८,८ लेख ), काव्य ( पृष्ठे ८६, ७ लेख ), समाजकारण (पृष्ठे ५०,५ लेख) सांस्कृतिक पर्यायलोचन (पृष्ठे ११०,५ लेख) असे हे पाच भाग असून शेवटी समर्थसाहित्याची संदर्भसूची, लेखसूची आणि सूची अशा अनंत जोशीकृत तीन उपयुक्त सूच्या देऊन ग्रंथसंपादणीची परिपूर्ती करण्यात आली आहे. ग्रंथास के. वि. बेलसरे यांची विचारगर्भ प्रस्तावना लाभलेली आहे. पण तिची लेखसंग्रहाशी सांधेजोड नाही हे खटकले. संपादित ग्रंथाचे हे झालं बाह्यदर्शन.

अंतरंगाचे लेख अर्थातच अधिक महत्त्वाचे आणि समाधानाची गोष्ट म्हणजे ते डोळसपणे, समर्थांवरील सर्व मतमतांतरांना मुक्तपणे वाव देऊन लिहवून घेतले आहेत. काही वेधक उदाहरणेच द्यावयाची तर सेतुमाधवराव पगडी ( चिकित्सक समर्थचरित्र हवे ), रावसाहेब कसबे ( समर्थकालीन सामाजिक प्रश्न आणि समर्थांची आधुनिक प्रतिमा ), रा. ग. जाधव (आनंदवनभुवन : एक सांस्कृतिक अन्वयार्थ ), निर्मलकुमार फडकुले (संत रामदासांची 'समर्थ' जीवनदृष्टी), श्री.भा. वर्णेकर (श्रीसमर्थांचा भक्तिपथ आणि समाज सुधारणा), अनिरुद्ध कुलकर्णी (आधुनिकता आणि समर्थांची प्रस्तुतता ), उषा देशमुख

(रामदासांच्या कवितेचे सामर्थ्य) या लेखांची देता येतील. विषयांची वाटणी करून संपादकांनी लेख लिहिण्याची कामगिरी सोपवितांना 'समर्थांच्या शिकवणुकीतील दादस्थळे आणि समर्थ आणि समकालीन इतर संतकवी-असे . एकदोन विषय लिहवून घेतले असते तर संपादणीच्या चिकित्सक भूमिकेला आणखी बाळसे चढले असते. काही लेखांतून या विषयांना स्पर्श झाला नाही असे नाही; पण अभ्यासकांना या विषयावरचे स्वतंत्र विवरणात्मक लेख देणे उपयुक्त झाले असते. फार काय समर्थचरित्रांचा आढावा घेणारा एखादा लेखही या ग्रंथात शोभून दिसला असता. ज्ञानेश्वर-रामदासादी संत चातुवर्ण्याचे पुरस्कर्ते आणि इतर अब्राह्मण संत फक्त चातुवर्ण्याचे विरोधक असा एक बुद्धिभेद सोयिस्करपणे काही पुरोगामी विचारवंतांकडून आजकाल केला जातो. तो किती निराधार आहे हे या सर्वांच्या अनेक वचनांवरून सहज दाखविता येते. कै. माटे यांनी पूर्वी एका लेखात असा यत्न केला होता.

प्रस्तुत ग्रंथात दासांच्या एकूण कवितेचे अंतरंग, वैशिष्ट्य आणि वैभव उलगडून दाखविणारे सर्वच लेख उत्कृष्ट आहेत व तो माझ्या मते या ग्रंथाचा गाभा आहे. कारण 'जे न देखे रवि ते देखे कवी' या कोटीतला समर्थ हा कवी असल्यामुळे त्याच्या काव्याचे स्वरूपदर्शन हेच त्याचे वास्तव दर्शन.

वास्तविक समर्थांवर पूर्वसूरींचे आजवर इतके विपुल ग्रंथरूपलेखन आहे की,त्यात प्रस्तुत ग्रंथातील लेखकांनी काही विशेष क्रांतिकारक भर घातली आहे असे नाही. तथापी समर्थांच्या विविध वाङ्मयीन वैचारिक पैलूंवर विविध लेखकांनी प्रकाश टाकून या ग्रंथाची वैचारिक कक्षा जी विस्तृत करून दाखविली तीत ग्रंथाचे आगळेपण आहे.एका दृष्टीने आजवरच्या समर्थांवरील ग्रंथाभ्यासकांच्या मागोव्याने हा ग्रंथ सिद्ध झाला आहे. सुलोचना खांडेकर (तुळसीदास आणि रामदास यांची रामायणे), यू. म. पठाण (रामदासांची हिंदी कविता), समर्थांची स्फुट काव्ये-यशवंत पाठक, सुहासिनी लद्दू (रामदासांची रामभक्ती मूर्तिपूजा) हे लेख अभ्यासाची वेगळी दिशा या दृष्टीने आवर्जून उल्लेखावेसे वाटतात बाकीच्यांनी दिलेली कामगिरी अर्थातच चोख बजावली आहे. भक्तिभाव आणि पाखंडी बुद्धिवाद ही दोन्ही टोके टाळून हा ग्रंथ सिद्ध झाला असल्याने सर्व स्तरांतील नवे अभ्यासक या ग्रंथापासून नवा बोध आणि प्रेरणा घेतील अशी आशा बाळगू.

— म. श्री. दीक्षित

**समर्थदर्शन** (लेखसंग्रह)
कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे
पृष्ठे : ३६२, मूल्य : ३५ रु.

## रंगभूमी

# दुर्गा झाली गौरी

## एक सुरेख बालनाट्य !

शब्दांशी खेळ करण्याचा पेशा असणाऱ्यांना शब्दांवर आपली हुकमत असल्याचा सार्थ अभिमान असतो; पण काही काही कलाकृती अशा असतात की, त्यांना शब्दात पकडणंच अशक्य असतं. शब्दांचा फुलोरा चहूबाजूंनी फुलवूनही कुठे न् कुठे तरी त्यांचं नेमकेपण शब्दांच्या फटीतून निसटून जातं. आविष्कार चंद्रशाळानिर्मित 'दुर्गा झाली गौरी' हे बालनाट्य पाहात असताना शब्दांच्या या रितेपणाची प्रकर्षानं जाणीव झाली. कारण शब्द आणि सूर यांचा विलक्षण सुंदर समन्वय असलेला 'दुर्गा झाली गौरी' हा नाट्यप्रयोग 'मंत्रमुग्ध होणे' या मराठीतील वाक्प्रचाराचा पुरेपूर अनुभव देऊन जातो.

लहान मुलांना घेऊन नाटक करणं हे तसं अवघडच काम आणि १०—१२ मुलं असली तर जरा तरी ठीक; पण या नाटकात थोडेथोडके नाहीत तर चक्क ७५ बालकलाकार आहेत. या सर्व बालकलाकारांनी विलक्षण समजदारीने काम करून अवघ्या तीन-साडेतीन महिन्यात रंगमंचावर सादर केलेला हा नाट्यप्रयोग म्हणजे छोट्यांच्या मोठ्या कामगिरीचं एक उत्तम उदाहरण आहे.

श्रीमती लीलावती भागवत यांच्या एकांकिकेवर आधारित असलेल्या या नाटकाचे लेखक आहेत माधव साखरदंडे. कथा आहे सर्वांनाच सुपरिचित असलेल्या झोप न येणाऱ्या राजकन्येची. दिवस नाही रात्र नाही. या राजकन्येला झोप कशी ती येत नसते. त्यामुळे सगळेच जण काळजीत असतात. राजकन्येला झोप यावी म्हणून तऱ्हेतऱ्हेचे उपाय चालू असतात; पण सगळे उपाय फुकट जातात. त्यामुळे राजकन्या दुर्गा चिडकी बनते. शेवटी एक दिवस राजाचं आणि दुर्गेचं भांडण होतं आणि चिडलेली दुर्गा राजवाडा सोडून निघून जाते. वादळाच्या तडाख्यात सापडलेली दुर्गा दुसऱ्या गावाला पोचते. या गावातल्या एका वृद्ध जोडप्याला किनाऱ्यावर सापडलेल्या दुर्गेत 'गौरी'चा भास होतो आणि ते तिचा सांभाळ करायला लागतात. राजवाड्याच्या बंदिस्त चौकटीतून बाहेर पडलेली दुर्गा आमूलाग्र बदलते. तिच्या सूचनेवरून गावकरी पूर येणाऱ्या नदीला बांध घालतात. गौरी त्यांना शिक्षणाचं महत्त्व पटवून देते आणि गावकऱ्यांची मुलं शिकायला लागतात. गौरीही गावकऱ्यांच्या बरोबरीनं राबराब राबते आणि इतके दिवस तिच्यावर रुसून बसलेली निशादेवी गौरीवर प्रसन्न होते. त्यामुळं गौरीलाही श्रमांचं महत्त्व कळतं. ती गावकऱ्यांची आवडती 'गौरी' तर राजाराणीची लाडकी 'दुर्गा' बनते.

दोन अंकांत सादर होणाऱ्या या नाटकात अनेक छोटी छोटी दृश्ये आहेत. या छोट्या छोट्या दृश्यांच्या साखळीतून फुलणारं नृत्यनाट्य तीन तास खुर्चीला खिळवून ठेवण्यात पूर्णपणे यशस्वी झालं आहे. त्रस्त राजकन्येला उठवण्यासाठी गाणारे, नाचणारे पक्षी, 'मला फुलांचा बिछाना हवा' म्हणून राजकन्या मागणी करताच राज्यातील सर्व फुलं राजवाड्यावर जमा करण्याचा हुकूम दिला जातो आणि फुलं भीतीनं घाबरून जातात. तेव्हा या फुलांना जोपासणाऱ्या, वाढवणाऱ्या माळणी त्यांना मातेच्या ममतेनं कुशीत घेऊन धीर देतात— हे दृश्य आणि कल्पना अतिशय सुंदर रंगली आहे. तसंच वादळात सापडलेली नाव, या नावेवर झेपावणाऱ्या लाटा, लाटेच्या आघातासरशी तिला बसणारे हेलकावे आणि शेवटी तिचे तीन दिशांना पांग-

णारे तीन तुकडे किंवा रंगमंचावर काळा-कभिन्न अंधार आणि श्रमानं थकून-भागून झोपलेल्या गौरीचं रंगीबेरंगी छत्र्यांच्या नृत्यानं रंगवलेलं स्वप्नदृश्य, पहाट फुलताना सूर्याच्या आगमनाची ललकारी घेऊन आलेले सूर्याचे दूत... अशी अनेक वेगवेगळी उल्लेखनीय दृश्यं एकमेकांतून अलगदपणे उमलत जातात आणि या दृश्यांच्या सहजसुंदर हातमिळवणीमधूनच 'दुर्गा झाली गौरी' सारखी एक कविता दिमाखात साकार होते.

या नाटकाचं नेमकं यश कुणाचं? असा प्रश्न मनात उभा राह्यला तर अभिनय, संगीत, संवाद, दिग्दर्शन, नृत्य, वेषभूषा अशी नाटकाची सारीच अंगं क्षणार्धात डोळ्यांसमोर उभी राहतात आणि त्यातल्या नेमक्या अंगावर बोट ठेवणं अशक्य आहे. कारण अमुक एक बाब चांगली आहे, असं म्हणणं म्हणजे दुसऱ्या बाबीवर नकळत का होईना, पण अन्याय होईल, इतका या सर्व बाबींचा नाटकाच्या यशात फार मोठा वाटा आहे. गुरुपार्वतीकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली दिग्दर्शक रमेश पुरव यांच्या दिग्दर्शनातील चमक या नाटकात ठायीठायी जाणवते; तर या नाटकातील अनेक छोट्या-मोठ्या भूमिकांमध्ये सगळ्याच कलाकारांनी अतिशय सहजता दाखवली आहे. त्यांच्या अभिनयातील समज जितकी वाखाणण्याजोगी आहे, तितकीच त्यांच्या नृत्यातील समजही. कारण या नाटकातील कुठलंही पात्र रंगमंचावर प्रवेश करतं तेच मुळी लयदार पदन्यासातून! राजकन्या दुर्गा ही या नाटकाची नायिका आणि या भूमिकेत रंगमंचावर वावरणाऱ्या संध्या पुरेचा हिने या संधीचा पुरेपूर उपयोग करून घेतला आहे. आधीची तापट दुर्गा आणि नंतरची मनमिळाऊ,हसरी गौरी ही राजकन्येत होत गेलेली स्थित्यंतरे तिने प्रभावीपणे दाखवली. डोळ्यांचा अतिशय वेधकपणे केलेला वापर, चेहऱ्यावरचे सहजी बदलणारे भाव आणि मोहक, लयदार नृत्याच्या हालचाली हीच तिची मुख्य वैशिष्ट्ये! विदूषकाच्या छोट्याशा पण मिष्किल भूमिकेतली निशिगंधा वाड ही चांगलीच लक्षात रहाते.

हे नाटक म्हणजे शब्द, सूर, ताल, अभिनय यांचा मनोहर संगम आहे. साध्या सरळ शब्दांत गुंफलेलं आणि तरीही मनाला भिडणारं काव्य—त्याला शांक नील यांनी प्रसंगानुरूप अचूक बदलत जाणाऱ्या सुरावटीची जोड... आणि या गीतांना लाभलेले अनुराधा पौडवाल, चारुशीला बेलसरे, रवींद्र साठे, शाहीर साबळे, निला भिडे यांचे मधुर आवाज... हळुवार सुरांची साथ घेऊन येणारं अंगाईगीत, कोळी—कोळिणीचं बेभान कोळीगीत, उत्साहात रंगलेलं गावकऱ्यांचं समूहगीत... असं शांक नील यांचं संगीत योग्य ती वातावरणनिर्मिती करतं. अर्थात वातावरणनिर्मितीमध्ये रघुवीर कुल आणि प्रदीप मुळे यांच्या वेषभूषेचाही फार मोठा वाटा आहे. रंगांच्या विविध कॉम्बिनेशन्समधून त्यांनी साधलेली रंगसंगती शब्द, सूर, ताल यांना समर्पकपणे साथ देणारीच आहे. 'आपण आपला पोसतात जीव, आळशाची करतो न मुळी कीव' असं ठणकावून सांगणाऱ्या धिटुकल्या चिमण्या, फुलाफुलांतून गोळा करतो मधुर उद्याची आशा' असा संदेश देणाऱ्या मधमाशा, 'राब राब राबतो' म्हणणाऱ्या मुंग्या, बावरलेली फुलं, त्यांना सावरणाऱ्या माळणी, पहारेकरी, राजा, राणी, विदूषक, गावकरी, गौळणी... अशी अनेक पात्रं नाटकात हजेरी लावून जातात आणि या सगळ्या पात्रांची वेषभूषा अतिशय कल्पकतेनं योजण्यात आल्याचे जाणवते. चंदर होनावार यांची प्रकाशयोजना आणि आशिष दीक्षित यांचं ध्वनिमुद्रण यांचा उल्लेख न करणं हे त्यांच्यावर अन्याय करणारं होईल. एकूण काय रंगमंचावरच्या छोट्या आणि रंगमंचामागच्या मोठ्या कलाकारांच्या सांघिक प्रयत्नातून साकार झालेला 'दुर्गा झाली गौरी' हा नाट्यप्रयोग म्हणजे मूर्तिमंत काव्याचा सुखद आविष्कारच आहे.

— शुभदा रानडे

## तेंडूलकर आणि नाटकं

मोकळी चर्चा म्हटलं की येणारा खूप उत्सुकतेने येतो. अर्थातच येणारे बरेचजण प्रश्न घेऊन आलेले असतात. किंबहुना येताना चर्चाही त्याच माणसावर सुरू असते. प्रत्यक्ष चर्चेला सुरुवात होते तेव्हा मात्र सभागृह एकदम शांत होते. 'प्रथम मी मला काय वाटतं ते थोडक्यात सांगतो आणि मग आपल्याला काय विचारायचंय ते विचारा' असे सांगून चर्चाप्रमुख बसून राहतो. सर्वजण आजूबाजूला मागे–पुढे–शेजारी एकमेकांकडे बघायला लागतात. काही क्षणात वाटते कुणालाच काही प्रश्न नाहीत. तशी संकोची माणसं आम्ही! मग एकजण उठतो काही तरी प्रश्न विचारतो आणि सगळ्याच जणांना प्रेरणा मिळते. प्रश्नात प्रश्न, आपल्यातच कुजबूज सुरू होते.

दि. २४ ला विजय तेंडुलकरांशी पुण्यात मोकळी चर्चा होती. काय कुणास ठाऊक अजूनही तेंडुलकर म्हटले की, 'घाशीराम कोतवाल' हे समीकरण प्रेक्षकांतून दूर झालेलं नाही. जशी तेंडुलकरांनी नंतर नाटकंच लिहिली नाहीत! अर्थात त्यांनाही ते अभिप्रेत होतं. 'घाशिराम' मध्ये सर्वचजण नाचतात. इतिहासात तसे नाही. मग या नाटकात सर्वच पात्रांना एका विशिष्ट तालात नाचायला लावण्यात तेंडुलकराचा हेतू कोणता? हा जाणून घेण्याचा एक भाग. तेंडुलकरांच्या मते 'घाशीराम' हे वेगळा आकार असणारे नाटक आहे. ज्या नाटकात सर्वच पात्रे नाचतात त्या नाटकात नानाही नाचतात! हा रचनेचा एक भाग. माणूस म्हणून एखादी व्यक्ती कशी आहे, इतिहासात ती कशी होती आणि नाटककाराला ती कशी भावली यातून नाना फडणिसांना उभं करताना तेंडुलकर म्हणतात — 'मी इतिहासाला बाजूला ठेवलं, मागं ठेवलं. इतिहास बाजूला आहेच. घाशीराम कोतवाल हा समाजाचा प्रतिनिधी आहे. तेवढेच त्याला महत्त्व आहे. त्यामुळे नाटक अनैतिहासिक आहे. नाटकात इतिहास शोधणं चूक आहे. नाटककार हा इतिहासकार नाही, इतिहास सादर करणं हे त्याचं काम नाही. अपघातानं मला नानांच्या जीवनातला तो प्रसंग सापडला आणि तो मी वापरला. 'घाशीराम कोतवाल' मधून सामाजिक आशय व्यक्त करायचा होता. शिवाय नाटकाच्याफॉर्मचा इतिहासाशी असणारा संबंध तुटायला पाहिजे!'

केवळ प्रेरणा घेण्यापुरताच इतिहास वापरला, आणि अनैतिहासिकच नाटक लिहायचं होतं तर पात्रांची नावं तरी ऐतिहासिक

का वापरावी ? त्यामुळं या नाटकाचा जो परिणाम झाला त्यातून फडणिसांचं हनन झालं नाही काय ? नव्या form च्या नादात फडणिसांवर कुठं तरी अन्याय तर झाला नाही ? अशा शंका. तेंडुलकरांच्या मते – " ' गिधाडे ' हेही तसे ऐतिहासिकच नाटक आहे; पण अनुभव जो आला, त्या अनुभवात जी माणसे आली त्याचं रूपांतर नाटकातल्या माणसात झालं. उदाहरणार्थ ' गिधाडे ' तला रमाकांत प्रत्यक्ष पुढे आला. नाव बदलले तर ते जास्तच चमत्कारिक वाटू लागले. त्या वेळी ती गोष्ट का करावीशी वाटते हे सांगता येत नाही. नाना फडणिसात अप्रतिम गुण होते. तसे दोषही होते; पण ताकदीचे मुत्सद्दी फक्त नानाच होते असे नाही. मला जिवंत माणसांची खंत वाटते. मेलेल्या माणसाबद्दल खंत वाटत नाही. नाटकाचा form म्हणून जब्बारनी तो पुढे आणला आणि चंदावरकरांनी जी लय दिली त्यामुळे नाटकाला वेगळी रंगत आली. मात्र संगीताचा भाग जर थोडा कमी झाला असता तर नाटक म्हणून थोडं अधिक वेगळं झालं असतं. "

प्रारंभीच्या नाटकात व आत्ताच्या नाटकात बदल झालेला दिसतो का? नाटक रंगभूमीवर सादर होणार आहे याची जाणीव आता जास्त दिसते का ? त्यानुसार नाटक लिहिले जाते का ? आज नाटकाच्या संहिता एवढ्या वाचनीय का वाटत नाहीत ? तर त्यांना वाटते – ' ज्या काळात नाटकाच्या संहिता वाचनीय होत्या त्या काळाशी मी संबंधित नाही; पण त्या वेळीही अशी नाटके होती. रंगभूमीवर खेळण्याचं नाटक किंवा रंगभूमीवर करण्याचं नाटक ही पूर्वीपासूनचीच नाटकांची जात आहे. त्यामुळे जे बोलायचे ते लिहिले पाहिजे. तांत्रिक अंग बघायला हवं. नाटक हा खेळण्याचा, प्रेक्षकांनी बघण्याचा प्रकार आहे. एखादवेळी संहिता दुबळी असेल तर ते नाटक दिग्दर्शक समर्थपणे उभे करू शकतो. नाटक हे संवादाबाहेर असते. संवादाबाहेर नाटकाला नेणं हे दिग्दर्शकाचे कसब. संहिता वाचतो तेव्हा आपण काय करतो तर संवाद वाचतो. कंसातल्या शब्दांतून दृश्य उभे करतो. संवादाव्यतिरिक्तचा भाग हा दिग्दर्शकाचा असतो. दिग्दर्शक गाळलेल्या जागा भरतो. दिग्दर्शक कंसाबाहेर जातो; पण काही वेळा नाटकाच्या बाबतीत असं घडतं, जे लिहिलंय त्याबाहेर नाटककार जाऊ शकत नाही.

तेव्हा नाटकाचा प्राण, चैतन्य हे ते नाटक खेळले जाण्यात आहे. नाटकाचं पुस्तक वाचणं हे महत्त्वाचं नाही. साहित्याबाहेर जाऊन काही तरी करण्याचं काम घाशीराम कोतवालन केलं.

आता नाटकात काम करणाऱ्या व्यक्तींना आपण पात्रं म्हणतो किंवा त्यांना व्यक्तिरेखा म्हटलं जातं; पण नाटकातली माणसं ही माणसंच असतात. ही माणसं त्याचं मानसशास्त्र घेऊनच येतात. ही जेव्हा माणसं म्हणून नाटकात राहतात, तेव्हा ती खरी जिवंत राहतात. कथानकाच्या ओघानं जेव्हा नाटककार ह्या माणसांकडे पाहतो तेव्हा ती बाहुलं बनतात. "

प्रत्येक वेळी प्रेक्षकाला वाटते की, नाटककार हा दिग्दर्शकानं सुचवलेला बदल मान्य करतो का ? संहिता सुधारतो का ? नाट्यनिरीक्षक मंडळानं सुचविलेले फेरफार करून लिहितो का ? प्रेक्षकांच्या वतीनं भांडणाऱ्या ज्या संघटना असतात त्यांचं काय ? शब्दांना नाटकात महत्त्व किती द्यावे ? सर्वांत शेवटी म्हणजे प्रेक्षक कसा वाटतो ?

यावर तेंडुलकर म्हणतात– " दिग्दर्शकाचं आणि नाटककाराचं एक नातं असतं. हे नातं जर परपस्परांनी समजून घेतलं तर खूप चांगलं घडू शकतं. अनेक वेळा दिग्दर्शकच नाही तर आजूबाजूला काम करणाऱ्यांपैकीही काही चांगले आणि वैशिष्ट्यपूर्ण बदल सुचवतात. ते इतरांच्या डोक्यात आलेले नसतात. आता वाइटाच्या सोडून चांगल्याच्या मार्गे लागणारी ही सेन्सॉरशिप असते. ही प्रेक्षकांची सेन्सॉरशिप नसते. प्रेक्षकांना नाटक पहायचे असते. नाटक पाहणारे, शेवटपर्यंत पाहणारे प्रेक्षक हवे असतात. त्यामुळे पोलीस ठेवून नाटक करणे हे योग्य नाही. ' घाशीराम कोतवाल ' मध्ये तडजोड केली आहे. मी प्रत्यक्ष तालमींना उपस्थित राहतो. तसंच ' सखाराम बाइंडर ' हे माझं आहे त्यापेक्षा अधिक कमलाकर सारंगाचे आहे. इतरत्र तडजोड मला मान्य नाही. शेवटचा विचार म्हणजे शब्दांचा. तर शब्दब्रह्म होणार नाही एवढं शब्दांना महत्त्व असावं. शब्दाला नाटकात महत्त्व आहे. मात्र तिथे नेमकेपणा असावा. गोष्ट पसरायला लागली की, शब्दांचे महत्त्व कमी होते.

मराठी प्रेक्षकाला चांगला–वाईट असं लेबल लावणं चुकीचं आहे. सर्व ठिकाणचा प्रेक्षक हा सारखाच. प्रेक्षकांत फरक करता येत नाही.

आज तेंडुलकर हे व्यक्तिमत्त्व पटकथाकार म्हणूनही आपल्यापुढे आहे; पण नाटककार तेंडुलकर आणि पटकथाकार तेंडुलकर यात तेंडुलकरांना काही कॉनफ्लिक्ट जाणवत असावा का ? पण तेंडुलकराना तो जाणवत नाही. मात्र नाटककार होणे ते स्वीकारतात. जे दाखवू ते किती खरं वाटतं ह्या निकषावरच त्या त्या कलाकृतीपुरतं पहावं असं तेंडुलकराना वाटतं.

–सौ. रेणू दांडेकर


मांडणी, विचार व देखणेपणा या साऱ्यातच ' उत्तम ' असे म्हणता येईल असे हे पुस्तक आहे.

–प्र. भा. भोसले
संपादक, बळीराजा मासिक

# योद्धा शेतकरी

ले. विजय परुळकर

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

मूल्य : ३६ रुपये

# इम्रान-मूर्तिमंत भीति उभी....!

## द्वारकानाथ संझगिरी

" No body likes fast bowling, No body likes being hurt Some batsmen play it better than others but nobody likes it. "

हे हरबर्ट सट्क्लिफचे बोल आहेत. हा कुणी डरपोक फलंदाज नव्हता. दुसऱ्या महायुद्धापूर्वी तो इंग्लंडच्या डावाची 'भोवानी' करायला जायचा. सर जॅक हॉब्जबरोबरची त्याची साथ त्या काळात प्रचंड गाजली. कसोटी-क्रिकेटमध्ये फलंदाजीत साठच्या वर सरासरी असणारा तो एकमेव इंग्लिश फलंदाज आहे. मुख्य म्हणजे वेगवान गोलंदाजीच तो जास्त चांगला खेळायचा. बिल ओरायलीचे लेगस्पिनर्स त्याला 'कथ्थक' नाचवायचे.

पण तरीही फलंदाजीचं एक कटू सत्य त्यानं जगापुढं मांडलं.

आज इम्रानखानच्या गोलंदाजीपुढं प्रथितयश वगैरे समजल्या, गेलेल्या भारतीय फलंदाजांची होणारी पळापळ पाहिली की हरबर्ट सट्क्लिफचे हे बोल मनाभोवती वारंवार फेर धरून नाचायला लागतात.

इम्रानला खेळणं, आपल्या फलंदाजांना मनापासून आवडत नाही हे टीव्हीवर त्यांच्या भेदरलेल्या चेहऱ्याकडे पाहिलं तरी लक्षात येतं. 'मूर्तिमंत भीति उभी राहिली' म्हणजे काय ह्याचा प्रत्यय येतो. प्रत्यक्ष खेळणारे जाऊ देत, त्यांच्या पाठिराख्यांना तरी इम्रानला पहाणं कुठे परवडतं ? इम्रानने स्टार्ट घेतला की, हातावरचे केस उभे रहायला लागतात, प्रत्येक चेंडूला छातीतली धडधड वाढत असते. इम्रानचं षट्क संपेपर्यंत त्यांनी देव पाण्यात घातलेले असतात. मग त्याला समोरा जाणारा खुद्द सुनील गावस्कर का असेना !

क्रिकेट हा एक सांघिक खेळ आहे वगैरे म्हटलं जातं... म्हटलं जातं कशाला ते निःसंशयपणे खरे आहेच... 'जोर लगाके हय्या' म्हणत केवळ खेचणाऱ्या मजुराप्रमाणे सर्वांनी जोर लावला की यश मिळवण्याचं कार्य सिद्धीस जाते; पण आज पाकिस्तानला ते कार्य सिद्धीस नेण्यास एकटा इम्रान समर्थ ठरतोय... पाकिस्तानी संघात इम्रानखान नसता तर भारताने यश जरी मिळवलं नसतं तरी हे जिव्हारी लागणारे अपमानास्पद पराभवही झाले नसते! हा एकटा इम्रान आम्हाला आजची जंबरदस्त वगैरे वाटणारी फलंदाजी वारंवार एका प्रलयकारी स्पेलमधे उद्ध्वस्त करून टाकतो.

एखाद्या गोलंदाजाने प्रतिपक्षाची एव्हढी गाळण उडवताच इम्रानखान हे पहिलं उदाहरण नाही. कोवळ्या ट्रुमनने एकट्याने १९५२ साली भारतीय संघाची हवा तंग केली होती. हजारे, विनू मंकड, मांजरेकर, उम्रीगरसारखे आज आम्हास वंद्य वाटणारे फलंदाज त्या वेळी भारतीय संघात असूनही ! १९५३ साली सरलेन हटनने फ्रँक टायमनच्या हातात चेंडू द्यायची खोटी, ऑस्ट्रेलियन ड्रेसिंगरूमला सुतकी कळा यायची. येसू खिस्ताचा धावा सुरू व्हायचा...

तर असं घडलंय... वारंवार नसेल; पण अधूनमधून !

पण एक गोष्ट मात्र निश्चित, इम्रान भारतीय फलंदाजाचं जिणं एवढं हराम करेल असं मात्र वाटलं नव्हतं. भारतीय फलंदाजी आणि द्रुतगती गोलंदाजी ह्यांचं पूर्वी फार मोठं हाडवैर असलं तरीही गेल्या सहा-सात वर्षांत द्रुतगतीचा भयगंड आपल्या फलंदजांच्या मनातून दूर झालाय असं वाटत होतं. द्रुतगती गोलंदाज सामोरा आला की, फेफरं यावं अशी परिस्थिती नव्हती. नाही म्हटलं तरी गेली काही वर्षे विविध प्रकृतीच्या खेळपट्ट्यावर जगातल्या नामवंत वेगवान गोलंदाजांना आपल्या फलंदाजांनी सातत्यानं तोंड दिलं होतं. परफॉर्मन्समधेही प्रगती होती. १९७६ साली वेस्टइंडीजमधे रॉबर्टस्, होल्डिंग, डॅनियल शरीराचा वेध घेणारा मारा करत असतानाही त्याच्यापुढे आपण नाक घासलं नव्हतं. शरीरावर घाव झेलले गेले; पण पाय हटले नव्हते... अगदी सहा महिन्यापूर्वी संदीप-कपिल-वेंगसरकर वगैरे मंडळींनी इंग्लंडमधे साक्षात विलिस-बॉथम विरुद्ध अशी चाबकासारखी बॅट फिरवली होती की आजही फटक्यांचे व्रण त्या चेंडूवर दिसतील! आणि लक्षात घ्या, बॉब विलिस त्या मालिकेत अत्यंत भेदक वेगवान मारा करत होता. खुद्द दिलीप वेंगसरकरने हा स्वानुभव माझ्याजवळ कथन केला होता. त्यामुळे इम्रानखान एवढा आपला छळवाद मांडेल असं वाटलं नव्हतं.

बरं, इम्रानखान काही प्रथमच आपल्या समोर पेश होत नव्हता. १९७७ साली इम्रानच्या गोलंदाजीचा अनुभव आपण घेतला होता. त्या वेळीही तो यशस्वी झाला होता; पण ते यश असं जरब बसवणारं नव्हतं. १९८० साली भारतात तर पाठदुखीमुळे त्रस्त झालेला इम्रान फारसा भेदक कधीच वाटला नाही. ह्या वर्षी इम्रानने इंग्लंड गाजवलं; पण तरीही त्याच्या गोलंदाजीनं एवढं स्वरूप बदललंय... ह्याचं रिपोर्टिंग झालेलं नाही आणि दुसरी गोष्ट अशी की, इंग्लंडचं वातावरण, तिथल्या खेळपट्ट्या आणि पाकिस्तानचं वातावरण ह्यात फार मोठा फरक आहे. वेगवान गोलंदाजांना इंग्लंड नेहमीच माहेरासारखं वाटलंय. भारत-पाकिस्तानात खेळणं हा त्यांच्या दृष्टीनं 'सासुरवास' असतो. लिली-थॉमसनसारख्या महाभागांना भुईसपाट करण्याची किमया पाकिस्तानी खेळपट्ट्यांनी दाखवली आहे.

ही मालिका सुरू होण्याअगोदर जेव्हा एका मुलाखतीत इम्रानखान म्हणाला, 'आम्ही ६-० मालिका जिंकू!' तेव्हा अनेकांनी दात

विचकले! खोटं कशाला बोलावं, मलाही ती फार मोठी वल्गना वाटली. इम्रानच्या सामर्थ्याविषयी शंका होती म्हणून नव्हे; पण भारतीय फलंदाजी पूर्वीसारखी लेचीपेची नाही, असा विश्वास वाटत होता.

पहिल्या कसोटी सामन्यात इम्रानचा तेव्हढा दणका जाणवला नाही. त्या सामन्यात संदीप पाटीलने जलालउद्दीनच्या गोलंदाजीवर क्रूर हल्ला चढवल्यावर आमचा एक शिवाजीपार्कीय संदीपभक्त वदला होता ... 'बघितलंस संदीप पाकिस्तानी बॉलर्सची पिसं काढत असताना, इम्रानचीसुद्धा बॉलिंग टाकायची छाती झाली नाही ... अरे, ज्याने लिली–पास्को, विलिस–बॉथमला बॉलिंग विसरायला लावली तो इम्रानला सुखासुखी सोडेल काय ?'

दुसरा कसोटी सामना संपला आणि त्या दिवसापासून आजपर्यंत ते सन्मित्र पुन्हा काही दिसले नाहीत. इम्रानची पिसं काही निघाली नाहीत ... पण आपल्या फलंदाजांचे तुरे मात्र गळून पडले. त्या कसोटी सामन्यापासून जो इम्रान दिसला तो पूर्ण वेगळा होता. आजपर्यंत आपण कधीही न पाहिलेला असा इम्रान होता ... पूर्वीचे गुण त्याला बिलगून होतेच; पण काही दुर्गुण जाऊन. नवे गुण त्याला चिकटलेत ह्याचा पदोपदी भास झाला. पूर्वीचा इम्रान सुसाट वेगासाठी प्रसिद्ध होता. चार वर्षांपूर्वी जेव्हा ऑस्ट्रेलियात जगातल्या नामवंत गोलंदाजांच्या वेगाचं मोजमाप झालं, तेव्हा त्याचा चेंडू ताशी ८६.७७ मैलाच्या वेगानं फलंदाजाकडं झेपावतो असं सिद्ध झालं होतं. ... फक्त थॉमसन आणि होल्डिंगनं वेगाच्या बाबतीत इम्रानवर मात केली होती ...पण चेंडूला भन्नाट वेग असला तरी दिशा, टप्पा ह्यावर 'वचक' नव्हता. त्यामुळं त्याचा चेंडू कुठेही 'वहकायचा !' त्या वेळी त्याच्याकडे इनस्विंगही होता; पण आजच्यासारखं वाकडं वळण घेणारा नव्हता. तो इनस्विंग ही त्याच्या ॲक्शनची देणगी होती. त्याचा स्टार्ट थोडासा तिरका आहे आणि गोलंदाजी टाकताना तो बऱ्याचदा फलंदाजाकडे खांद्याऐवजी छातीचा भाग पुढे करत (open chested Delivery) टाकतो. त्यामुळे नैसर्गिकरीत्या इनस्विंग टाकणं जमायचं; पण ह्या ॲक्शनमुळे आउटस्विंग त्याच्यावर रुष्ट होता. त्या वेळी त्याचं प्रमुख अस्त्र एकच होतं ... आखूड टप्प्याचा इनस्विंग टाकून चेंडू फलंदाजाच्या छाताडापर्यंत उसळवून त्याला मागे खेळून भाग पाडायचं ... त्यामुळं पायचीतची संधी वाढते. बॅट-पॅडमध्ये अंतर राहिलं तर चेंडू पटकन आत घुसू शकतो आणि उडणारा चेंडू मनगटाद्वारा खाली ठेवणं फलंदाजाला जमलं नाही तर शॉर्टलेगवरचा क्षेत्ररक्षक फलंदाजाला गिळू शकतो ...

आजच्या इम्रानकडे काय आहे? आउटस्विंगवर त्याने कब्जा केलाय ... किंचितशी ॲक्शन बदलून त्याने तो मिळवला असावा. इनस्विंग जास्त खतरनाक झालाय ... चेंडूचा टप्पा आणि दिशेवर हुकमत आलीय आणि हे सर्व करताना वेगाशीही कुठे 'कॉम्प्रमाईज' नाही. ... आणि ह्या सर्व गोष्टीइतकंच महत्त्वाचं म्हणजे चेंडूची लकाकी कमी झाल्यावरही तो चेंडू ऑफब्रेकसारखा कट् करतो. हे प्रकरण इतकं भयंकर आहे की, त्याच्या पहिल्या स्पेलपेक्षा त्याचे पुढचे स्पेलसुद्धा जास्त भयानक वाटतात. तो कराचीचा स्पेल जरा आठवा ! विशेषतः गावस्कर आणि विश्वनाथला पडलेला चेंडू... गावस्कर हा कधीही बॅट आणि पॅडमध्ये एक मिलिमीटरसुद्धा फट सोडत नाही. ते त्याच्या अंगवळणीच पडलंय; पण त्या दिवशी इम्रानचा चेंडू धडधडत बॅट आणि पॅडच्यामधून घुसला आणि दाणकन यष्टीवर जाऊन आदळला ! ... का ? उत्तर स्पष्ट आहे. चेंडू इतका वेगात आला आणि इतकं अनपेक्षित वळण त्यानं घेतलं की, उगारलेली बॅट पूर्णपणे पॅडशी बिलगण्याएवढाही वेळ सुनील गावस्करसारख्या फलंदाजाला मिळाला नाही ... तसाच तो विश्वनाथला पडलेला भीषण चेंडू ! होय कबूल, विश्वनाथ 'म्हातारा' झालाय, त्याचे पाय हलत नाहीत ... वगैरे वगैरे ! पण ऐंशीच्या वर कसोटी सामने खेळलेल्या माणसाची जज्मेंट तर एव्हढी चुकत नाहीत ... त्याने चक्क चेंडू सोडला ... एव्हढा चेंडू भसकन आत येईल अशी त्याला पुसटशी शंकासुद्धा आली नाही. हे सर्व अजब होतं आणि हा अजबपणा त्यानं पुढल्या दोन कसोटीतही दाखवला ...

ह्या अजबपणाकडे विज्ञानाच्या चष्म्यातून पाहिलं तर गोंधळात अधिकच भर पडते. चेंडू स्विंग का होतो हे एरोडायनॅमिक्स (Arodynamics) च्या आधाराने शास्त्रज्ञांनी सांगितलंय ... फारसं खोलात न शिरता चेंडू जास्त स्विंग होतो ह्याची थोडीफार चर्चा करायला हरकत नाही. चेंडूवर लकाकी असली, हवामान ढगाळ असलं किंवा विशिष्ट दिशेनं वारा वाहात असला तर चेंडू स्विंग व्हायला मदत होते ... इम्रानने जेव्हा जेव्हा विध्वंस करणारे स्पेल टाकले आहेत, त्या वेळी चेंडूला फारशी लकाकी नव्हती ... किंवा हवामान ढगाळही नव्हतं ... वाऱ्याचा मात्र त्याने चांगला उपयोग करून घेतला ... पण पुन्हा चेंडू स्विंग होण्यावर वेगाचीही मर्यादा आहेच. एका विशिष्ट प्रमाणाबाहेर जर चेंडूला वेग असेल तर चेंडू फारसा स्विंग होत नाही ... म्हणूनच जे झंझावाती वेगाने चेंडू फेकतात त्यांना स्विंगचं फारसं साहाय्य लाभत नाही. इम्रानचा चेंडू झंझावात शब्द योग्य ठरावा एव्हढ्या वेगात येतो आणि स्विंगही चांगला होतो ... आणि तोही इंग्लिश चेंडू, जो फारसा स्विंग होत नाही असं म्हटलं जातं ...

आता दुसरं वैशिष्ट्य पहा ! इम्रान विकेटवरून चेंडू कट्... ... करतो ... अक्षरशः एखाद्या ऑफब्रेकसारखा ... पुन्हा विज्ञान सांगतं की, चेंडू वळायचा असेल तर जमिनीचा आणि चेंडूचा कॉन्टॅक्ट दीर्घ हवा ... फिरकी गोलंदाज चेंडू जास्त वळवतात. कारण चेंडू हळुवार पडत असल्यामुळं हा कॉन्टॅक्ट जास्त वेळ असतो ... पण इम्रान भयंकर वेगात चेंडू फेकत असूनही एखाद्या फिरकी गोलंदाजाच्याही थोबाडीत मारेल असा चेंडू हातभर फिरवतो ... कराचीच्या स्पेलनंतर मी काही माजी कसोटीपटू आणि ज्ञानी परीक्षकाशी ह्या प्रश्नाची चर्चा केली; पण कुणीही समाधानकारक उत्तर देऊ शकलं नाही.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे इम्रान हा चमत्कार चक्क पाकि-

**इम्रान विकेटवरून चेंडू कट्ही प्रचंड करतो....अक्षरशः ऑफब्रेकसारखा !**

स्तानी खेळपट्टयांवर घडवतोय. पाकिस्तानी खेळपट्टयांनी थोडंफार रंगरूप बदललं असलं तरी त्या अजूनही फलंदाज-धार्जिण्याच आहेत. खरोखर इम्रानला ' वशिकरणाची ' अघोरी कला तर अवगत नाही ना ?

पहा ना, आमचा कपिल गोलंदाजी टाकतो तेव्हा विकेट अगदी मुडद्यासारखी थंड असते. अजिबात धुगधुगी नाही. इम्रान आला की, विकेटमध्ये अचानक जान येते. त्याच्या चेंडूचा विकेटला स्पर्श झाला की, चेंडू पटकन दिशा बदलतो, छाताडापर्यंत उडायला लागतो !

तसा तो वारा ! आमचा कपिल गोलंदाजी टाकतो तेव्हा ज्या वाऱ्याला आम्ही युगनयुग देव मानलं तो वाहात असला तरी कपिलच्या मदतीला येत नाही आणि इम्राननं नुसता चेंडू सोडायचा अवकाश त्याचा चेंडू हवेत असा काही भिरभिरतो की आमच्या फलंदाजाचं ' लेझीम ' सुरू होतं !

कपिलदेव–इम्रान एकदा खेळायला लागले की त्याची तुलना होणं अपरिहार्यच आहे. १९८० साली भारतात कपिलने गोलंदाजीच्या क्षेत्रात इम्रानवर कुरघोडी केली होती. असिफ इक्बालने त्या वेळी तशी कबुली दिली होती; पण आज दोन वर्षांत चित्र अचानक बदलून गेलं. इम्राननं त्याला नुसतं ' ओव्हरटेक ' केलं नाही तर तो कुठच्या कुठं निघून गेला, हे निदान ह्या मालिकेत तरी प्रकर्षानं जाणवलं. हे सत्य पचवायला जड असेल; पण ते नाकबूल करण्यात अर्थ नाही. आमच्या कपिलकडे इम्रानचा सुसाट वेग कधीच नव्हता; पण फलंदाजाच्या दृष्टीने कठीण समजला जाणारा आउटस्विंगर त्याच्याकडे होता... इनस्विंग भला मोठा नसेल; पण इनस्विंगचा गळ टाकून ऑनला क्लिक करणारे फलंदाज फसवण्याची कुवत त्याच्याकडे होती. पुन्हा टप्पा–दिशा ह्याचं वरदान होतचं; पण पहिल्या चार कसोटीत त्याचा आउटस्विंग ' रजे'वर गेला होता. तो पुन्हा परतला तेव्हा मालिकेचा निर्णय लागून गेला होता... दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे इम्रानचा चेंडू ज्या जलदगतीने विकेटवरून येतो तेवढा कपिलचा येत नाही. त्यामुळे इम्रानप्रमाणे आखूड टप्प्याचा चेंडू टाकणं त्याला परवडत नाही. कपिलसारखा मध्यमगती फार तर मध्यम द्रुतगती म्हणा ( Mediam Fast ) गोलंदाज जो वेगापेक्षा स्विंगवर जास्त भरवसा ठेवतो, त्याला चेंडूचा टप्पा जास्त खोलवर टाकणं जास्त फलदायी ठरत असतं. कारण त्यामुळं चेंडू उशीरा स्विंग ( Late swing ) व्हायला मदत होते; आणि चेंडू उशीरा स्विंग होणे हे फलंदाजाच्या दृष्टीनं त्रासदायक असतं .. ड्राइव्ह मारण्याच्या फंदात पडलेला फलंदाज स्लिपमध्ये टिपला जाऊ शकतो; पण त्या वेळी कपिलकडे तो त्याचा आउटस्विंगर नसल्यामुळं पाकिस्तानी फलंदाज त्याला फ्रंटफूटवर आरामात ड्राइव्ज् मारत होते... ( पाचव्या कसोटीत त्याला तो गवसला आणि स्क्वेअर ड्राइव्ह मारायला चटावलेला झहिर अब्बास कसा फसला हे आपण टीव्हीवर पाहिलंच ! )

त्याउलट इम्रानकडे सर्वच बाबतीत आबादी आबाद असल्यामुळं तो फार सुंदर डावपेच खेळतो. एक तर इतर गोलंदाजांचं सहाय्य असल्यामुळं एका स्पेलमध्ये पाच ते सहापेक्षा जास्त षटकं टाकणं तो टाळतो. त्यामुळं दमछाक होण्याचा प्रश्न नाही. त्या छोटया स्पेलमध्ये तो सपूर्ण शक्ती पणाला लावतो... दुसरं म्हणजे वेगाचं वरदान असल्यामुळं तो थोडया आखूड टप्प्याच्या ( just short of good length ) चेंडूचा माराच जास्त करतो. खोलवर टप्पा टाकून फलंदाजाला ड्राइव्ह करण्याची संधी तो देत नाही. ( कुठल्याही ऱ्याखुऱ्या वेगवान गोलंदाजाला फलंदाजाने फ्रंटफूट-ड्राइव्ह मारणं अपमानास्पद वाटतं. ) चेंडू आखूड टप्प्याचा पडला की, फलंदाजाला बॅकफूटवर जाणं भाग पडतं आणि मग प्रॉब्लेमस् सुरू होतात .. ह्या मालिकेत त्याने भारतीय फलंदाजांना बॅकफूटवर पाठवताना, दोन फूट वळणाऱ्या इनकटर्सचाही प्रसाद दिला... अशा चेंडूला व्यवस्थित भिडण्यासाठी चेंडूच्या सरळ रेषेत यावं लागतं ! ' खोटं कधी बोलू नये ' ' लाच कधी खाऊ नये ' वगैरे जसं शाळेत गुरुजी शिकवत असतात, तसंच क्रिकेटच्या पाठशाळेत प्रत्येक कोच त्याच्या शागीर्दाला ' चेंडूच्या सरळ रेषेत येऊन खेळ ' हे कानीकपाळी ओरडून सांगत असतो; पण शाळेत शिकवून जसं खोटं न बोलणे, लाच न खाणं अनेकांना जमत नाही, तसं चेंडूच्या सरळ रेषेत येऊन खेळणंही अनेक फलंदाजांना नाही जमत ! त्यासाठी एक तर गट्स लागतात. दुसरं म्हणजे विद्युतवेगानं हालचाली व्हाव्या लागतात आणि प्रसंगानुरूप बॅकलिफ्ट कमी करावी लागते. आपल्याकडे हे गुण फक्त गावस्कर आणि मोहिंदरकडे आढळले. इतरांच्या हालचाली पायात बेडया अडकवल्याप्रमाणे होत्या. त्यामुळं चेंडूची गाठ बॅटशी पडण्याऐवजी पॅड किंवा सरळ स्टंपशी पडायची...!

मोहिंदर अमरनाथने तर थोडा वेगळा मार्ग चोखाळला. बऱ्याच वेळा इम्रानच्या थोडया-फार आखूड टप्प्याच्या चेंडूला तो सरळ फ्रंटफूटवर खेळायचा. अतिशय वेगवान खेळपट्टीवर त्याला ते जमलं नसतं. कारण चेंडू अनपेक्षितपणे उसळून थोबाड रंगवलं जाऊ शकतं; पण पाकिस्तानी खेळपट्टयावर ते शक्य होतं. फ्रंटफूटवर बचावात्मक खेळताना चेंडू न्याहाळायला वेळ कमी मिळाला तरी बॅट झटकन् पॅडच्या जवळ येऊ शकते आणि फ्रंटफूटवर खेळल्यामुळे पायचीतचा धोका कमी होतो. ( अर्थात बिचाऱ्या मोहिंदरला दोनदा तरी फ्रंटफूटवर सरळ 'ढापण्यात ' आलं.) मोहिंदरचा मार्ग इतराना अवलंबणं जमलं असतं तर कदाचित् त्यानाही इम्रान ' अनप्लेयेबल ' वगैरे वाटला नसता..

इम्रानपुढं बचाव करणं कठीण होतं तिथं इम्रानवर प्रतिहल्ला चढवणं स्वप्नातही शक्य नव्हतं. संदीप–कपिलनं आजपर्यंत अनेक नामवंत गोलंदाजांचं गर्वहरण केलंय; पण इम्रानचं गर्वहरण करणं त्यांना जमलं नाही. उलट इम्रानपुढं हे दोघं बळीच्या बकऱ्यासारखे भासायचे. इम्रानच्या गोलंदाजीला धारेवर धरण्यासाठी बॅकफूटवरच्या स्क्वेअर ऑफ द् विकेट फटक्यांचा खजिना फलंदाजाकडे हवा... आज कदाचित् पटणार नाही; पण तारुण्यातल्या विश्वनाथला ते जमून गेलं असतं. त्याची थोडीशी झलक फैसलाबादच्या तिसऱ्या कसोटीतल्या पहिल्या डावात दिसली; पण आज त्याच्या

**' ते ' जमलं असतं तर इम्रान ' अनप्लेयेबल ' वगैरे वाटला नसता !**

हालचाली, पदन्यास इतका मंदावलाय की त्याला इम्रानसमोर बचाव करणं जमत नाही, तो फटके काय मारणार ? त्यामुळंच अत्यंत अल्प मोल देऊन भारताच्या मौल्यवान विकेट्स घेणं त्याला शक्य झालं.

ह्या मालिकेतल्या इम्रानच्या अलौकिक यशानंतर ' इम्रान हा आज जगातला सर्वश्रेष्ठ गोलंदाज आहे ' असं पाकिस्तानी कॉमेंट्रेटर्स, पत्रकार यांनी म्हणायला सुरुवात केली आहे. आपल्या बिशनसिंग बेदीनेही त्याच्या हाताला हात लावून मम म्हटलंय. अर्थात ही मंडळी फार मोठी अतिशयोक्ती करतायत असं नाही. त्याच्या पाठीच्या दुखण्यामुळं असेल. ऑस्ट्रेलियाचा, वेगवान गोलंदाजांचा अनभिषिक्त सम्राट डेनिस लिली आता उताराला लागलाय. त्यामुळं इम्रानखानला तो मान देणं काही वावगं ठरत नाही. त्या पदापर्यंत पोहचण्यासाठी इम्राननं जिवापाड मेहनतही घेतलीय; पण गंमत पहा, त्याच इम्रानला वयाच्या १६–१७ वर्षापर्यंत गोलंदाजीत अजिबात रस नव्हता... लाहोरला शाळेत क्रिकेटची मुळाक्षरं गिरवत असताना, महान फलंदाज बनण्याचं तो स्वप्न पहात असे. आजचा पाकिस्तानचा एक्सपर्ट कॉमेंट्रेटर जावेद बर्की हा त्याचा त्या काळातला हिरो; पण तो १९ वर्षाखालील चाचणीसाठी फलंदाज म्हणून गेला आणि बाहेर पडताना अष्टपैलू असा शिक्का घेऊन परतला! ... इम्रान म्हणतो, ' माझ्या फलंदाजीकडे फक्त एकदा नजर टाकून मला निवडलं होतं...' मी तिथे असा इतरांचा खेळ पहात असताना अचानक कुणी तरी म्हटलं, ' कुणाला गोलंदाजी टाकायची आहे ?' मला दुसरा काही उद्योग नसल्यामुळे मी गंमत म्हणून चेंडू हातात घेतला आणि गोलंदाजी टाकायला सुरुवात केली... आणि सर्वात गमतीची गोष्ट म्हणजे माझ्या गोलंदाजीवर ही निवड करणारी मंडळी बेहद्द खूष झाली!' इम्रानची ही गम्मत आज भारतीय फलंदाजांच्या अंगाशी आलीय !

पण त्यानंतरही महान फलंदाज होण्याचं भूत त्याच्या मानेवरून उतरलं नव्हतं. लाहोरच्या एटचिसन कॉलेजात आणि नंतर ऑक्सफर्डला त्याने गोलंदाजी टाकली; पण एक कर्तव्य म्हणून, आवड म्हणून नव्हे... ऑक्सफोर्डला असताना स्वतःच्या कर्तबगारीवरही त्याचा विश्वास नव्हता. तो म्हणतो, ' मी क्रिकेटच्या उच्च स्तरावर कधी पोहचेन असं मला अजिबात वाटलं नाही, म्हणून एखादी डिग्री पदरात पाडून घेण्याच्या विचारात मी होतो. त्या वेळी मला बँकिंगमध्ये जास्त रस होता; पण बँकिंगचा अभ्यास सुरू केला आणि लक्षात आलं की, ही भयंकर बोअरिंग गोष्ट आहे. मी सरळ बँकिंगला रामराम ठोकला आणि पुन्हा क्रिकेट खेळून पोट भरायचा निश्चय केला; पण तेव्हाही बँकिंगइतकीच गोलंदाजीही त्याला बोअरिंग वाटत असावी. कारण पाकिस्तानी संघात प्रवेश मिळवूनही गोलंदाजीवर फारसं लक्ष केंद्रित करण्याच्या भानगडीत तो पडला नाही.

१९७१ चा इंग्लंड-दौरा त्याला लाभला नाही. ७४ सालीही तेच घडलं ! नंतर हळूहळू त्याच्या लक्षात यायला लागलं की, फलंदाजीत अपयश मिळालं तरी संघावर फारसा परिणाम होत नाही. कारण त्या वेळी पाकिस्तानकडे मजिद, झहिर, जावेद मियांदाद, मुश्ताक, असिफ इक्बालसारखी जागतिक दर्जाच्या फलंदाजाची प्रचंड फलटण होती; पण गोलंदाजीतील अपयश संघावर फार मोठा परिणाम करतं... त्यामुळं महान फलंदाज होण्याची महत्त्वाकांक्षा त्याने अर्ध्यावर सोडली आणि गोलंदाजीवर लक्ष केंद्रित करायला सुरुवात केली.

वेगवान गोलंदाजाला लागणारी शरीरसंपदा–उंची, रुंद खांदे वगैरे त्याच्याकडे होती; पण तरीही वाट सरळ नव्हती. त्याचा तिरपा रनअप आणि सदोष ॲक्शन पाहून अनेक समीक्षकांनी ठासून सांगितलं, ' इम्रान ' पुस्तका'शी प्रतारणा करतो. तो कधीच फार मोठा गोलंदाज होऊ शकणार नाही !' ' पुस्तकाशी ' बेइमानी करूनही नैसर्गिक गुणवत्ता ठासून भरलेला खेळाडू शिखर सर करू शकतो, हे ही समीक्षक मंडळी विसरली असावीत. दक्षिण आफ्रिकेच्या माईक प्रॉक्टरकडे पाहिल्यावर ' तंत्रशुचिते'चा हव्यास धरणारा कुठलाही माणूस नाक मुरडेल. तो सर्व तत्त्वं धाब्यावर बसवतो. त्याचा रनअप वाईट आहे. 'रॉंग फूट'ने गोलंदाजी टाकतो. गोलंदाजी टाकताना छातीवरचे केसही फलंदाजाला दाखवतो. ( Open chester Action) पण तरीही चेंडू रॉकेटसारखा येतो. तंत्रशुद्धता असणं कधीही चांगलंच; पण निव्वळ तंत्रशुद्धतेमुळे एखादा गोलंदाज वेगवान होऊ शकत नाही... गेल्या काही वर्षांतले वैज्ञानिक प्रयोग सांगतात की, ज्याच्याकडे वेगात आकुंचन होणारे स्नायू असतात ( Fast contrachong muscles ) तोच वेगवान गोलंदाज बनू शकतो. ( ॲथलेटिक्समध्ये ' स्प्रिन्टर ' होण्यासाठीही त्याचीच आवश्यकता असते. ) ते नसतील तर कितीही प्रयत्न केला तरी ' वेगवान ' गोलंदाज बनता येत नाही. फार तर मध्यमगतीपर्यंत मजल जाऊ शकते. इम्रानकडे ते असावेत म्हणूनच तांत्रिक दोष असूनही त्याने कळस गाठला !

इम्रान स्वतः मात्र टीकेमुळे हिरमुसला नाही. उलट जिद्दीने मेहनत घ्यायला त्याने सुरुवात केली आणि त्याबरोबर यशही मेहरबान व्हायला लागलं... त्याच्या वाढलेल्या वेगाचा पहिला मोठा दणका बसला ऑस्ट्रेलियाला ! १९७६ साली पहिली कसोटी हरल्यावर-जिकायच्या ईषने पेटलेल्या इम्रानने सिडनेला ग्रेग चॅपेलच्या ऑस्ट्रेलियन फलंदाजांवर आग ओकायला सुरुवात केली. त्याबाबतीत त्याच्या साथीदारानीही त्याला प्रोत्साहन दिलं. इम्रान म्हणतो, ' झहिर, मियांदाद, मुश्ताक वगैरे माझे साथीदार प्रत्येक षटकानंतर अजून जोरात टाक, असं बजावून सांगत... ते सांगत गेले आणि मी टाकत गेलो. अचानक वेगात चेंडू फेकायची माझी ताकद मला त्या दिवशी उमगली.' दोन्ही डावांत मिळून १६५ धावात १२ बळी घेऊन ऑस्ट्रेलियन संघाची त्याने धुळधाण उडविली ! ॲलन डेव्हिडसन तर इतका भारावून गेला की, इम्रानचं कौतुक करताना म्हणाला, ' उभ्या आयुष्यात सिडनेच्या ग्राउंडवर अशी थरकाप उडवणारी गोलंदाजी मी पाहिली नव्हती !'

आणि त्यानंतर वेस्टइंडीज, न्यूझीलंड, इंग्लंड...जिथे-जिथे इम्रान

**इम्रानची गंमत–तांत्रिक दोष असूनही त्याने कळस गाठला !**

गेला तिथे-तिथे आपल्या अफाट वेगाचं प्रदर्शन करवलं आणि विकेट्सचा नजराणा वसूल केला. वेगाबरोबरच द्रुतगती गोलंदाजीच्या इतर कला आत्मसात करायला सुरुवात केली...आणि आज कुठल्या दर्जाला येऊन तो पोहचलाय ते आपण पाहिलंच ! ...

वेगवान गोलंदाज बनण्याचा ध्यास घेतल्यावर अर्थातच फलंदाजीवरचं त्याचं लक्ष उडालं...आणि महान फलंदाज वगैरे बनण्याची महत्त्वाकांक्षा बासनात गुंडाळून ठेवावी लागली; पण जागतिक दर्जाचा अष्टपैलू खेळाडू म्हणून मिरवता येईल एवढा त्याच्या फलंदाजीचा दर्जा नक्कीच आहे. तिथेही तो पुस्तकाचा शब्दन्शब्द शिरसावंद्य मानत नाही. तसा तो 'मारो-काटो' पंथातलाच. त्याला अहिंसक फलंदाजी मान्य नाही. त्यामुळेच धावांचे ढिगारे तो उभे करू शकत नाही. फारसं सातत्य दाखवू शकत नाही; पण सहाव्या–सातव्या क्रमांकावर ३०–४० धावा प्रतिस्पर्धी गोलंदाजांची मस्ती जिरवत ठोकू शकतो. आपल्या बिशन बेदीचा त्याबाबतचा अनुभव फार कटू आहे. ७८ साली कराचीला ऐन आणवाणी-प्रसंगी बेदीला चेंडूला फ्लाइट देऊन इम्रानचं टोलवाटोलवीचं कसब जोखण्याची खुमखुमी आली. त्याने सरळ तीन षट्कार ठोकले आणि विजय दूर जातोय असं वाटत असताना; खसकन जवळ खेचला. ह्या मोसमात फलंदाजीच्या बाबतीतही त्यानं बरीच प्रगती केलीय ..इंग्लंडमध्ये संघ अडचणीत असताना प्रत्येक वेळी धावा केल्या...जिमलेव्हर त्याच्या अष्टपैलुत्वावर एव्हढा फिदा झाला की, त्याने सरळ जाहीर केलं, 'इम्रानखान हाच आजचा सर्वश्रेष्ठ अष्टपैलू खेळाडू आहे.' बॉथम हा त्याचा देशबंधू असूनही... त्याची जीभ इम्रानच्या बाजूने कौल देताना अजिबात अडखळली नाही; पण खरं सांगू ! बॉथम–इम्रानमध्ये एकाला ज्येष्ठ ठरवणं तेव्हढं सोपं नाही.. इम्रान-बॉथमपेक्षा गोलंदाजीत वरचढ असेल; पण फलंदाजीत बॉथमच जास्त भरवशाचा वाटतो ..त्यानेही इम्रानप्रमाणे आक्रमकतेचा वसा घेतलाय; पण त्याचा बचाव, जास्त भरवशाचा वाटतो...

मात्र नेतृत्वाच्या क्षेत्रात इम्रानने पुन्हा बॉथमवर कुरघोडी केलीच...बॉथमच्या हातात इंग्लडचं नेतृत्व आलं आणि बॉथम ढेपाळला. इम्राननं नेतृत्वाचा मुकुट डोक्यावर ठेवला आणि स्वतःचा परफॉर्मन्स वरच्या पातळीवर नेलाच; पण अंतर्गत लाथाळ्यांची बजबजपुरी असलेल्या पाकिस्तानी संघात आमूलाग्र बदल घडवून आणला...पाकिस्तानी संघाचा कर्णधार हा नेहमी ज्वालामुखीच्या तोंडावर बसलेला असतो...कधी स्फोट होऊन त्याची गादी खालसा होईल हे सांगता येत नाही...आणि इम्रानने जेव्हा नेतृत्वाची धुरा सांभाळायला घेतली...तेव्हा पाकिस्तानी संघ नुकताच एका अंतर्गत बंडाळीतून उठला होता...गेल्या वर्षी ऑस्ट्रेलियाविरुद्ध जावेद मियांदादला नेतृत्व बहाल केलं गेलं...आणि अनेक ज्येष्ठ खेळाडूनी बंड पुकारलं. इम्रानही त्यात होताच...बाबासाहेब भोसलेंना खाली खेचण्यासाठी प्रयत्न झाले नसतील तेव्हढे प्रयत्न इम्रान आणि कंपूने जावेदला खाली खेचण्यासाठी केले. त्यासाठी त्याना संघाच्या बाहेरही पडावं लागलं होतं; पण शेवटी बंडखोरांची फत्ते झाली आणि इम्रान कर्णधार झाला ! ...

त्या पार्श्वभूमीवर नेतृत्व करणं ही सोपी गोष्ट नसते; पण इम्रानने गुणवान परंतु विखुरलेल्या खेळाडूना मोठ्या कौशल्याने एका माळेत गुंफलं...आणि रसातळाला चाललेल्या पाकिस्तानी संघानं बघता-बघता वर मुसंडी मारली.

कर्णधार म्हणून त्याच्या आजवरच्या छोट्या कारकीर्दीत त्याने बचावात्मक डावपेच कधीच लढवले नाहीत. त्याला त्याचा तिटकारा आहे आणि आक्रमक डावपेच लढवण्याइतकी गुणवत्ताही त्याच्या संघात आहे. तो नेहमी म्हणतो, 'सामना अनिर्णित रहाणं मला आवडत नाही...लोक पैसे टाकून चांगलं, निकाली क्रिकेट बघायला येतात. त्यांच्याशी गद्दारी करणं बरोबर नाही. मी पहिल्या चेंडूपासून म्हणून आक्रमणावर भर देत असतो.'

आक्रमक डावपेचानी इम्रानला भरघोस यश मिळवून दिलंय. गेल्या अकरा कसोटी सामन्यात त्यानं ७ विजय मिळवले, दोन पराभव स्वीकारले आणि फक्त दोन सामने अनिर्णित राहिले. ह्या अनिर्णित राहिलेल्या सामन्यात पावसाचा सहभाग मोठा होता.

ह्या अकरा सामन्यातल्या प्रत्येक विजयाने पाकिस्तान क्रिकेटमध्ये इतिहास निर्माण केलाय.

ह्या वर्षी इंग्लंडला एका कसोटी सामन्यात हरवण्यात पाकिस्तानला २७ वर्षांनंतर यश आलं !


नंतर दोन महिन्यांत ऑस्ट्रेलियाविरुद्ध मालिकेतले सर्वच्या सर्व ( ३–० ) सामने जिंकून पाकिस्तानने इतिहासातला सर्वांत मोठ्ठा विजय मिळवला !

आणि आता पाचव्या कसोटीपर्यंत भारताविरुद्ध ३–० आघाडी घेऊन गेल्या मालिकेतील पराभवाचा सूड उगवल्याचं समाधान मिळवलंय !

एव्हढं यश मिळवूनही इम्रानचे पाय आजही जमिनीवर आहेत... इफ्तेकारने जेव्हा 'टीमस्पिरिट' वगैरेबद्दल चर्चा सुरू केली तेव्हा इम्रान चटकन म्हणाला, 'यशाच्या वेळी सर्वच एकत्र असतात... उद्या अपजय मिळाल्यावरही जर एकजूट टिकली तरच सांघिक शक्ती वगैरे संघात रुजली आहे असं मी म्हणेन !'

धवल यशातही असा खोलवर विचार करणाऱ्या माणसाचा नेहमीच उत्कर्ष होत असतो...इम्रानचाही होणार ह्यात शंकाच नाही!

## ४ लाख ६३ हजार वाचकांची एकमुखी प्रशंसा




**चौथी**
**डिलक्स**
**आवृत्ती**

लेखक : वि. ग. कानिटकर

।। पृष्ठसंख्या ५४० ।। मोठा डबल क्राउन आकार ।। भरपूर छायाचित्रे ।।
।। मूळ किं. १४० रु. ।। सवलतीत ९५ रु. ।।

**चौथ्या डिलक्स आवृत्तीचे खास आकर्षण**

## माइन काम्फ

**या हिटलरच्या दुर्मिळ आत्मचरित्राची सचित्र ओळख**

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.